# महात्मा ज्योतिराव फुले



महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

# महात्मा ज्योतिराव फुले

यांचा अल्प - परिचय

: लेखक :
**श्री. पं. सि. पाटील**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

अनुक्रमणिका

प्रथमावृत्ती : १९३८
द्वितीयावृत्ती : १९८४
तृतीयावृत्ती : १९९०

प्रकाशक :
**श्री. सू. द्वा. देशमुख,**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
**मायक्रो ग्राफ,**
रामदूत,
डॉ. भालेराव मार्ग,
गिरगाव, मुंबई - ४०० ००४.

किंमत रु. १०/-

## अनुक्रमणिका

# निवेदन

महात्मा ज्योतीबा फुले यांचे चरित्र लिहिण्याचा पहिला मान मध्यप्रदेश वऱ्हाडातील माजी आमदार श्री. पंढरीनाथ पाटील यांचा. महात्मा ज्योतीबा फुले यांची सत्यशोधक चळवळही वऱ्हाडातल्या बुलढाणा, अकोला जिल्ह्यात बरीच फोफावली होती, आणि त्यामुळे तेथील जनतेचे जनजागरणही झाले होते. याचा एक परिणाम म्हणजे ब्राह्मणेतर पक्ष नावाचा राजकीय पक्षही त्या काळात मध्यप्रदेश वऱ्हाडात अधिकार पदावर आला होता. श्री. इ. राघवेन्द्रराव, श्री. तु. ज. केदार, डॉ. पंजाबराव देशमुख या लोकधुरीणांनी या काळात मध्यप्रदेश राज्याची धुरा वाहिली होती आणि अनेक सामाजिक सुधारणा पण घडवून आणल्या होत्या. अर्थात या सर्व सामाजिक जागरणामागील शक्ती होती महात्मा ज्योतीबा फुले, आणि त्यांचे वऱ्हाडमधल्या जनतेला ओळख करून देण्याचे कार्य केले, कै. पंढरीनाथ पाटील यांनी. कै. पंढरीनाथ पाटील यांनी लिहिलेले महात्मा ज्योतिबा फुले यांचे चरित्र त्या काळात बहुजन समाजाची गीताच झाली होती. पुढे हे चरित्र अनेक वर्ष दुर्मिळ झाले. ते पुनर्मुद्रित करून छापावे असे मंडळाने ठरविले होते. ४२ च्या काळातील माझे एक परम मित्र श्री. आण्णासाहेब रणधीर यांच्या साहाय्यामुळे या दुर्मिळ झालेल्या पुस्तकाची प्रत साहित्य संस्कृती मंडळाला मिळविता आली. या पुस्तकाच्या प्रकाशनामागील प्रेरक शक्ती आण्णासाहेब रणधीर यांची आहे. श्री. ज. बा. कुळकर्णी शासकीय नोकरीत असेल तरी त्यांचा व्यासंग, विशेषतः सामाजिक प्रश्नावरचा, फार मोठा आहे. त्यांनी या चरित्राला प्रस्तावना लिहून दिली याबद्दल त्यांचे आभार.

महात्मा ज्योतीबा फुले यांचे चरित्राचे पुनर्मुद्रण आणि प्रकाशन करताना मंडळाला आनंद होत आहे.


४२, यशोधन,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक २६ फेब्रुवारी, १९८५.

**सुरेन्द्र बारलिंगे**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.


अनुक्रमणिका

# प्रस्तावना

महात्मा फुले यांचा परिचय करून द्यावा अशी आज परिस्थिती उरलेली नाही. त्यांच्या जीवन कार्याचे मूल्यमापन करणारी अनेक पुस्तके प्रसिद्ध होत आहेत आणि त्यामधून नवीन नवीन माहिती उपलब्ध होत आहे. या योगे महात्मा फुलेंच्या जीवन व कार्याच्या वेगवेगळ्या पैलूंवर प्रकाश पडतो. स्थितीशील समाजाला गतिशील करण्याच्या दृष्टीने चळवळ उभारणारा हा एकोणिसाव्या शतकातील लोकोत्तर पुरुष. अशा या असामान्य पुरुषाच्या कार्याची माहिती वाचकाना देण्याचा पहिला प्रयत्न महात्मा फुले यांचे एक निःसीम भक्त व मध्यप्रदेशातील माजी आमदार कै. पंढरीनाथ सीताराम पाटील यांनी १९३८ साली "महात्मा ज्योतिराव फुले यांचा अल्प परिचय" हे पुस्तक प्रसिद्ध करून केला. सांप्रतचे पुस्तक हे त्याचे पुनर्मुद्रण आहे.

कै. पंढरीनाथ पाटील यांनी या पुस्तकात 'मुलींची पहिली शाळा', अस्पृश्यांची पहिली शाळा', 'विधवा विवाह' व 'अनाथ बालकाश्रम', 'चिपळूणकर आणि फुले,' 'सक्तीचे प्राथमिक शिक्षण', 'सन १८७७ चा भयंकर दुष्काळ' इत्यादी प्रकरणांचा ऊहापोह केला असून त्याद्वारे महात्मा फुले यांच्या आयुष्याचा जीवनपट उभा केला आहे. एक काळ असा होता की, महात्मा फुले यांच्या विचारसरणीची महती आणि समाज परिवर्तनाच्या दृष्टीने दिलेली झुंज याची समाजाला योग्य ती जाणीव नव्हती. काही सुशिक्षित व्यक्ती वगळता त्यांचे कार्य इतरांना रुचणारे नव्हते. कारण गतिहीन, कुचकामी आणि निर्माल्यवत् सामाजिक चौकट फेकून देऊन त्याजागी नवमूल्यांची त्यांना स्थापना करायची होती. यासाठी त्यांनी प्रत्येक क्षेत्रात हिरीरीने भाग घेतला, मग तो स्त्रीयांसाठी वा अस्पृश्यांसाठी शाळा उघडण्याचा उपक्रम असो, अथवा दुष्काळात गरिबांना मदत करण्याचा प्रसंग असो. प्रत्येक कार्याला त्यांचा वास्तव स्पर्श झाला. यासाठीं त्यांना अनन्वित छळपण सोसावा लागला. तथापि महात्मा फुले डगमगले नाहीत. आपल्या ध्येयाकडे लक्ष्य केन्द्रीत करून त्यांनी अखेरपर्यंत वाटचाल केली, सत्यशोधक समाजाची स्थापना करून समाजाला मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारे एक नवीन सत्यधर्म निर्माण करून समाजाचे सर्वंकष परिवर्तन करावे अशी त्यांची कल्पना होती.

महात्मा फुल्यांना सामाजिक व आर्थिक समतेवर आधारलेला शोषणविरहित समाज निर्माण करायचा होता. शूद्र व स्त्रियांबरोबर शेतकरी कामकरी यांचीही पिळवणूक होऊ नये, त्यांना संरक्षण मिळावे, ते शहाणे सवरते व्हावे अशी त्यांची मनोमन इच्छा होती. "विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, हे सारे अनर्थ एका अविद्येने केले.' अशा शब्दात ते कळवळून कष्टकरी जनतेच्या दुरावस्थेचे वर्णन करतात.

पंढरीनाथ पाटील हे एके ठिकाणी महात्मा फुले यांचा भारतातील पहिला सोशॅलिस्ट म्हणून उल्लेख करतात. सन १९३०ते ५० या कालखंडात महाराष्ट्रात समाजवादी-साम्यवादी विचारसरणीने मूळ धरले होते आणि याच काळातील नेमके हे पुस्तक असल्यामुळे श्री. पाटील यानी सोशॅलिस्ट शब्दाचा वापर केला असण्याची शक्यता आहे. पण म. फुल्यांची चळवळ केवळ वर्गलढ्याची, वर्गसंघर्षाची चळवळ नव्हती. वर्णन करावयाचे झाले तर असे म्हणता येईल, की त्यांची चळवळ भारतीय प्रबोधनाची आणि मानवतावादी होती. ती येथील मातीतील होती. यामुळे त्यात द्वेषाचा लवलेश नव्हता. तर परिवर्तनाचा भाग होता. असे नसते तर कोल्हापूर प्रकरणात ते टिळक आगरकरांना आर्थिक मदत करण्यास धावले नसते. ही एकच घटना त्यांचा चळवळीची दिशा पटविण्यास पुरेशी आहे.

अनुक्रमणिका

अशा या समाज द्रष्ट्याचा मुंबईच्या जनतेचे सन अठराशे अठ्ठ्याऐशीमध्ये ‘महात्मा’ ही पदवी अर्पण करून जाहिर सत्कार केला. जनतेने प्रेमाने अर्पण केलेली ही पदवी किती सार्थ होती, हे महात्मा फुलें यांच्या एकंदर कार्याचे परिशीलन केले असतांना सहज दिसून येते. महर्षी अण्णासाहेब शिंदे यांनी त्यांच्या गौरवार्थ एक काव्य लिहिले आहे. त्यात ते ज्योतिबांचे पुढीलप्रमाणे वर्णन करतात :—

**सत्याचा पालनवाला ।**
**हा धन्य ज्योतिबा झाला ।**
**पतितांचा पालनवाला ।**
**हा धन्य महात्मा झाला ।**

असा हा महाराष्ट्राला ललामभूत ठरणारा थोर पुरुष. त्यांचे चरित्र पुनर्मुद्रित करून महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने मोलाची कामगिरी बजावली आहे, यात शंका नाही.

**—ज. बा. कुळकर्णी**

अनुक्रमणिका

## अर्पण पत्रिका

# कै. खुशालराव पाटील राणा शिसोदे

## नायेगाव, जि. (उमरावती)

यांचे सेवेशी –

यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सत्यशोधक समाजाचा वऱ्हाड व मध्यप्रांतात प्रसार करण्यासाठी सतत तीस वर्षे काया, वाचा व मने करून अविश्रांत प्रयत्न केलेत. त्यांचे उदाहरण तरुण पिढीसमोर सदैव राहावे म्हणून आम्ही ही अल्पकृती त्यांच्या स्मरणार्थ त्यांना अर्पण करतो.

**–पुस्तककर्ता**

अनुक्रमणिका

# लेखकाचे दोन शब्द

प्रातः स्मरणीय आधुनिक आद्यसत्यशोधक महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले यांचा अल्प-परिचय करून देण्याच्या इराद्याने आज आम्ही हे लहानसे पुस्तक प्रसिद्ध करीत आहोत.

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या चारित्र्याविषयी बोलताना आमच्या देशातील थोर किर्तीवंतांपैकी एक राजर्षी शाहू छत्रपति यांच्यासारख्या देशातील मागासलेल्यांच्या व दलितांच्या सर्वश्रेष्ठ कैवाऱ्याने ज्याला 'महाराष्ट्राचा मार्टीन लुथर' म्हटले; आणि दुसरे श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांच्यासारख्या जगातील विख्यात विद्वानाने ज्याला 'हिंदुस्तानचा वॉशिंग्टन' म्हणून गौरविले अशा त्या आमच्या देशातील थोर महाभागाचे-महात्मा ज्योतिबा फुल्यांचे—अल्पसे चरित्र लिहिण्याचे भाग्य आम्हासारख्या एका लहान व सामान्य इसमाच्या पुन्हा एकदा वाट्याला आले याबद्दल आम्हास मोठी धन्यता वाटते!

महाराष्ट्रामध्ये इंग्रजी आल्यानंतर जे मोठेमोठे पुरुष प्रसिद्धीला आले त्यांत म. फुले हे सर्वश्रेष्ठ होत! म. फुले यांचे इतराप्रमाणे अवडंबर माजविले गेले नाही. त्यांची स्मारके उभारली नाहीत. त्यांचे चरित्रग्रंथ प्रसिद्ध झाले नाहीत, इतकेच नव्हे तर आठवणी आख्यायिकासुद्धा प्रसिद्ध केल्या गेल्या नाहीत, याचे कारण कित्येक शतकापासून जनतेला जळूप्रमाणे चिकटलेली मायावी भिक्षुकशाही निष्ठुरपणाने तोडून काढण्याचा महात्मा फुल्यांनी प्रयत्न केला! जनतेला अज्ञान गर्तेतून वर येण्याकरिता हात दिला!! भिक्षुकशाहीच्या दृष्टीने असले भयंकर गुन्हे व पाप त्यांनी केले, त्यामुळे म. ज्योतिराव फुले यांना जिवंतपणी तर तिने छळलेच पण नंतरसुद्धा त्यांची आठवणही जनतेला राहू नये अशी काळजी भिक्षुकशाहीने घेतली! ज्यांच्या करिता ज्योतिरावांनी जन्मभर झगडा केला ते बिचारे अज्ञान, त्यांना स्वतः च्या जन्माची तारीख किंवा नेमके वयसुद्धा सांगण्याची पंचाईत! ते दुसऱ्याचे चरित्र कोठवर सावरीत बसणार? म. ज्योतिराव फुले यांनी सत्यशोधक समाज स्थापन केला, एवढी सर्वसाधारण माहिती उपलब्ध होती. पण त्या महात्म्याचे कार्यच असे आहे की, दिवसेंदिवस त्याचा प्रचार व्हावा! त्यांची उच्चतम तत्वे जनतेच्या हृदयावर ठसून, त्याच जनतेकरवी त्यांच्या जयजयकाराने दाही दिशा भरून टाकल्या जाव्यात!! त्यांच्या भक्तांची संख्या लाखांनी होत जावी!!! देशातील लाखो करोडो अधोगत दीनदुबळ्यांच्या पुनरुद्धार करणार अलौकिक 'दीनमणी' ही किर्ती ज्यांना प्राप्त व्हावी त्या म. फुल्यांविषयी जास्त जास्त माहिती मिळेल काय? अशी जनतेला उत्कंठा लागणे साहाजिक आहे! जसजसा म. फुले यांच्या तत्त्वांचा महासागर सर्वव्यापित होत चालला, तसतसे त्यांचे शत्रू त्यांच्याविषयी गैरसमज पसरवू लागले आणि त्यांच्या तत्त्वांचे शिलेदार जिथे जिथे त्यांची माहिती मिळेल ती ती गोळा करू लागले :

इ. स. १८९० साली म. फुले यांचे चिरंजीव कै. डॉ. यशवंतराव फुले यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तक प्रसिद्ध केले व त्यांत म. फुले यांचे अल्पचरित्र प्रसिद्ध केले. त्यानंतर सन १९११ च्या सुमारास कै. रामय्या व्यंकय्या अय्यावारू यांनी 'गुलामगिरी' पुस्तकाची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध केली. त्यात त्यांनी असेच एक लहानसे चरित्र लिहिले आणि त्यानंतर श्री. अ. द. गवंडी, बी. ए. यांनी त्याच्याच आधारे पण एक २०।२५ पानांचे लहानसे त्रोटक चरित्र स्वतंत्र पुस्तकरूपाने प्रसिद्ध केले. पुढे असल्या अल्प कृतीने जनतेच्या वाढत्या आकांक्षांची तृप्ती होणे शक्य थोडेच होते? अनेक जिज्ञासूंच्या प्रोत्साहनाने यापेक्षा अधिक माहिती मिळवून म. फुले यांच्या शतसांवत्सरिक उत्सवाप्रित्यर्थ सन १९२७ साली आम्ही दोनशे पानांचे एक चरित्र प्रसिद्ध केले. त्या पुस्तकाच्या आम्ही काढलेल्या दोन हजार प्रती त्याच साली खलास झाल्या! त्या

पुस्तकाची दुसरी आवृत्ती काढावी, पण ती काढण्यापूर्वी ज्योतिरावांसंबंधी अधिक माहिती मिळविण्याचा आणखी एकदा प्रयत्न करावा असे आम्ही ठरविले आणि त्या इराद्याने मराठी प्रांतातील सर्व भागात आम्ही सन १९२७ ते १९३० पर्यंत सतत तीन वर्षे फिरलो. ज्योतिरावांचा ज्या संस्थांशी अथवा स्थळांशी प्रत्यक्ष संबंध आला होता ती सर्व प्रत्यक्ष त्या त्या ठिकाणी जाऊन पाहिली आणि ज्यांच्या आयुष्यात ज्योतिरावांना भेटण्याचा अथवा त्यांच्या कार्याविषयी अन्य तऱ्हेचा संबंध आला होता, त्यापैकी त्यावेळी हयात असलेल्या लोकांना भेटलो. तसेच महाराष्ट्रातील सर्व मोठ्या लायब्ऱ्या चाळल्या! अतएव यासाठी जेवढे प्रयत्न करणे शक्य होते ते सर्व केल्यावर आम्ही जेव्हा तीन वर्षांच्या आमच्या मेहनतीने मिळविलेल्या माहितीच्या साठ्याकडे लक्ष पुरविले तेव्हा आमचे मन पूर्ण नसले तरी बहुतांशाने समाधान पावले! आता आम्हास म. ज्योतिराव फुले याचे अतिसुंदर असे एक थोरले चरित्र लिहिता येईल व तसे ते लिहिले गेल्यावर आधुनिक काळी '**भारती या सम हाच**' असा एकच एक उद्गार जनताजनार्दनाच्या तोंडून या महात्म्यासंबंधी सहज निघेल. इतके ज्योतिरावांचे जीवनचरित्र श्रेष्ठ दर्जाचे असल्याचे जनतेच्या नजरेस येईल! असे हे माहितीपूर्ण चरित्र यापूर्वीच लिहिण्याचा आमचा विचार होता; परंतू कार्यबाहुल्यांमुळे आम्हास अजून इतकी फुरसत मिळाली नाही, म्हणून असेल पवित्र कार्य आम्हास अजूनही हाती घेता आले नाही.

काळ जसजसा अधिकाधिक लोटत चालला, तसतसा ज्योतिरावांचा किर्ती धवल अधिकाधिक वाढत चालला आहे आणि त्यामुळे त्यांच्या चरित्राची मागणी आमच्याकडे शेकडो लोकांकडून प्रत्यही वाढतच आहे! मोठा चरित्रग्रंथ आमच्या हातून लौकर लिहून पुरा करण्याचा आमचा इरादा आहे. परंतु ते काम हाती घेऊन पुरे करीपर्यंत बराच काळ लागेल हे निश्चित होय. म्हणून फार दिवसापासूनचे जिज्ञासु जनांचे जे टुमणे आमच्यामागे सारखे आहे, ते तूर्त काही काळ थोडे तरी टाळण्यासाठी आम्ही आजचा हा अल्प प्रयत्न या पुस्तक रुपाने करीत आहोत. या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या कामी आमचे मित्र श्री. दत्तात्रेय गोविंद पाटील, संचालक, खानदेश आयुर्वेदिक फार्मसी व धनंजय प्रिंटिंग प्रेस जळगाव यांनी आम्हास बहुमोल साहाय्य केले आहे त्याबद्दल त्यांचे आभार मानणे आमचे कर्तव्य आहे व ते कर्तव्य पार पाडून नंतर आम्हास येथे इतकेच लिहावयाचे आहे की, आम्ही लौकरच जो मोठा चरित्र-ग्रंथ लिहिणार आहोत, त्यांत यावयाच्या सविस्तर हकीकतीचा सार या चिमुकल्या पुस्तकात आम्ही दिला आहे. त्यामुळे थोडक्या मोलात आणि थोडक्या वेळात जिज्ञासू वाचकांचे बऱ्याच अंशी समाधान होईल अशी आशा करून आम्ही लिहिलेले हे छोटे पुस्तक वाचकांसमोर मोठ्या प्रेमाने नम्रतापूर्वक सादर करतो.

चिखली [वऱ्हाड]
ता. १५ ऑक्टोबर, १९३८

सर्वांचा नम्र सेवक,
**पंढरीनाथ सिताराम पाटील**

## अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

निवेदन ..................... ४

प्रस्तावना ..................... ५

अर्पण पत्रिका ..................... ७

लेखकाचे दोन शब्द ..................... ८

प्रकरण १ : जन्म व शिक्षण ..................... ११

प्रकरण २ : जनसेवेची शपथ ..................... १३

प्रकरण ३ : मुलींची पहिली शाळा ..................... १६

प्रकरण ४ : अस्पृश्यांची पहिली शाळा ..................... १९

प्रकरण ५ : विधवाविवाह व अनाथ बालकाश्रम ..................... २३

प्रकरण ६ : परशुरामाची फजिती ..................... २४

प्रकरण ७ : सत्यशोधक समाजाची स्थापना ..................... २६

प्रकरण ८ : चिपळूणकर आणि फुले ..................... ३०

प्रकरण ९ : शेतकरी मजूर चळवळी ..................... ३४

प्रकरण १० : कै. टिळकांना दिलेली मदत ..................... ३६

प्रकरण ११ : सक्तीचे प्राथमिक शिक्षण ..................... ३८

प्रकरण १२ : सन १८७७ चा भयंकर दुष्काळ ..................... ४०

प्रकरण १३ : ज्योतिरावांचे राजकीय क्षेत्रातील कार्य ..................... ४३

प्रकरण १४ : बडोदा नरेश आणि फुले ..................... ४८

प्रकरण १५ : महात्मा पदवी अर्पण ..................... ५१

प्रकरण १६ : सार्वजनिक सत्यधर्म ..................... ५५

प्रकरण १७ : अखेरचा अध्याय ..................... ५७

# प्रकरण १ : जन्म व शिक्षण

प्रातः समयी धरित्रीच्या पोटातून जन्म पावणाऱ्या 'सूर्यज्योती' प्रमाणे सन १८२७ च्या एका सकाळी भारतमाता चिमणाबाईच्या पोटी एक कोमल 'दिव्यज्योती' आमच्या हिंद भूमीवर उदय पावली आणि बारावा दिवस उजाडल्यावर त्या दिवशी चिमणामातेनेही आपल्या बालकास - दीनांच्या या ज्योतीस - पाळण्यात घालून त्याचे 'ज्योतिराव' हेच सार्थ नाव ठेविले!

सकाळी सूर्य चढू वाढू लागताच धरित्रीने जसे त्याला सोडावे तसे ज्योतिबा वाढू चढू लागताच चिमणादेवीने एका सकाळी त्याला कायमचे सोडले! यावेळी ज्योतिबा अवधा नऊ महिन्यांचा होता. पोरका ज्योति जगांत टक्केटोणपे खाऊन स्वावलंबनाने व स्वाभिमानाने जगण्याचे एव्हापासूनच शिकला!

बालज्योतीचे वडील गोविंदराव फुले हे पुणे शहरांतील माळी समाजाचे एक प्रमुख मेहेत्रे होते. त्यांनी एका दाईकडून ज्योतिबांची जोपासना केली व हिंडुफिरू लागल्यावर वयाच्या सातव्या वर्षी ज्योतिरावास मराठी गावठी शाळेत घालण्यात आले. याकाळी विद्या फक्त ब्राह्मणांनीच शिकावी इतरांनी शिकणे हे पाप अशी लोकांची समज असल्यामुळे इंग्रजी राज्यात हे पाप पहिल्याने गोविंदरावांच्या हातूनच घडले. ज्योतिराव जात्या तैलबुद्धीचा असल्यामुळे त्याला विद्येची स्वाभाविकच गोडी लागली व तो झपाट्याने शिकू लागला, हे यांच्या ब्राह्मण कारकुनास पहावेना. हा पोरगा शिकला तर लिहिण्याचा धंदा तो आपल्या हातात घेईल व मग आपणास लबाड्या करून या भोळ्या कुळास पूर्वीप्रमाणे फसविता येणार नाही; आणि त्यामुळे आपल्या नोकरीवर खात्रीने पाणी पडेल, अशी त्यास साधारण भिती वाटू लागली. त्यावेळी आजच्याप्रमाणे सरकारी शाळा नव्हता, पण ख्रिस्ती मिशनऱ्यांनी मात्र नुकत्याच कोठे मोठमोठ्या शहरीं प्राथमिक शाळा उघडून सर्व धर्माच्या व जातीच्या मुलांस त्यांच्या त्या शाळेत येण्यास मुभा दिली होती. उभ्या पेशवाईत विद्या शिकण्याकरिता नुसते अ, आ, इ, ई, चा उच्चार करणाऱ्या मराठा, माळी लोकांच्या ज्या ब्राह्मणांनी कायद्याने जिव्हा छाटल्या, त्याच ब्राह्मणांस, मिशनऱ्यांनी गावोगाव सर्व जातींच्या पोरांकरिता शाळा काढलेल्या पाहून कसे बरे चांगले वाटेल असेल? पण सत्तेपुढे त्यांचे शहाणपण ते काय चालणार? मिशनऱ्यांना इंग्रज राज्यकर्त्यांचा पाठिंबा होता, हे येथे निराळे लिहिणे नको. शाळांतून मुले न पाठविण्याबद्दल पुण्याचा ब्रह्मवृंद लोकांची मने नानाप्रकारे आळवीत होताच पण मिशनऱ्यांच्या दिर्घोद्योगाने व चिकाटीने त्यांच्या शाळांतून पुढे पुढे खुद्द ब्राह्मण विद्यार्थ्यांचीच संख्या वाढू लागली. आमच्या ज्योतिबाने सुद्धां त्या संख्येत एकाने भर घातली होती. ही गोष्ट सहन न होऊन गोविंदरावांच्या कारकुनाने व त्याच्या भाऊबंदांनी गोविंदरावांच्या डोक्यात धर्मद्रोहाच्या पापाचे भलतेच वेड भरून दिले व शिवाय त्यांना सांगितले की, या मुलाला शाळेत घालून ऐदी बनविण्यापेक्षा बागेत काम करावयास शिकवा, म्हणजे हा तुमचे व कुटुंबाचे पुढे उत्तम पोषण करील. अशी त्या भोळ्या व सरळ मनाच्या सद्गृहस्थाची समजूत घालण्यात आल्यामुळे गोविंदरावांनी आमच्या या बाळ-वीरास शाळेतून काढून बागेचे कामांत घातले. अशाप्रकारे ज्योतिरावाच्या हातचे पाटीदप्तर व दऊत लेखणी जाऊन त्याऐवजी मोटबारी व कुदळ, खुरपे आले! या मध्यंतरीच्या काळांत पूर्व रूढीस अनुसरून गोविंदरावांनी इतक्या अल्प वयातच ज्योतिरावांचे लग्न करून टाकले.

गोविंदरावांचे बागेशेजारी 'गफ व्हार बेग मुनसी' या नावाचे मुसलमान जातीचे एक विद्वान गृहस्थ राहात असत. त्यांनीं व मि. लेजीट साहेबांनी ज्योतिराव व त्यांचे वडील या उभयतांस चांगला उपदेश केला. त्यामुळे ज्योतिराव आपल्या वयाच्या १४ व्या वर्षी म्हणजे इ. स. १८४१ साली पुन्हा शाळेत जाऊ

लागले. त्या साली इंग्रजी क्लासात त्यांना बसविण्यात आले. ज्योतिरावांचा पूर्वीच अभ्यास चांगला नव्हता आणि त्यातून त्यांनी मध्यंतरी शाळा सोडली होती. त्यामुळे त्यांना वर्गबंधूंबरोबर अभ्यास करण्यास प्रथम थोडे कठीण पडले परंतु त्यांचा दृढ निश्चय, अभ्यास करण्याची चिकाटी व हुरूप यामुळे त्यांचा अभ्यास भराभरा पुढे जाऊन त्यांना यश मिळाले. ज्योतिरावांचा स्वभाव प्रेमळ, मनमिळावू व दिलदार असल्यामुळे ते सर्वांचे आवडते बनले. बरेच ब्राह्मण-ब्राह्मणेतर विद्यार्थी त्यांचे मित्र बनले होते. त्यांपैकीं त्यांचे जिवलग दोस्त ह्मणजे श्री. सदाशिव बल्लाळ गोवंडे, मोरो विठ्ठल वाळवेकर व सखाराम यशवंत परांजपे हे होत.

इंग्रजांनी पेशवाई नष्ट केल्यामुळे पुण्यातील ब्राह्मणांना आभाळ फाटल्याप्रमाणे झाले होते. त्यांचे मनांतून इंग्रजी राज्य उलथून पाडण्याचे विचार सारखे घोळत होते. इंग्रजांविरुद्ध ब्राम्हण लोकांची नातूशाही वळणाची नाना कारस्थाने सुरू होती. शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना हाताशी धरून इंग्रजी राज्याविरुद्ध देशात बंड माजविता आले तर पहावे व पुन्हा पेशवाई प्रस्थापित करावी, या इराद्याने पुण्यातील ब्राह्मण गुरुजींकडून मि. टाम्स, पेन्स, वगैरेंच्या पुस्तकांतील काही निवडक भाग व जॉर्ज वॉशिंग्टन, छत्रपति शिवाजी महाराज आणि नेपोलियन बोनापार्ट यांच्या चरित्रांपैकीं काही गोष्टी त्या कोवळ्या मनाच्या विद्यार्थ्यांना निरनिराळ्या रुपानें शाळेत शिकविण्यात येऊ लागल्या. साहाजिकच विद्यार्थ्यांच्या मनात फाजील देशभक्तीचे वारे शिरून इंग्रजी राज्य पालथे घालण्याकरिता ते लष्करी शिक्षण घेऊ लागले व या विद्यार्थीगणात ज्योतिबांनी थोड्या दिवसांत प्रमुख स्थान पटकाविले. त्यावेळी पुण्यात 'लहुजीबुवा' या नांवाचा एक मांग जातीचा गृहस्थ या कामी मोठा नामांकित व तरबेज असा होता. त्याचे जवळ ही मंडळी दांडपट्टा, ढाल-तलवार, गोळीबार व कसरत वगैरे कामे शिकली.

ज्योतिबा सतरा वर्षे वयाचा असेल. एके दिवशी सकाळी तो आपल्या मळ्यातून घरी जात असता त्याला रस्त्यावर दोन गोरे सोजीर भेटले व एका कुरापतीवरून त्याचे सोजीरांशी भांडण पेटले, प्रकरण धक्काधक्कीवर गेले, तेव्हा ज्योतिबाने आपल्या जवळच्या उसाच्या पेंडकीतील एका मजबूत टेरीने त्या सोजीरांच्या पाठी व डोकी चांगली नरम करून आपल्या रस्त्याने त्यांना पिटाळून लावले. असो; ज्योतिबा व त्याचे मित्र हे रोज दिवसभर इंग्रजी शाळेत जाऊन पढाईचे आणि सांज सकाळ तालीमखान्यांत जाऊन लढाईचे असे दुहेरी शिक्षण घेत होते. हा त्यांचा क्रम नेहमी अखंडपणे चालू होता.

इतक्या अवधीत ज्योतिरावांनी मराठी भाषेचे पूर्णज्ञान संपादन करून इंग्रजी सात पुस्तकापर्यंत अभ्यास पुरा केला व वयाच्या २० व्या वर्षी शाळा सोडून ते प्रथम प्रपंचात आणि नंतर सार्वजनिक प्रपंचात पडले. इंग्रजीत लिहिलेले निरनिराळे ग्रंथ व इतिहास वाचण्याचा त्यांना मोठा नाद लागल्यामुळे पुढे त्यांचे इंग्रजी पुष्कळ वाढले. ते आजन्म विद्यार्थीच होते.

अनुक्रमणिका

# प्रकरण २ : जनसेवेची शपथ

शाळेत शिकत असताना ब्राह्मण पंतोजीच्या उपदेशामुळे फाजील देशभक्तीचे वारे ज्योतिबांच्या अंगात खेळत होते. इंग्रज द्वेषाने प्रेरित झालेले ज्योतिबा व त्यांचे मित्र हे रोज इंग्रजी राज्य उलथून पाडण्याचा मनसुबा करीत होते. त्यांना इंग्रजांच्या अचाट शक्तीची काय कल्पना होती? त्यांचे सारे विचारतरंग भावनेच्या भरात तुटत होते. ज्योतिबांनी शेवटची परीक्षा देऊन शाळा सोडली इतक्यातच एके दिवशीं त्यांच्या एका ब्राह्मण मित्राने त्यांना आपल्या लग्नास येण्याबद्दल आमंत्रण दिले व त्याप्रमाणे ज्योतिराव हे मोठ्या प्रेमाने त्या मित्राच्या लग्नप्रसंगास गेले. नवरदेवाची गांवात मिरवणूक निघाली असता तेही इतर ब्राह्मणमंडळीबरोबर दोस्ताच्या जवळ मिरवणुकींतून चालले होते. त्या बिचाऱ्यास काय माहीत की, आपल्या बहूजन समाजास ब्राह्मणाबरोबर नुसत्या साध्या रस्त्याने चालण्याचाहि शास्त्रोक्त रितीने एखाद्या कुत्र्यामांजराइतकासुद्धां हक्क नाही म्हणून!! ज्योतिराव ब्राह्मणांत मिसळून बेधडक चाललेले पाहून ब्राह्मण मंडळीत एकच कुजबुज सुरू झाली. ज्योतिरावांचे हे धर्म बाह्य (?) कृत्य पुष्कळ ब्राह्मणास सहन झाले नाही. आणि ते तिरस्कारबुद्धीने एकमेकांस विचारू लागले कीं, “कायहो! हा कुणबट शूद्र, ब्राह्मण मंडळीत शिरला कसा? याला येथे बोलाविले कोणी? हा उर्मठ आहे कोण? याला ब्राह्मण मंडळीबरोबर चालण्यास शरम कशी वाटत नाही? ब्राह्मण आजच लयास गेले की काय?” हे ब्राह्मणांचे हलकटपणाचे शब्द ज्योतिरावांना ऐकू येत होतेच. इतक्यात त्यांना एका कडव्या ब्राह्मणाने पुढे येऊन मोठ्या शब्दांत दरडावून सांगितले कीं, “अरे ए कुणबटाच्या पोरा खबरदार आम्हा ब्राह्मणाबरोबर चलशील तर! तू जातीने शूद्र असताही आमच्या ब्राह्मण मंडळीबरोबर चालतोस! तुझ्या स्पर्शाने आम्हा ब्राह्मणांना विटाळ होत नाही काय? तू आमचे मागून चल!” अशी धमकी दिल्यावर ज्योतिराव घडीभर आश्चर्यमूढ होऊन जरा गोंधळल्यासारखे झाले.

आपणास ब्राह्मणांनी असे का म्हटले याचा अर्थच त्यांना कळेना. असा अपमान झालेला पाहून ज्योतिराव घरी आले व त्यांनी ही सारी हकीकत आपल्या पूज्य पित्यास कळविली आणि असे होण्याचे कारण त्यांनी त्या म्हाताऱ्यास विचारले. बिचाऱ्या भोळ्या निरक्षर बापास तरी काय ठाऊक होते? त्याने ज्योतिरावास सांगितले कीं, ‘बाबारे ब्राह्मण भूलोकीचे साक्षात् देव आहेत. त्यांना आपणा शुद्रांचा विटाळ होतो. तू त्यांच्यात कशाला गेला होतास? ब्राह्मणांची बरोबरी आपण केव्हाही करू नये; हे इंग्रजी राज्य आहे म्हणून बरं आहे. जर कां आज पेशवाई असती तर बाबा तुझ्या ह्या गुन्ह्याबद्दल तुला काय शिक्षा झाली असती कोणास ठाऊक? आज इंग्रजी राज्य आहे म्हणून काय झाले? ब्राह्मणास नुस्ता सावलीचा विटाळ केल्याबद्दल कित्येक लोकांचे या जवळच्या ‘गुलटेकडी’ च्या मैदानावर अजून पर्यंत हाल करण्यांत येत असत. आणि तू तर बाबा ब्राह्मणाच्या मिरवणूकींत ब्राह्मणाबरोबर चाललास! तुझ्या गुन्ह्याबद्दल त्यांनी तुला सुखाने घरी येऊ दिले हे आपले नशीब समज. नाहीतर आपण गरिबांनी त्यांचे काय केले असते? पुन्हा चुकूनसुद्धा तू ब्राह्मणांच्या सोवळ्यास शिवू नकोस;” बापाने वरील प्रमाणे सांगून ज्योतिरावांची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला परंतु त्यामुळे ज्योतिरावांची समजूत तर पटली नाहीच पण उलट त्यांच्या अंगाचा भडका मात्र झाला. विजापूरच्या दरबारात गेल्यावर शहाजी राजाने शिवाजी महाराजांना बादशहापुढे लवून मुजरा केला पाहिजे म्हणून सांगितल्यावर जसा बाल शिवाजीला संताप येऊन त्याच्या स्वाभिमानाने पेट घेतला, अगदी हुबेहुब त्याचप्रमाणे बापाने सांगितलेली हकीकत ऐकून ज्योतिरावांचा संताप भयंकर वाढला. ते म्हणाले “काय मी ब्राह्मणांशी नमून वागावे? आणि ते का? ब्राह्मणांनी सर्व लोकांना इतके छळले तरी ते आमचे देव! कोठला न्याय हा? कोणते हे शास्त्र? आणि कोठला हा धर्म?” असे पुटपुटून ज्योतिराव गप्प बसले. याचवेळीं ज्योतिरावांच्या विचारसरणीत एकदम फरक पडला! याच

घटकेला महाराष्ट्रातील भिक्षुकी गुलामगिरीच्या नरड्याला शेवटचा घरडा लागला!! महाराष्ट्रात स्वाभिमानाची ज्योत पेटली ती हीच वेळ!!! ज्योतिरावांचे अंग थरथर कापू लागले. आपला हा झालेला मानसिक अपमान त्यांच्याने सहन झाला नाही त्यामुळे ज्योतिरावास त्या रात्री झोप कशी ती आली नाही. आपले समाधान व्हावे म्हणून ज्योतिरावांनी पुढे काही दिवस हिंदु धर्मातील बऱ्याच धर्म ग्रंथांचे वाचन केले. याशिवाय संत शिरोमणी, श्री तुकाराम महाराजांची गाथा, ज्ञानेश्वरी इत्यादि भागवत धर्मीय ग्रंथ, मार्टीन लूथरचे चरित्र व प्रो ० वुईलसन, सर विल्यम जोन्स वगैरे लोकांनी हिंदू धर्मावर इंग्रजीत लिहिलेली पुस्तके व लेख वाचले. याशिवाय म. बुद्ध, बसवेश्वर, तिर्थंकर इत्यादि धर्मसुधारकांच्या ग्रंथाचाहि त्यांनी थोडा अभ्यास केला, तेव्हा ज्योतिरावांच्या लक्षात आले की आज ज्याप्रमाणे हिंदू धर्मात अन्याय व अनीती माजली आहे आणि आज जसे हिंदु धर्माचे विकृत स्परूप नजरेस पडते तसे ते पूर्वी नव्हते. मूळचा हिंदू धर्म शुद्ध स्वरुपाचा होता आणि त्याचप्रमाणे त्यांना हिंदु धर्मातील खुळचट चालीरितींची व अंधरुढीची बरीच कल्पना झाली. त्यांना पक्के कळून चुकले की, सर्व मानव प्राणी एका ईश्वराची लेकरे असून, तो सर्वांवरच सारखे प्रेम करतो. आपआपसांत जातीभेद माजवून ऊंच निचत्वाच्या जोरावर ब्राह्मणांनी केवळ सोवळ्या ओवळ्याचे बंड माजविले व कपटाच्या जोरावरच ते इतरांचे देव बनले. कष्ट न करता स्वतः चा तळीराम गार करण्यासाठी क्षिक्षुक शाहीने देशातील अखिल जनतेत धर्मभोळेपणा उत्पन्न केला. आपली चैन निरंतर चालू राहावी म्हणून जनतेचे शिक्षण तोडून तिला अज्ञानात ठेवण्याची कोशीश केली. कथा-शास्त्र व पोथ्या पुराणे रचून त्याद्वारे लोकांचा स्वाभिमान मारला. जातिभेदाचे अभेद्य तट पाडून समाजाची छकले पाडली. आपले स्वामित्व कायम रहावे म्हणून जातीजातींत ऊच नीचपणाचे आपपर भाव उभे करून ठेविले. आपण नीच आहोत असा प्रत्येकात भास उत्पन्न केला व तसे मानण्याचे प्रत्येकात समाधान उत्पन्न केले! अशा प्रकारे भिक्षुक शाहीने स्वतः च्या स्वार्थासाठी हिंदु समाजाची बुद्धी मारली, स्वाभिमान मारला व बल नष्ट केले. पेशवाईत तर या गोष्टी थेट कळसास जाऊन पोहोचल्या. याचा परिणाम साहजिकच असा घडून आला की, देशातील मराठी स्वराज्य बुडून परकीय अशा इंग्रजी राजसत्तेचे पाय या देशाला लागले. देशाच्या पारतंत्र्याचे हे मूळ ज्योतिरावांच्या चांगलेच लक्षात आले.

आपल्या देशातील स्वकीय बुधमाऱ्या भिक्षुकशाहीला शह देऊन तिच्या गुलामगिरीत काळ कंठणाऱ्या, देशातील बहुजन समाजात बुद्धी, स्वाभिमान व बल उत्पन्न केल्याशिवाय आपल्या भारताचा भाग्योदय होणे नाही ही खुणगाठ ज्योतिबांनी आपल्या मनाशी पक्की बांधून आपण राजकीय बंड उभारण्याऐवजी सर्व सुधारणांचे मूळ व सर्व स्वातंत्र्याचे उगमस्थान जे शिक्षण त्याचा देशातील बहूजन समाजात प्रसार करण्याचे कंकण आपल्या हातात बांधून समाजातील भिक्षुकी भेदनीतीचा नायनाट करण्याचे व रंजल्या गांजल्या बहुजन समाजाला उन्नत पथावर आणून सोडण्याचे प्रयत्न आजन्म करण्याचा दृढनिश्चय ज्योतिरावांनी आपल्या मनाशी केला!

यावेळी ज्योतिरावांनी सरकारी नोकरी करण्याचे मनात आणले असते, तर कदाचित त्यांची बढती होत होत ते मोठे हायकोर्ट जज्ञहि झाले असते कारण अव्वल इंग्रजीचा काळ असा होता की, त्यावेळी ट, फ शिकलेल्या गृहस्थासहि मोठमोठ्या हुद्याच्या जागा मिळत असत, अशावेळी फुले हे कदाचित मोठे हुद्देदार बनून त्यांनी मोठ्या सुखासमाधानाने आपला संसार थाटला असता, परंतु त्यांनी महाराष्ट्रीय जनता त्यावेळी जागी केली नसती, तर आज हजारो गोरगरिबांची घरे केव्हाच धुळीस मिळाली असती! नोकरीत त्यानी पैसा व लौकिक मिळवून आपल्या पोराबाळाना हवेली, माडी अगर एखादे सुंदर घर बांधले असते, परंतु दीन दुबळ्या लोकांचे घरावर नित्य फिरत असलेला नांगर आज थोड्या अंशानेहि थांबला नसता!! दुष्ट कारकुनाच्या दुष्कृत्यास यश येऊन ज्योतिबा बागेत काम करून कदाचित् मोठे बागवान बनले असते,

अनुक्रमणिका

परंतु ते जर त्यावेळी सार्वजनिक कार्यात पडले नसते तर, महाराष्ट्राचा राष्ट्रीयबाग आज इतका हिरवागार व टवटवीत दिसतांना!!! खरोखरच फुले हे राष्ट्रीय बाग फुलविणारे थोर माळी होते! फुल्यांच्या हातून गुलामगिरीच्या नरड्याला फास लावून लाखो दीनदुबळ्यांचा उद्धार करावा असा भविष्य काळाचा संकेत होता, आणि म्हणूनच या तरुणवीराने आपल्या वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी सार्वजनिक कार्यात पाऊल टाकून राष्ट्रकार्य करण्याची भीष्म प्रतिज्ञा केली.

अनुक्रमणिका

# प्रकरण ३ : मुलींची पहिली शाळा

प्रथम शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेण्याचे ज्योतिरावांनी ठरविल्याचे मागील प्रकरणी सांगितले आहेच. हे कार्य कसे तडीस न्यावे याचा साधक बाधक विचार करता, त्यांना वाटले की, पहिल्याने स्त्री वर्गातच शिक्षण प्रसार करावा. कारण पूर्वकाळी कौशल्या, देवकी, कुंती, पार्वती, सीता, द्रौपदी इत्यादि राष्ट्रमाता सुशिक्षित होत्या म्हणूनच त्यांच्या पोटीं मोठमोठे वीर पुरुष पैदा झाले आणि अलीकडच्या काळात देखील श्रीशिवाजी, जॉर्ज वॉशिंग्टन, नेपोलियन बोनापार्ट इत्यादि जगविख्यात पुरुषांच्या आया सुशिक्षित होत्या म्हणूनच ते इतक्या योग्यतेस चढले. प्रत्येक आईची योग्यता फार मोठी आहे प्रत्येक राष्ट्रपुरुष प्रथम आईच्या तालमीत तयार होतो. त्यांतून चांगल्या आईच्या पोटची मुले चांगली व्हायचीच.

॥ जिच्या हाती पाळण्याची दोरी । तीच जगाते उद्धारी ॥

या उक्तिस अनुसरून राष्ट्रातील भावी माताच पहिल्याने सुशिक्षित झाल्या पाहिजेत अशी त्यांची ठाम समजूत होऊन प्रथम स्त्री वर्गात शिक्षण प्रसार करावयाचा असा त्यांनी निश्चय केला. पण कोणतीही सुधारणा लोकांपुढे मांडण्यापूर्वी ती प्रथम आपल्या कृतीत उतरून घेणे ज्योतिरावांना अगत्य वाटले व मुलींची शाळा उघडण्यापूर्वी त्यानी आपल्या धर्मपत्नीस लिहिणे वाचणे शिकवावयास सुरवात केली.

वैदिक कालानंतर स्त्री शिक्षणाची शाळा कोणी काढली होती हे आमचा इतिहास देखिल सांगत नाही. वैदिक काळी स्त्रियाना शिक्षण घेण्याची मुभा होती, परंतु मानवी हक्काचा पुरस्कार करून आधुनिक काळांत त्यांच्या शिक्षणाची पहिल्याने जर कोणी काळजी घेतली असेल तर ती ज्योतिरावांनी होय. आधुनिक काळी हिंदुस्थानात ज्योतिराव फुले यांनीच पहिल्याने मुलींची खाजगी शाळा काढून स्त्री शिक्षणास प्रथम चलन दिले!!

ज्योतिरावांनी ज्यावेळी शिक्षण प्रसाराचे हे काम हाती घेतले त्यावेळी उभ्या महाराष्ट्रात कोठे मुलाकरिता सुद्धा एक देखील मराठी शाळा सरकारकडून उघडलेली नव्हती मग मुलीच्या शाळेची गीष्ट कशाला? अशा त्या अज्ञातकाळी प्राथमिक शिक्षणाच्या शाळेची पहिली मुहूर्तमेढ विद्या विभूषित इंग्रज सरकारच्याहि अगोदर आमच्या ज्योतिबांनीच प्रथम ठोकली!

बरोबर १८४८ सालच्या आरंभीची गोष्ट. ज्योतिरावांनी पुण्यास बुधवार पेठेतील भिड्यांच्या वाड्यात महाराष्ट्रातील मुलींची पहिली शाळा स्थापन केली. त्यावेळी या कामी त्यांना रा. जगन्नाथ सदाशिवजी या सद्गृहस्थाने बरीच मदत केली. ही शाळा स्थापन झाल्याने गांवातील सारे लोक खवळून गेले. स्त्रियांना स्वातंत्र्य असू नये कारण त्या महाकपटी, स्वभावता दुष्ट, अविचारी, विषयी, लबाड व मुर्ख असतात, त्यांनी भली बुरी पतीची इच्छा तृप्त करावी, हाच त्यांचा धर्म व हेच त्याचे कर्तव्य आणि साफल्य! स्त्रियांना शिक्षण दिल्याने अनर्थ ओढवतील अशी हजारो वर्षांपासून ब्राह्मणांच्या हिंदु शास्त्रांनी लोकांची समज घालून दिलेली असल्यामुळे फुल्यांच्या या शाळेने साऱ्या पुण्यात धर्म बुडाला (?) म्हणून एकच हाहाःकार झाला व स्त्रीशिक्षणासारख्या पवित्र कार्यास त्यांना चोहोंकडून विरोध होऊ लागला. ज्योतिबांच्या चिकाटीने मुलींची संख्या मात्र झपाट्याने वाटू लागली. त्यामुळे ते काम त्यांच्या एकट्याने झेपेना, म्हणून आपणासारखा फुकट काम ककरणारा दुसरा शिक्षक कोण मिळवावा याची ज्योतिरावांना मोठी काळजी पडली. पेशव्यांच्या राजधानीत खुद्द पेशव्यांचे सारे भाऊबंद विरुद्ध स्त्रीशिक्षणासारख्या अपवित्र (?) व अधर्म (?) प्रसारक

कार्यास ज्योतिरावांना धर्मपत्नीविना मदत तरी कोण करणार? ज्योतिरावांची श्रीसावित्रीबाई ह्या एक रत्न होत्या. त्या नेहमी पतीच्या अर्ध्या वचनात वागत असत. या आपल्या धर्मपत्नीस ज्योतिरावांनी आपल्या मदतनीस म्हणून मुलींच्या शाळेवर दुसरे शिक्षक नेमले.

आता मात्र काही अधम भटांनी आपल्या तोंडाचे घाणीचे तलाव बनविले. व त्यांत त्याच्या जीभा मनसोक्त गटंगळ्या खाऊ लागल्या. त्यांना ज्योतिरावांच्या धर्म पत्नीची निंदा ही पुराणे बनविली. पण त्या साध्वीची नुसती निंदा करूनच ते थांबले नाहीत. तर सावित्रीबाई शाळेत जात असता कित्येक धर्मशील (?) ब्राह्मणांनी त्या बाईच्या अंगावर दगड व खडे फेकण्यास आपली पुण्याई खर्च केली. हे पाहून भटांच्या स्वर्गातील ईश्वरास साध्वीचा छळ करणाऱ्या या रावण कुंभकर्णाच्या ब्राह्मण जातभाईबद्दल काय वाटले असेल ते वाटो!

पुढे सावित्रीबाईचे संरक्षण करण्याकरिता ज्योतिरावांना एक पट्टेवाला ठेवावा लागला. पण जेव्हा खडे फेकण्याचा भागुबाई प्रयत्न करूनही त्याचा उपयोग होईना; तेव्हां भटांनी कुलांची अब्रू जाण्याची सून बिघडण्याची व धर्म बुडून बेचाळींस कुळ्या नरकात जाण्याची गोविंदरावांना धास्ती घातली व सूनेला शाळेत शिकवावयास पाठवू नये अशी त्यांना समज दिली. शेजारीपाजारी, जात भाई व खरे पण भोळे हितचिंतक यांनाही सावित्रीबाईंना शिकविण्यास जाणे ही गोष्ट आवडेना. तेव्हा त्यांनी नाना प्रकारे बोलून कधीकधी मन वळवून तर कधी मर्मभेद करून असे अनेक प्रकारे गोविंदरावांचे डोके उठविले! शेवटी ह्या गोष्टी भोळ्या म्हाताऱ्यास बरोबर पटल्या व शाळेत शिकवावयास जाऊ नये अशी सासऱ्याकडून सावित्रीबाईंना आज्ञा करण्यात आली. म्हाताऱ्याची समजूत घालण्याचा ज्योतिरावांनी परोपरीने प्रयत्न केला; परंतु मुलगा आपल्या कुळास बट्टा लावीत आहे, अशी म्हाताऱ्याची पक्की समजूत घातलेली असल्यामुळे सुनेने शिकवावयास जाण्याचे बंद न केल्यास तुम्ही उभयतांनी माझ्या घरातून चालते व्हावे, अशी बापाकडून ज्योतिरावास अखेरची ताकीद दिली गेली. त्या बिचाऱ्याला काय माहीत की, आपण आपल्या ज्या मुलाला घराबाहेर घालवीत आहो, तोच मुलगा मागेपुढे मोठा महात्मा बनून लाखो लोकांच्या अंतः करणात कायमचे घर करून तेथे निरंतर राहणार आहे म्हणून!

सासऱ्याची आज्ञा झाल्याबरोबर काय करावे याचा सावित्रीबाईस मोठा प्रश्न पडला. पतिराजांची आज्ञा पाळावी तर सासऱ्यास व गणगोतास सोडावे लागून त्यांचा आपलेवर रोष होणार; आणि होत आहे त्यापेक्षाही जास्त जननिंदा व त्रास सोसावा लागून घरादारावाचून आजच गल्लीवर आपल्या संसाराचे उघडे प्रदर्शन मांडावे लागणार. बरे तसे न करिता सर्वांची मर्जी राखण्याचा प्रयत्न करावा तर पतीच्या पवित्र कार्यात खंड पडून पतिआज्ञेचा भंग होतो आणि त्यामुळे आपल्या हातून पतिद्रोहाचे पाप घडून पतिव्रता धर्म पायाखाली तुडविला जातो. असे एकना दोनच नव्हे तर शेकडो विचार त्या साध्वीच्या डोक्यांत आले! शेवटी आपल्या जन्माच्या सोबत्याच्याच मार्गाने जाण्याचा त्या माउलीने निश्चय केला!!

॥ सत्यासत्याशी मन केले ग्वाही । मानियले नाही बहुमता ॥

असा संकल्प करून या उभयतांनी स्वार्थास व सुखसमाधानास लाथ मारली आणि घरातील वडील माणसाना नमस्कार घालून आपले पाऊल घराबाहेर टाकले!!! अशा प्रकारे आपल्या वडिलोपार्जित घरादारास व मिळकतीस त्यांना मुकावे तर लागलेच परंतु आपल्या कृपाळू व प्रेमळ अशा बापाच्या पितृप्रेमापासूनही आमच्या हतभागी ज्योतिरावास आचवावे लागले. पण एवढे मात्र खरे की, प्रतापशाली

अनुक्रमणिका

शिवरायाच्या तिघा मित्रांप्रमाणेच ज्योतिरावांना त्यांच्या शाळेतील तिघा मित्रांपासूनच वेळप्रसंगी यथाशक्ती मदत होत असे. यावेळी त्यांनी ज्योतिरावांस बरीच मदत केली. ज्योतिरावांनी गंज पेठेत एक घर घेऊन त्यात ते राहू लागले. ते घर अद्यापि पुण्यास गंज पेठेत "फुल्यांचा वाडा" म्हणून प्रसिद्ध आहे.

## मुलींची पहिली शाळा

बापातून विभक्त झाल्यामुळे ज्योतिरावांना जाणूनबुजून दारिद्र्याशी झगडावे लागून स्त्रीशिक्षणासारख्या पवित्र कार्यासाठी आपले रक्त आटवावे लागले. अज्ञानामुळे एतद्देशीय जनतेने त्यावेळी त्याच्या कार्याची जरी किंमत केली नाही, तरी या कर्मवीराचे कार्यच इतके उच्च होते की, विद्याविभूषित अशा परकीय सरकारास त्यांचा गौरव केल्याशिवाय राहावले नाही. यावेळी बोर्ड ऑफ एज्युकेशनचे प्रेसिडेंट सर आर्स्कीन पेरी हे होते. सरकारचे बडे अंमलदार या नात्याने सरकारात त्यांचे मोठे वजन होते. ज्योतिरावांच्या स्त्रीशिक्षणाची पवित्र कामगिरी प्रथम त्यांच्या लक्षात आली व सरकारकडून या एतद्देशीय तरुणाचा योग्य गौरव होऊन त्याला प्रोत्साहन देण्यात यावे म्हणून या साहेबांनी मुंबई सरकारास तसे लिहिले. त्यांच्या लिहिण्याचा परिणाम असा झाला की, इसवी सन १८५२ साली मुंबई सरकारने पुण्यास विश्राम बागेत एक दरबार भरवून ज्योतिरावांस दोनशे रुपये किंमतीची एक शाल अर्पण केली व त्यांचा गौरव केला.

या समारंभाची हकीकत त्यावेळच्या इंग्रजी वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध झाली असून या शाळासंबंधी त्यावेळच्या मुंबई प्रान्ताच्या सरकारी शाळाखात्याच्या रिपोर्टातून वर्णन आले आहे व त्यांत ज्योतिबाच्या कार्याची सरकारकडून स्तुती करण्यात आली आहे हे विशेष होय.

असो; या समारंभास लहान मोठे कित्येक युरोपीयन व हिंदी सरकारी अंमलदार आणि शहरातील बरेच मोठमोठें नागरिक हजर होते. यावेळी स्त्री शिक्षणाचे कामी आपणास मदत करणाऱ्या रा. जगन्नाथ सदाशिवजी वगैरे मित्रांचा ज्योतिरावांनी उल्लेख करून ना. गव्हर्नर साहेबांचे आभार मानताना त्यांनी उद्गार काढले ते ध्यानात ठेवण्यासारखे आहेत. त्यावरून त्यांच्या अंगी असलेल्या लीनपणाची व कर्तव्यतत्परतेची जाणीव चांगलीच व्यक्त होते, ज्योतिराव म्हणाले, 'मी विशेष कांहीच केले नाही. माझे कर्तव्य मी केले. सर्वांनी हाच कित्ता गिरवावा व सरकारने प्रथम स्त्रीशिक्षणाकडे ताबडतोब लक्ष पुरवावे.' ज्योतिरावांच्या या उद्गाराचा त्यावेळी सर्वांवर मोठाच परिणाम झाला. इ० स० १८४८ च्या सुमारास पुण्यात काही हिंदू व युरोपियन लोकानी 'दक्षिणाप्राईज कमेटी' स्थापन केली होती. त्या कमेटीमार्फत फुल्यांच्या या शाळेला ७५ रुपये महिना मदत म्हणून मिळू लागली. तेव्हा ज्योतिरावानी एक कमिटी नेमून व पुण्यात आणखी दोन तीन शाळा स्थापन करून त्या त्या कमिटीच्या ताब्यात दिल्या. विश्राम बागेतील फुल्यांच्या भाषणाचा सरकारवर देखील इतका मोठा परिणाम झाला की सरकारने महाराष्ट्रात ताबडतोब मुलींना शिक्षण देण्याची एक नवीन योजना तयार करून त्याप्रमाणे अम्मलवारी सुरू केली. हे पाहून ज्योतिरावानी आपल्या शाळा सरकारी शाळाखात्याच्या हवाली केल्या. ज्योतिरावानी स्थापन केलेल्या शाळांपैकी विश्राम बागेजवळील एका शाळेला सरकारने पुढे इंग्रजी शिक्षणाचे वर्ग जोडून त्या शाळेला हायस्कूलचे स्वरूप दिले! ज्योतिरावानी स्थापन केलेली पहिली मुलींची शाळा 'मुलींचे हायस्कूल' या रूपाने पुण्यात आज चालू आहे!

# प्रकरण ४ : अस्पृश्यांची पहिली शाळा

मुलींच्या शाळा सुरळीतपणे चालू लागल्यानंतर ज्योतिरावांच्या नजरेस दुसऱ्या ज्या अनेक गोष्टी आल्या, त्यापैकी अस्पृश्यांच्या शिक्षण प्रसारास प्राधान्य देऊन त्या गोष्टीकडे लक्ष पुरवायचे असे त्यांनी ठरविले व त्या दिशेने प्रयत्न करावयास त्यांनी सुरुवात केली. आपल्या देशातील सहा, सात करोड लोक विद्येच्या अभावी हजारो वर्षांपासून आपली माणुसकी गमावून बसले असून, ते धार्मिक गुलामगिरीच्या घोर नरकात पडले आहेत आणि त्यामुळेच हिंद राष्ट्र लुळे बनले असून याचा सारखा ऱ्हास होत आहे, ही गोष्ट जोतिरावांच्या नजरेस चांगली येऊन चुकली. या वर्गात विद्येचा प्रसार झाल्याशिवाय त्यांची अस्पृश्यता दूर होणार नाही; आणि विद्येखेरीज ते आपली उन्नती करून घेऊन राष्ट्रातील वरिष्ठ वर्गात तादात्म्य पावणार नाहीत, असे त्यांना नेहमी वाटत असे. एरव्ही हिंदुस्थानात व हिंदुधर्मांत असलेले अनेक  पंथ, जाती व ऊच-नीचत्वाचे थोतांड वाढवून स्पृश्यास्पृश्यतेचे बंड माजविण्यात आले नसते, तर हिंदू तेवढा एक या भावनेने साऱ्या लोकांत एकी व प्रेम नांदले असते. आणि मग अशा वेळी हिंदू धर्माकडे व हिंदुस्थानकडे नुसत्या वाकड्या नजरेने पाहण्याची छाती तरी कोणास कधी झाली असती काय? हिंदुधर्मास जर जिवंत ठेवावयाचे व हिंदराष्ट्रास जर स्वतंत्र करावयाचे तर देशातील अस्पृश्य समाजात विद्यार्जनाची वाढ ही केलीच पाहिजे; असा त्यांनी पक्का निश्चय केला आणि इ. सन १८५१ साली त्यांनी पुणे मुक्कामी नानांच्या पेठेत एकदाची अस्पृश्यांची पहिली शाळा घातली! ही शाळा घातल्याने पुण्याच्या ब्राह्मणांत फारच खळबळ उडाली!! स्त्रिया व अतिशुद्र हे उभय वर्ग ब्राह्मणांच्या मते अपवित्र! त्यांना विद्या शिकविणे व त्यांनी ती शिकणे हे ब्राह्मणांच्या दृष्टीने अघोर पाप! शूद्रांना विद्या नसावी म्हणून चांगले मोडी अक्षर लिहिणाऱ्या सोनार, प्रभू वगैरे जातीच्या लोकांचे पेशवाईच्या रावणी राज्यात हात तोडून टाकण्यात आले होते. आणि त्याच पेशवाईत विद्या शिकविल्याच्या आरोपावरून शेकडो शुद्रांच्या गळ्यास गळफांस देऊन फासावर लटकविण्यात आले होते. ज्या पेशवाईत ब्राह्मणांनी एवढी सैतानी सत्ता गाजविली, त्याच पेशवाईचे मढे तिरडीवर चढवून इंग्रजांनी मसणवटीत लावले नाही, तोच फुल्यासारख्या एका कुणब्या-माळ्याने महारमांगाच्या मुलांमुलीकरिता शाळा काढून ब्राह्मणी नीतीचा उघड घड धिः कार करावा हे पुण्यातील पेशव्यांच्या खुद्द भट्ट भाऊबंदांना कसे पाहवणार? हरप्रकारे विघ्ने आणून ही शाळा बंद पाडावी असे त्यांना वाटू लागले. परंतु ज्योतिराव स्वतः शिक्षकाचे काम करीत होते, त्यामुळे विरोधी ब्रह्मवृंदांचा काहीच उपाय चालेना. तेव्हा हा अधर्म व भ्रष्टाचार होत आहे असा ब्राह्मणांनी डंका पिटून हे धर्मावरचे संकट (?) नाहीसे करण्याकरिता त्यांनी धर्माविषयी खरी आस्था बाळगणाऱ्या पण धर्मभोळ्या मराठामाळ्यांना व महारामांगाना जेव्हा चिथविले, तेव्हा मात्र ज्योतिरावांना कोण त्रास झाला हे वाचकांना पुढे कळेलच. ज्योतिरावांच्या उपदेशाने जी काही अस्पृश्यांची थोडी मुले शाळेत येत, त्यांपैकी वरीष्ठ वर्गाच्या धमकीने व त्रासाने बरेच अस्पृश्य लोक आपली मुले पुन्हा शाळेतून काढून घरी बसवीत. ज्योतिरावांनी मोठ्या सायासाने जी मुले आज शाळेत आणावीत तीच उद्या घरी बसत. असा जरी प्रकार होता, तरी ते कधी निराश मात्र झाले नाहीत. शिक्षण प्रसाराचा उपदेश करण्याची कला ज्योतिरावांना चांगली साधलेली होती. त्यांनी महारवाड्यात व मांगवाड्यात स्वतः फिरून चिकाटीने मेहनत घेतली. त्यामुळे त्यांच्या शाळेत महारमांगांच्या मुलांची संख्या थोडी थोडी वाढू लागली. तेव्हा अर्थातच शाळेत शिकविण्याचे काम एकट्याने झेपेना, म्हणून त्यांना एक दुसरा शिक्षक पहावा लागला. त्यावेळी मागासलेल्या ब्राह्मणेतर समाजापैकी एखादा शिक्षक मिळणेसुद्धा दुर्लभ होते म्हणून निरुपायाने त्यांनी एक ब्राह्मण मास्तर ठेवला. ज्योतिरावांच्या या शाळेस अडथळा करण्यास ही एक उत्तम संधी आहे, हे पाहून ब्राह्मणांनी ब्राह्मण मास्तराला फूस देऊन घरी बसविले. तेव्हा मात्र ज्योतिरावांना ब्राह्मणांच्या अधम नीतीचा अतिशय संताप आला. परक्या ख्रिस्ती मिशनरी लोकांइतकेही स्वधर्मीय ब्राह्मण धर्मगुरू अस्पृश्यांवर प्रेम न करता उलट त्यांचा किती द्वेष करतात

अनुक्रमणिका

आणि ब्राह्मण हे हिंदु धर्माचे कसे शत्रु आहेत. हे दाखविण्याकरिता त्यांनी एक पांच अंकी नाटक रचून न दक्षिणा प्राईज कमेटीस अर्पण केले, पण सदर कमेटीतील ब्राह्मण मेंबरांनी व ब्राह्मण मेंबरांच्या दिशाभुलीस फसून युरोपियन सभासदांनी हे नाटक प्रसिद्ध करण्यास नकारघंटा दिली. खाजगी शाळा चालविण्यास पैशांची नेहमी अडचण पडत असल्यामुळे हे नाटक स्वखर्चाने प्रसिद्ध करण्याची ज्योतिरावांना बिलकूल सोय नव्हती आणि म्हणून त्यांनी ते त्यावेळी प्रसिद्ध केले नाही. असो! अशाप्रकारे एकाएकी ब्राह्मण मास्तराने शाळा सोडून दिल्यामुळे व अस्पृश्यांचे शाळेत शिकविण्याचे काम करण्यास दुसरे कोणी तयार नसल्यामुळे ज्योतिरावांनी सावित्रीबाईस या शाळेवरही दुसऱ्या शिक्षकांचे काम करावयास सांगितले आणि त्या दीनांच्या माऊलीनेही ते मोठ्या आनंदाने कबूल केले! अशा प्रकारे आपण आडकाठी आणली असताही ज्योतिरावांनी ती शाळा पुन्हा सुरळीत चालविली हे पाहून पुण्यातील ब्राह्मणांचे साफ डोळे उघडले! काळोख व सूर्य यांत जितके सख्य तितकेच बुद्धी आणि गुलामगिरी यांत ते असते ही गोष्ट भिक्षुकशाही पुरतेपणी जाणून आहे आणि म्हणूनच तिने देशातील बहुजन समाजाला आणि त्यांतल्या त्यांत अस्पृश्य मानलेल्या वर्गाला हजारो वर्षांपूर्वीपासून तो आजपर्यंत विद्येपासून अगदी दूर ठेविले होते! भिक्षुकशाही ही स्त्रिया व स्पृश्य ब्राह्मणेतर वर्ग यांस आपले 'गुलाम' मानीत असून अस्पृश्य वर्गाला आपला 'बंदा गुलाम' समजते! गुलामांनी कष्टावे व त्यावर भिक्षुकशाहीने जगावे असा या दोहोंतील अन्योन्य संबंध पूर्वापार चालत आलेला आहे! गुलामांनाच नव्हे तर तिच्या बंद्या गुलामांनाही माणुसकी देणारी विद्या देण्यासाठी ज्योतिरावांनी पुण्यात 'अस्पृश्यांची शाळा' काढलेली पाहून भिक्षुकशाहीला ते आपल्यावरील 'काळ संकट' वाटले असल्यास नवल कोणते? या संकटाच्या प्रतिकारासाठी भिक्षुकशाहीने आपल्या हातचे काम सोडून देण्यासाठी ज्योतिबांची नानाप्रकारे समज घातली. हस्तेपरहस्ते धमक्या दिल्या व या सर्व प्रयत्नांचा काहीच उपयोग होत नाही असे जेव्हा पाहिले तेव्हा पुण्यातील भिक्षुकशाहीचे म्होरके प्रती चाणाक्य कृष्णभट व त्याचे साथीदार यांनी भिक्षुकशाहीच्या या दुष्मनावर पण दीनांच्या दिव्य ज्योतीवर त्याचा मुडदा पाडण्यासाठी आपल्याजवळचे निर्वाणीचे अमोघ कपटास्त्र मोठ्या शिताफीने फेकले! हे कपटास्त्र ज्योतिबांवर जाऊन पडण्यापूर्वी भिक्षुकशाहीने पुण्यास ज्योतिबांविरुद्ध कोणता गहजब उठविला होता? 'कलीयुग आले', 'धर्म बुडाला', 'पृथ्वी प्रलयकाळ समीप आला', 'ईश्वर कोपला', 'विद्या नीचघरी गेली', 'अब्रह्मण्यं अब्रह्मण्यं' असा एकच कलकलाट तिने चोहोंकडून सुरू करून सर्व जनतेस भेदरून सोडले! ज्योतिबांवर गांवभर बहिष्कार पडला व चोहोकडून संकटाचे डोंगर त्यांच्यावर कोसळू लागले! ज्या समाजाच्या उद्धाराकरिता ज्योतिबा हे सर्व काही करीत होते त्या समाजाची अशा प्रसंगी वास्तविक ज्योतिबांना मदतच मिळावी पण - धर्मभोळेपणा व अज्ञान यामुळे तो समाज तर हजारो वर्षांपासून गुलामगिरीत गुरफटून गेला होता. ज्योतिरावांच्या या कार्याची खरी कल्पना त्यांच्या गावीही नव्हती; त्यामुळे या समाजाची असल्या कामी मदत मिळणे एकीकडेच राहून उलट विरोध तेवढा झाला. इतकेच नव्हे तर उलट या प्रसंगी कृष्णभटाच्या कापट्यात फसून या समाजातीलच काही असमंजस लोक खुद्द आपल्या उपकारकर्त्याच्या - ज्योतिबांच्या प्रत्यक्ष जिवावर उठले!

आतापर्यंत आपण राष्ट्रापुढे मांडलेल्या सुधारणा लोकात कधी व कशा रूढ करता येतील आणि बहुजन समाजाची दुःस्थिती कोणत्या मार्गाने नाहीशी करता येईल, याचा विचार रात्री निजतेवेळी ज्योतिरावांच्या डोळ्यापुढे नेहमी उभा रहात असे व त्याचा ते कधी कधी रात्रीचे बारा बारा वाजेपर्यंत विचार करीत असत. सावित्रीबाई अस्पृश्यांच्या शाळेत शिकविण्यास जाऊ लागल्यानंतरची गोष्ट. ज्योतिराव नेहमीप्रमाणे एके रात्री आंथरुणात पडल्यापडल्या विचार करीत असता मध्यरात्रीच्या सुमारास दोन मारेकरी मोठ्या युक्तीने त्यांच्या घरात शिरले. हातांत शस्त्र असलेले दोन इसम दिवा विझवून आपणास ठार मारण्याच्या विचारात आहेत असे त्यांच्या लक्षात आले. हें पाहून ते ताडकन आंथरुणावर उठून बसले.

अनुक्रमणिका

ज्योतिरावांचे ते गंभीर स्वरुप पाहून मारेकरी जागचे जागीच विरले! कारण ईश्वरास यावेळी ज्योतिरावांचे रक्षण करावयाचे होते. ज्योतिरावांसारख्या निरपराधी, परोपकारी व तेजः पुंज वीर पुरुषावर शस्त्राने वार करण्याची त्यांना हिंमत होईना. आपण हे काय करीत आहोत? ज्योतिरावांनी असा कोणता अपराध केला आहे की, आपण त्यांना आज ठार मारावयास तयार झालो? ज्योतिराव आपणा ब्राह्मणेतरांच्या सुधारणेकरिता झटत असता, कपटी कृष्ण भटाच्या पैशाकडे पाहून आपण त्यांचा खून केल्यास देव आपणास मरणानंतर कोणती शिक्षा देईल? वगैरे विचार त्यांच्या डोक्यांत घोळत आहेत, इतक्यात ज्योतिरावांनी मारेकऱ्यांना आपले घरात इतक्या रात्री येण्याचे कारण विचारले असता, मारेकरी फारच खजील झाले व शस्त्र खाली टाकून ज्योतिरावांच्या पायावर मस्तक ठेवून त्यांनी आपल्या कृतकर्माची माफी मागितली व पुढे ते ज्योतिरावांचे एकनिष्ठ सेवक बनून चांगले विद्यावंत झाले. या दोघांपैकी एक धोंडीराम नामदेव हा पुढे तर मोठा पंडित बनून त्याने श्रृंगेरीच्या शंकराचार्यास वादात जिंकून सत्यशोधक समाजाला अजिंक्य पत्र मिळविले! असो; इतके मात्र खरे की कृष्ण भटादि भिक्षुकांचा कपटी डाव सपशेल फसला!

अशा प्रकारे एका मोठ्या प्राणांतिक संकटातून आपली सुटका झाली याबद्दल ज्योतिरावांनी ईश्वराची मोठ्या प्रेमाने व भक्तीभावाने स्तुती केली. आणि शिक्षणासारख्या पवित्र कार्यात ईश्वराची आपणास मदत आहे म्हणूनच आपले रक्षण झाले अशी ज्योतिरावांची दृढ भावना झाली व त्यामुळे आपल्या हातचे कार्य न सोडता त्यांनी अस्पृश्यांच्या आणखी काही शाळा स्थापण्याचा निश्चय केला!

अस्पृश्य वर्गाकरिता पहिली शाळा स्थापन केल्यापासून ज्योतिराव स्पर्शास्पर्श पाळीत नव्हते. त्यावेळी परिस्थिती किती नाजूक होती याची वाचकांस कल्पना आहेच. त्याकाळी अस्पृश्यांच्या नुसत्या सावलीचा विटाळ कोणास खपत नसे; तर मग अस्पृश्योद्धार झाला पाहिजे असे तोंडाने कबूल करणार तरी कोण? ज्योतिराव बोलत त्याप्रमाणे कृतीही करीत आणि म्हणूनच आधुनिक सुधारकांत आज त्यांची मुख्यस्थानी गणना होते. ज्योतिरावांनी आपल्या विहीरीवर व हौदावर पाणी भरण्याकरिता इ० स० १८५१ साली अस्पृश्य लोकांना परवानगी दिली. ज्योतिरावांचा तो हौद पुण्यास अजूनही "फुल्यांचा हौद " म्हणून गंज पेठेंत प्रसिद्ध आहे.

आज लोकांत शिक्षणाविषयी गोडी झालेली असून परिस्थितीही बरीच अनुकूल आहे. पण अशाही परिस्थितीत मोठ्या कष्टाने स्थापन झालेल्या बहुतेक संस्था केवळ मदतीच्या अभावी जन्मताच नामशेष होतात आणि त्यांतून एकादी संस्था कशीबशी चाललीच तर चालकास कितीतरी त्रास व कष्ट सहन करावे लागतात. ही स्थिती लक्षात ठेवून जर त्यावेळच्या प्रतिकूल व बिकट परिस्थितीत आणि त्याही अस्पृश्यांच्या शाळांसारख्या संस्था १० - १२ वर्षेपर्यंत अखंड चालू ठेवण्यात ज्योतिरावांना किती कष्ट व सायास पडले असतील आणि त्यांना किती यातायाती सहन कराव्या लागल्या असतील, याचा विचार केला तर ज्योतिरावांच्या अफाट दिर्घोद्योगाची नुसती कल्पनाही करता येत नाही आणि ही शाळा चालवितांना त्यांना नुसती आर्थिक अडचणच सोसावी लागली असे नसून लोकांकडून होणारा आपला उपहास व अपमानही सहन करावा लागला. जेथे अस्पृश्यांच्या सावलीचाही विटाळ लोकांस खपत नसे, तेथे ज्योतिरावास या कामी मदत करणार तरी कोण? मदत तर राहू द्या, परंतु त्यांच्याशी कोणी प्रेमाचे दोन गोड शब्द देखील फारसे बोलेना. मग त्यांच्या कार्याचा गौरव तरी कोण करणार? मुलींच्या शाळा चालविण्याच्या वेळी जे थोडे एतद्देशीय बडे लोक ज्योतिबांना मदत करीत होते ते लोकही यावेळी खवळलेल्या भटांच्या सामाजिक बहिष्काराच्या भितीने घरी स्वस्थ होते!

अनुक्रमणिका

नाही म्हणावयास विद्येचे महत्त्व जाणणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांना मात्र ज्योतिरावांच्या या कार्याचे व चिकाटीचे मोठे कौतुक वाटे. ज्योतिरावांच्या विनंतीवरून बरेच बडे इंग्रज अधिकारी व त्यावेळच्या सरकारी विद्याखात्याचे प्रेसिटेंड सर अर्स्कीन पेरी हे ह्या शाळा तपासावयास जात व ज्योतिरावांचा दिर्घोद्योग पाहून ते त्यांचे कौतुक करीत. सर पेरी यांनी मुंबई सरकारच्या शाळा खात्याच्या त्यावेळच्या रिपोर्टातून ज्योतिबांच्या या कार्याचे चांगले कौतुक करून त्यांचा मधून मधून गौरव केलेला आहे. हे साहेब नेहमी ज्योतिबांकडे येऊन त्यांना प्रोत्साहन देऊन आणि शाळांस उत्तम अभिप्राय व लहान मोठ्या देणग्या अगर बक्षिसेही देत. अस्पृश्यांची शाळा चालविण्याचे कामी विशेष कर्नल मेडोज टेलर, रा. जगन्नाथ सदाशिवजी, रा. ( पुढे रा. ब. ) सदाशिवराव गोवंडे, रा. मोरो विठ्ठल वाळवेकर, सर अर्स्कीन पेरी, रेव्हेन्यू कमिशनर मि. रिव्हज वगैरे सद्‌गृहस्थानी ज्योतिरावांना द्रव्यद्वारा फारच मदत केली. पुढे दक्षिणा प्राईज कमेटीकडूनही या शाळेला महिन्यास ५० रु. मदतीदाखल मिळू लागले. तेव्हा शहरात आणखीन दोन ठिकाणी अस्पृश्यांच्या नवीन शाळा काढून त्या ज्योतिरावांनी १०-१२ वर्षपर्यंत उत्तम रितीने चालविल्या. शाळा फारच वाढल्यामुळे व खर्च भागत नसल्यामुळे पुढे त्यांनी त्या पुणे म्युनिसिपालिटीच्या हवाली केल्या व ते दुसरे कार्य करावयास मोकळे झाले. ज्योतिरावांनी अस्पृश्यांची स्थापन केलेली पहिली शाळा पुणे येथे भोकरवाडीत अद्यापही सुरळीत चालू आहे!

अनुक्रमणिका

## प्रकरण ५ : विधवाविवाह व अनाथ बालकाश्रम

मराठा, रजपूत, प्रभू, ब्राह्मण व सारस्वत इत्यादी काही स्वतः स श्रेष्ठ म्हणविणाऱ्या जातींच्या लोकांतील विधवांचे जे हाल होतात व त्यांना पतीवाचून जे आमरण गुलामगिरीत डांबून ठेवण्यात येते, त्याचे वर्णन करण्याची काही आवश्यकता नाही. एक पती मरण पावला असता त्या विधवेने मरेपर्यंत संन्यासवृत्तीने रहावे आणि पुरुषाने मात्र एकाच वेळी किंवा एकामागून एक अनेक बायका केल्या तरी हरकत नाही. एवढेच नव्हे तर स्मशानभूमीच्या पंथास लागलेल्या एखाद्या आजोबाने एखाद्या अल्लड अशा तरुण मुलीशी पतिपत्नीत्त्वाचे नाते जोडावे, या अन्यायाची ज्योतिरावांना मोठी चीड येई. हा हिंदुधर्मास एक मोठा कलंक आहे असे ते नेहमी म्हणत असत. स्त्रीजातीवरील हा अन्याय दूर व्हावा म्हणून समाजात पुनर्विवाहाची चाल रूढ झाली पाहिजे, याकरता त्यांनी मोठा प्रयत्न केला आणि त्यांच्या परिश्रमाने इ० स० १८६४ साली पुण्यास गोखल्यांच्या बागेत शेवटी शेवणी जातीत रघुनाथ जनार्दन व नर्मदा या दोघांत महाराष्ट्रातील पहिला पुनर्विवाह घडून आला व पुढे ही पुनर्विवाहाची चाल चोहोकडे हळूहळू रूढ होऊ लागली!

पण एवढ्याने त्यांचे समाधान झाले नाही, कारण काही विशिष्ट जातीच्या लोकांत तो सर्रास सुरू होणे बऱ्याच कालावधींचे काम आहे हे ते जाणून होते. नेहमी शेकडो तरुण विधवांचे आडमार्गाने पाऊल पडून त्या गरोदर होतात आणि तसे झाले म्हणजे त्या व त्यांचे आप्तलोक जननिंदेच्या भीतीने गर्भनाश करतात; आणि ते न साधल्यास बाळंत झाल्यावर जन्मलेल्या अर्भकाच्या नरड्यास नख देऊन त्यास ते रात्री-बेरात्री गल्लीत अगर बोळात फेकून देतात. असा अनर्थ त्यांच्या हातून घडू नये म्हणून ज्योतिरावांनी इ० स० १८६३ सालचे सुमारास आपल्या घराशेजारी स्वतः च्या खर्चाने एक वाडा बांधला आणि विधवा बायांनी गुप्त रीतीने येऊन व बाळंत होऊन, तेथे मूल ठेवून जावे, अशी सोय केली. त्यावेळीं या घराचा नंबर३९५ हा होता. तेव्हा "कोणा विधवेचे अज्ञातपणाने वाकडे पाऊल पडून ती गरोगर झाली तर तिने रा. ज्योतिरावांनी स्थापन केलेल्या गृहात गुप्तपणे येऊन बाळंत होऊन जावे " अशा मोठमोठ्या अक्षरांच्या जाहिराती साऱ्या पुणे शहरात भिंतीवर लावण्यात आल्या. पण या सत्कृत्याचे फळ म्हणून, छळ, त्रास, अपमान व उपहास या महात्म्याच्या वाट्यास आला. (पुढे रा. ब.) गोपाळ हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी, रा. भांडारकर, रा. ब. मदन श्रीकृष्ण, रा. नवरंगे, रा. परमानंद व रा. तुकाराम तात्या पडवळ, या सद् गृहस्थानी वरील कामी ज्योतिरावांना बरीच मदत केली. ज्योतिरावांचे हे बालहत्त्याप्रतिबंधकगृह प्रस्थापित झाल्यामुळे पुण्यातील ३०-४० अर्भके काळाच्या दाढेतून बचावली गेली. पण पुढे त्यांतील बहुतेक मुले जास्त दिवस जगली नाहीत. त्याच बालहत्त्याप्रतिबंधक गृहात एका काशीबाई नामक ब्राह्मण विधवेच्या पोटी सुमारे इ. स. १८६५ साली ज्योतिरावांचे दत्तकपुत्र यशवंतराव यांचा जन्म झाला.

ज्योतिरावांचे बालहत्त्याप्रतिबंधक गृह पुढे ८-१० वर्षे सुरळीत चाललेले पाहून (पुढे रा. ब.) महादेव गोविंद रानडे व लाल शंकर उमीशंकर या उभय मित्रांना असल्या एका गृहाची मोठीच आवश्यकता दिसून आली आणि त्यांनी त्या धर्तीवर पंढरपूर येथे एक बालहत्त्याप्रतिबंधक गृह पुढे स्थापन केले. ते अद्यापि तेथे चालू आहे, रानड्यांचा हा प्रयत्न पाहून ज्योतिरावांना मोठा आनंद झाला. तेव्हापासून रानड्यांबरोबर ज्योतिरावांचे सख्यत्व जडले. पंढरपूर येथील बालहत्त्याप्रतिबंधक गृह स्थापन करण्यात आल्यामुळे ज्योतिरावांनी आपण चालविलेल्या गृहाकडील लक्ष कमी करून ते दुसऱ्या एका कार्याकडे वळले.

अनुक्रमणिका

# प्रकरण ६ : परशुरामाची फजिती

ज्योतिराव क्षात्र वर्गाचे मोठे कैवारी होते. कोणत्याही देशात कोणता वीर म्हटला की, तो क्षात्र वृत्तीचा मोठा उपासक असावयाचाच! आमचे ज्योतिराव क्षत्रीय वीरांचे मोठे अभिमानी होते. भिक्षुकशाहीचा आधारस्तंभ जो परशुराम याने एकवीस वेळा पृथ्वी निः क्षत्रीय केल्याची कथा प्रसिद्धच आहे. भटा-भिक्षुकांच्या या चिरंजीव परशुरामाचे ज्योतिरावांनी कसे वाभाडे काढले हे पुढे वाचकांना कळेलच.

महाराष्ट्राचा महान क्षत्रीय छत्रपती शिवाजी भोसले यांच्याविषयी ज्योतिरावांस फारच अभिमान होता. सन १८६८ मध्ये ज्योतिबानी रायगडास जाऊन शिवाजी महाराजांच्या समाधीचा शोध लावला आणि सन १८७० साली त्यांनी शिवाजी महाराजांचा एक पोवाडा रचून तो त्या साली छापून प्रसिद्ध केला. छत्रपति शिवाजीचा छापून प्रसिद्ध झालेला महाराष्ट्रातील हा पहिलाच पोवाडा होय. शिवाजीचा पोवाडा प्रसिद्ध करून कलियुगी क्षत्रीय जिवंत असल्याचे जणू ज्योतिबांनी भिक्षुकशाहीच्या पळपुट्या चिरंजीव परशुरामाला जाहीर आव्हानच दिले!

अन्यायमूलक अस्पृश्यता नष्ट करून देशात बंधुप्रेम व समाजसंघटन आणण्याच्या हेतूने ज्योतिरावांनी इ. स. १८७३ साली त्यावेळच्या प्रत्येक वर्तमानपत्राकडे असा मजकूर पाठविला की, “जे ( क्षुद्र ) अगर कोणीही आपल्या उत्पन्नकर्त्यास मानून नीतीस अनुसरून व स्वच्छ उद्योगधंदा करण्याचा निश्चय करून त्याप्रमाणे आचरण करीत आहेत, अशी त्याजविषयी माझी खात्री झाल्याबरोबर मी त्यास केवळ, आपल्या कुटुंबातील बांधवाप्रमाणे समजून त्याचबरोबर अन्न व्यवहार करीन. मग ते कोणत्याही देशांतील असोत!” असे ज्योतिरावांनी मोठ्या धैर्याने व छातीठोकपणाने जाहीर केले! कांही वर्तमानपत्रकारांना ज्योतिरावांनी पाठविलेला हा मजकूर छापण्याची हिंमत तर झाली नाहीच, पण उलट बहुतेक पत्रकारांनी ज्योतिरावांवर इतका टीकेचा भडीमार केला की पुसता सोय नाही. त्यापैकी फक्त एकाच पत्रातील टीका मासल्यादाखल खाली देत आहो. “लोककल्याणेच्छु ” पत्रकार आपल्या शनिवार ता. ४-१-१८७३ च्या अंकात म्हणतात की “आमचे प्रसिद्ध महाज्ञानी, महाविचारी व महाशोधक तत्त्ववेत्ते अजम ज्योतिराव गोविंदराव फुले यांनी एक अप्रयोजक अशा तऱ्हेचे आत्मश्लाघ्येचे व ब्राह्मणांच्या निंदेचे पत्र आम्हाकडे पाठविले आहे त्यास आमच्या पत्रात जागा मिळण्याचा संभव नाही, याबद्दल सदरहू अजम फुले आम्हास माफी करोत.”

गेल्या २-३ वर्षांच्या अवधीत ज्योतिरावांनी हिंदुधर्मातील गुलामगिरीवर लख्ख प्रकाश पाडणारा “गुलामगिरी ” या नांवाचा एक उत्कृष्ट माहितीने भरलेला असा ग्रंथ लिहून तो त्यांनी इ. स. १८७३ साली प्रसिद्ध केला.

त्यावेळी समाजजागृतीचे कामी ज्योतिरावांना हा ग्रंथ मोठाच उपयोगी पडला. पुष्कळ दिवसांपासून विद्येशी फारकत झालेल्या रांगड्या मराठा-माळी समाजाची भाषा त्यावेळी किती ओबडधोबड असेल याची आजच्या सुधारणेच्या काळातील त्या समाजाच्या भाषेवरूनही सहज कल्पना करता येते. ज्योतिरावांची भाषाहि त्यावेळी तशीच ओबडधोबड व रांगडी होती. हे त्यांच्या या ग्रंथातील लेखनावरून दिसून येते. भाषा शास्त्राच्या दृष्टीने ज्योतिरावांचे ग्रंथ कोणत्याही किंमतीचे ठरोत. ते कोणी मोठे रसिक लेखक होते या दृष्टीने त्यांच्या ग्रंथाकडे पाहण्याची जरूरी नसून ते ब्राह्मणेतरातील पहिले लेखक, ब्राह्मणी गुलामगिरीविरुद्ध

अनुक्रमणिका

ब्राह्मणेतरांचा तो पहिला टाहो व ब्राह्मणेतरांना फुटलेली ती पहिली वाचा या दृष्टीने ज्योतिरावांचा हा ग्रंथ विशेष किंमतीचा आहे!

इराणी वामन भटाने येथील मूळच्या क्षत्रियांपैकी लोकप्रिय प्रजापती बळी राजाला ठार मारून येथे भट जातीचे वर्चस्व कसे प्रस्थापित केले, परशुरामाने क्षत्रियांच्या बायकावर व लहान मुलाबाळांवर कसायाप्रमाणे कशा सुऱ्या चालविल्या आणि ब्राह्मण हे ब्राह्मणेतरांना शुद्र मानून त्यांचा आजपर्यंत कसा द्वेष करीत आले आहेत हे या ग्रंथात ज्योतिरावांनी स्पष्ट दाखविले आहे. शिवाय ख्रिस्ती मिशनऱ्यांची त्यांच्या धर्माविषयीची कळकळ व भूतदया आणि हिंदुधर्मातील ब्राह्मण धर्मगुरूंचा ऊर्फ निर्दय कसायाचा शुद्रातिशुद्रावरील सैतानी जुलूम व धर्मद्रोह याचा उल्लेखही त्यांनी मोकळ्या मनाने केला आहे. त्याचप्रमाणे म्युनिसिपालिट्या स्थानिक संस्थांत ब्राह्मणेतर व अस्पृश्य सभासदांची जरूरी, सरकारी शाळा खात्यात व इतर सर्व खात्यांत ब्राह्मणेतर अंमलदाराची जरूरी, शिक्षणविषक बाबतीत ब्राह्मणेतरांनी पुढे येण्याची व इतर सुधारणा करवून घेण्याची आवश्यकता ह्या सर्व गोष्टी या पुस्तकात उत्तम रितीने प्रतिपादल्या असून, अस्पृश्योद्धाराच्या बाबतीत या पुस्तकाची थोडक्यात थोरवी वर्णन करावयाची झाल्यास हा ग्रंथ म्हणजेच ज्योतिरावांनी ब्राह्मणी धर्माच्या भेद नीतीवर व कृत्रिम जातीभेदाच्या मुलभूत कल्पनेवर फेकलेली एक कुऱ्हाडच होय!

या पुस्तकाविषयी त्यावेळचे लोकमत कसे होते याचा एकच मासला येथे देतो. त्यावेळचे एक मोठे सुप्रसिद्ध विद्वान गृहस्थ ( पुढे रा. ब.) विश्राम रामजी घोले, असिस्टंट सर्जन हे सत्यधर्म पुस्तकाच्या अभिप्रायात लिहितात की, "पुराणातील वामनाने बळिराजास फसवून त्याचे राज्य हरण केले तो सूड म. ज्योतिराव फुले यांनी उगविला! 'गुलामगिरी' नामक ग्रंथरुपाची एक जाज्वलित गदा उत्पन्न करून तिने त्या वामनाच्या डोक्यावर बिनचूक तडाखा देऊन त्याला 'चीत' करून टाकला. वामनाला याउप्पर डोके वर करण्याची आशादेखील राहिली नाही. बळीचा कैवार त्यांनी बरोबर घेतला. जर बळीचा आत्मा या भूमंडळावर भ्रमण करीत येईल तर तो खरोखर त्यांचा उतराई झाल्याविना राहणार नाही."

"पुराणातील महानिर्दय परशुराम ज्याने पौराणिक पृथ्वी निक्षत्री केली; ज्याने क्षत्रियांच्या गर्भीणी बायकांची मुले उपजत मारली, त्याला त्यांनी या गदेच्या प्रहाराने 'उलथा' पाडून त्याची चिरंजीवी नष्ट केली. अंधारात सापडलेल्या मनुष्यास जसा इंदुप्रकाश किंवा दीप वाट सापडण्यास उपयोगी पडतो तद्वत ही ( गुलामगिरी पुस्तकरूपी ) गदा महाराष्ट्रीयजनास ज्ञानदीपापरी उपयोगी पडत आहे."

तसेच त्यावेळच्या वर्तमान पत्रातून ज्योतिबांनी चिरंजीव परशुरामास आपले समोर हजर राहाण्याची एक नोटीससुद्धा दिली होती. अशा प्रकारे परशुरामाचे वाभाडे काढल्याने भिक्षुकी बालेकिल्ल्याचा निर्माता म्हणून समजल्या जाणाऱ्या परशुरामाने 'राम' म्हणून त्याची चिरंजीवी 'ज्योतिराव' या क्षात्रवीराने नष्ट केली व कलीयुगी क्षत्रीयांचे अमर आस्तित्व असल्याचे त्याच्या पुन्हा एकदा चांगलेच प्रत्ययास आणून दिले!

असो; याच धामधुमीत ज्योतिरावांनी 'ब्राह्मणाचे कसब' आणि 'जातिभेद विवेकसार' हेही दोन ग्रंथ प्रसिद्ध केले.

अनुक्रमणिका

# प्रकरण ७ : सत्यशोधक समाजाची स्थापना

सुमारे पंचवीस वर्षांचे आयुष समाजसेवेत घालविल्यामुळे आता ज्योतिरावांना समाजसुधारणेच्या मार्गातील अडचणींचा व खाचखळग्यांचा पूर्ण अनुभव येऊन चुकला होता. आपण लोकांपुढे मांडलेल्या सुधारणांचा लोकांत प्रसार का होत नाही, त्याचे इंगीत यावेळी ज्योतिरावांच्या बरोबर लक्षात आले होते. त्यांनी राष्ट्राच्या दुःस्थितीचा चांगला विचार केला तेव्हा भिक्षुकशाहीची रग याहून कमी झाल्याशिवाय आपण पेरलेल्या सुधारणा वाढीस लागणे शक्य नाही अशी ज्योतिरावांची खात्रीची समज झाली व त्या मार्गाला अधिक नेटाने लागण्याचा त्यांनी निश्चय केला. पण भिक्षुकशाहीच्या थोतांडी धर्मावर घाव घालून तिच्याशी लढणे काही एकट्याचे काम खास नव्हे असे आजपर्यंतच्या अनुभवांवरून ज्योतिरावांच्या लक्षांत आले तेव्हां या कार्याकरिता सुशिक्षित ब्राह्मणेतरांची एक सामुदायिक स्वरूपाची संस्था स्थापन करून तिच्यामार्फत ही चळवळ चालू करणे त्यांना अगत्याचे वाटू लागले. यावेळी पुण्यात कांही थोडे ब्राह्मणेतर तरुण शाळेतून बाहेर पडले होते. त्यांचाही आपल्याला या चळवळीच्या कामी मोठा उपयोग होईल अशी ज्योतिरावांना साहजीकच आशा उत्पन्न झाली आणि आपला हा हेतू तडीस जाण्यासाठी त्यांनी एक विनंतीपत्र काढून पुण्यास एक सभा बोलाविली. सभेस, मुंबई, पुणे व इतर ठिकाणच्या सुशिक्षित मंडळीला खास आमंत्रणे दिली.ठरलेल्या दिवशी मुंबई पुणे व इतर ठिकाणची मिळून ५०-६० मंडळी सभेसाठी आली. त्या प्रसंगी ज्योतिरावांनी आपले हेतू सर्वांपुढे मांडून फारच उत्तम तऱ्हेचे विवेचन केले; तेव्हा ज्योतिरावांच्या या कल्पनेवर बराच वादविवाद व चर्चा होऊन एक संस्था स्थापण्याचे निश्चित ठरले आणि त्याप्रमाणे या दिवशी म्हणजे ता. २३ सप्टेंबर १८७३ इसवी रोजी या सभेत ज्योतिरावांच्या हातून राष्ट्रात अखंड असा लांबवर प्रकाश पाडणारी जी दिव्य ज्योत उत्पन्न झाली ती म्हणजे सत्यशोधक समाजाची स्थापना ही होय. सत्यशोधक समाजाची प्रमुख तीन तत्त्वे आहेत.

(१) ईश्वर एक असून तो सर्वव्यापी, निर्विकार, निर्गुण व सत्यरूप आहे आणि सर्व मानव प्राणी त्याची प्रिय लेकरे आहेत.

(२) ईश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येक मानवास पूर्ण अधिकार आहे. आईस संतुष्ट करण्यास अगर बापास विनवण्यास जशी त्रयस्थ दलालाची जरूर नसते, त्याप्रमाणे सर्वसाक्षी परमेश्वराची भक्ती करण्यास भट दलालाची आवश्यकता नाही.

(३) कोणीही जातीने श्रेष्ठ ठरत नसून फक्त गुणाने श्रेष्ठ ठरतो.

याशिवाय अशाच व्यापक स्वरूपाची इतरही तत्त्वे आहेत. खरे पाहता सत्यशोधक समाजाच्या तत्त्वाचे व्यापक स्वरूप प्रत्येक धर्मीयास निर्विकार मनाने कबूल करावेच लागेल इतके ते व्यापक सत्यरूप आहे!

जगात एकच ईश्वर आहे व तो दरीखोरीत, नदीनाल्यांत अगर एखाद्या भटजीच्या देवळात कोंडलेला नसून तो सर्वव्यापी आहे. त्याच्याजवळ हा हिंदु अथवा मुसलमान अगर अमुक महार अगर तमुक ब्राह्मण अशी आवडनिवड अथवा भेदभाव नसून त्याला सर्व मानव प्राणी सारखेच प्रिय आहेत. हे 'सत्य' सत्यशोधक समाजाच्या पहिल्या तत्त्वात गोवले असून त्या ईश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येकाला पूर्ण अधिकार आहे आणि त्याची प्रसन्नता एखाद्या भट अडत्यामार्फत होत नसून ती केवळ आत्मिक बलावरच

अनुक्रमणिका

प्रत्येकास करून घेता येते, असा दुसऱ्या तत्त्वाचा अर्थ आहे व तसेच एखादा शाम भट दुराचारी असला तरी ब्राह्मण जातीत जन्मला म्हणून तो श्रेष्ठ आणि झाड्या महार सत्याचरणी व बुद्धिवंत असला तरी शुद्र जातीत जन्मला म्हणून तो हलकट व नीच, असे समजण्याची अनुदार वृत्ती भिक्षुकशाहीने हिंदू समाजात निर्माण केल्यामुळे उच्च मानलेल्या जातीतील लोक अंगी गुण नसताही श्रेष्ठत्व मिरवू लागले व सद्गुण पैदा करण्यासाठी कितीही कष्ट सोसले आणि ते पैदा केले, तरी केवळ महार अगर इतर शुद्र जातीत जन्मलो असल्यामुळे आपण श्रेष्ठ होणे अशक्य, अशी खालच्या वर्गातील लोकांची भावना करून दिलेली असल्यामुळे तेही अंगी सद्गुण अगर कारागिरी पैदा करण्याची यातायात करीतनासे झाले. अशा प्रकारे जातीभेदाच्या आणि सद्गुणरहित जन्मजात उच्चनीचतेच्या भिक्षुकी थोतांडाने समाजातील सद्गुणांचा, कारागिरीचा व उद्योगधंद्याचा आपोआपच लोप झाला आणि त्यामुळे हिंदुसमाज कायमचा निर्बल बनून उत्कर्षास व इतरांच्या व इतरांच्या आदरास मुकला! ही गोष्ट लक्षात आल्यामुळेच ज्योतिरावांनी केवळ जन्माने मानल्या जाणाऱ्या उच्चनीचतेच्या भिक्षुकी थोतांडाचा धिः कार केला व मनुष्य जातीने श्रेष्ठ बनत नसून तो गुणाने श्रेष्ठ बनतो हे मानवी उत्कर्षाचे व स्वातंत्र्याचे सत्य तत्त्व त्यांनी सत्यशोधक समाजाच्या तिसऱ्या तत्त्वात प्रतिपादन केले आहे. ह्या गोष्टी लक्षात घेता सत्यशोधक समाजाची तत्त्वे किती उदार, समतोल व सत्यमय आहेत याची कोणासही कल्पना येईल. ज्योतिरावांच्या ठिकाणी धार्मिक व सामाजिक समतेच्या भावनांचा किती विकास झाला होता व त्यांची बुद्धी किती कुशाग्र होती याची त्यांनी प्रतिपादन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या तत्त्वावरून बरोबर कल्पना येते!

ब्राह्मणांनी संस्कृत भाषेत मंत्र म्हटल्यावाचून ईश्वराची प्राप्तीच होऊ शकत नाही, अशी सर्वत्र लोकांची भावना असल्यामुळे समाजप्रसाराच्या कामी ज्योतिरावांना देवभोळ्या लोकांकडून मोठाच विरोध होऊ लागला व ते ज्योतिरावांशी वादविवाद करण्यासाठी त्यांच्याकडे नेहमी येऊ लागले. ईश्वराची पूजा अगर प्रार्थना संस्कृत भाषेतून मंत्र म्हटल्याशिवाय ती देवास कळत नाही, या म्हणण्याचा ज्योतिरावांनी इन्कार केला. वरील आरोप शुद्ध लबाडीचा आणि आपमतलबीपणाचा आहे असे त्यांनी त्यावेळी सर्वांना स्पष्ट सांगितले. जगातील प्रत्येक मनुष्याच्या मनात काय चालले आहे हे ईश्वराला समजते असे जर सर्वांकडून मानण्यात येते, तर त्याला मराठी, कानडी, गुजराती, हिंदी, इंग्रजी अगर फारसी भाषा समजत नाही असे म्हणणे किती वेडेपणाचे आहे? हिन्दुस्थान देश सोडला तर इतर देशातील लोकांत संस्कृत भाषेत देवाचे मंत्र म्हणण्याचा मुळीच रिवाज नाही. मग इतर देशांतील लोकांची भक्ती ईश्वरास पोहचतच नाही काय? किंवा त्या देशातील अगर आपल्या या हिंदुस्थानांतील कांही पापी लोकांनी इंग्रजी, उर्दु अगर मराठी भाषेतून रोज खोटे बोलण्याचे पाप केले अथवा वाईट पाप करण्याचे विचार केले तर त्या पापी लोकांनी ते बोलणे संस्कृत भाषेत केले नाही व संस्कृत भाषेशिवाय देवाला दुसरी भाषा कळत नाही म्हणून देव त्या लोकाना पापी ठरविणार नाही असे म्हणता येईल काय? संस्कृत भाषेशिवाय ईश्वराची प्राप्ती झाली नसती तर महासाधु तुकाराम, नामदेव, गोरा कुंभार, सेना न्हावी, सावता माळी, चोखा मेळा, सजन कसाई इत्यादी साधुसंतांना संस्कृत भाषा काडीइतकीही अवगत नव्हती म्हणून त्यांची भक्ती ईश्वरास रुजू न होऊन ते प्राकृतात काय बोलले ते ईश्वरास काहीच कळले नाही असे थोडेच म्हणता येईल? अर्थात मरू घातलेल्या अवघड अशा संस्कृत भाषेच्या नादी न लागता सर्वांनी आपल्या मातृभाषेतून ईश्वराची प्रार्थना करावी असे ज्योतिरावांनी आपले स्पष्ट मत लोकांपुढे मांडले व लग्न मृत्यु आदि संस्कार भट दलालाच्या मध्यस्थीने संस्कृत भाषेतून करवून न घेता ते प्रत्येकास मातृभाषेतून करता यावेत म्हणून त्यांनी लग्नविधीची मंगलाष्टके प्राकृत भाषेतून प्रसिद्ध केली!

ही मंगलाष्टके ज्योतिरावांनीच रचली असून मराठी भाषा बोलणाऱ्या सर्व भागांतील बऱ्याच लग्नांतून आज ती चोहोकडे म्हटली जात आहेत. त्यामुळे लेजीट अगर संस्कृत भाषेचा धाक घालून ईश्वराची उपासना करणाऱ्या प्रत्येक भक्ताकडून लांचलुचपत खाऊन ईश्वर आणि भक्त यांच्यामध्ये सापाप्रमाणे आडवे पडणाऱ्या पोपशाहीस अगर भटशाहीस शह दिला व नामदेव तुकारामादी साधुसंताप्रमाणे

**यारे यारे लहान थोर। होका भलत्या याती नारी नर ॥**

या समतेच्या पायावर सत्यशोधक समाजाची स्थापना केली व प्रत्येक मनुष्यास या समतेच्या पायावर सत्यशोधक समाजाची स्थापना केली व प्रत्येक मनुष्यास आपल्या मानसिक स्वातंत्र्याची आणि ईश्वरप्रणित सत्यधर्माची जाणीव करून देऊन इहपरलोकीच्या वाटा खुल्या करून दिल्या, याबद्दल निदान महाराष्ट्रातील अखिल जनता आणि त्यांतूनही अस्पृश्य वर्ग त्यांचा कायमचा ऋणी झाला आहे यात संशय नाही!

मनुष्य म्हटल्याबरोबर उच्चार न करताही जसा त्याच्या हातपायादी अवयवांचा आपोआप बोध होतो, त्याचप्रमाणे सत्यशोधक समाज म्हटला म्हणजे तेथे गुलामगिरीचा नायनाट, शिक्षणाची चळवळ, स्त्रीशिक्षणाचा प्रसार, अस्पृश्योद्धार, सधवा-विधवा स्त्री-जातीच्या मानवी हक्कांचा पुरस्कार, दीन अर्भकांवर व आंधळ्या पांगळ्यांवर भूतदया, सत्याचरण, ईश्वरभक्ती, सत्यनिष्ठा व स्वातंत्र्य या गोष्टींचा आपोआप बोध होतो. ज्योतिरावांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची हीच तत्त्वे आहेत व त्यांचे आचरण करण्याचा प्रयत्न करणाराच सत्यशोधक समाजीय होय!

असो; अशा प्रकारे पुण्यात सत्यशोधक समाज स्थापन झाल्याबद्दलची चर्चा सर्वतोमुखी झाली. समाजाची तत्त्वे काय आहेत, त्याचे धोरण व उद्देश काय आहे हे समजावून घेण्यासाठी लोक रोज ज्योतिरावांकडे येऊ लागले. या समाज स्थापनेमुळे पुण्यातील ब्राह्मणांत पुन्हा खळबळ उडाली! असता धर्म बुडाला, पृथ्वी प्रलय होणार, हा भ्रष्टाकार आहे, हा धर्मद्रोह आहे, हा ब्रह्मद्वेष आहे, हा कलीचा महीमा आहे. असे ते घरोघर जाऊन लोकांना सांगू लागले व समाजाचे कार्य सुरळीत चालू न देण्याचे कामी कसून मेहनत घेऊ लागले. कोणी या समाजाचा सभासद झाला असल्यास अगर होणार आहे असे समजल्यास लागलीच कर्मठ ब्राह्मण त्याच्या घरी जात आणि त्याच्या भोळ्या आईबापास अगर बायकोस कुलक्षयाची, ब्रह्मनिंदेची व ब्रह्मशापाची भीती घालून त्यास समजापासून दूर करण्याचा प्रयत्न करीत. इतकेही करून त्याने समाजाचा संबंध सोडला नाहीच तर ते त्याच्यावर भलते अरिष्ट आणण्याचा प्रयत्न करीत. त्यामुळे सत्यशोधक समाजाचे मेंबर होण्यास कोणी फारसे धजत नसे. सत्यशोधक समाजाची तत्त्वे पटून जर कोणी सरकारी नोकर समाजाचा सभासद झालाच तर त्याच्या खात्यातील लहान मोठे सर्व भट्ट अधिकारी त्याच्यावर कुभांडे रचून व गोऱ्या अधिकाऱ्यांकडे त्यांच्या चुगल्या सांगून त्याला कामावरून काढण्याबद्दल ते त्या गोऱ्या साहेबास भंडावून सोडीत!

अशा प्रकारे सत्यशोधक समाजाला हाणून पाडण्याबद्दल भटभिक्षुक जरी निकराचे प्रयत्न करीत होते तरी यावेळी ज्योतिराव थोडेही डगमगले नाहीत! भिक्षुकशाहीच्या अशा फुसक्या विरोधाला भिण्याइतके ज्योतिराव आता कच्च्या हिंमतीचे राहिले नव्हते. सत्यशोधक समाजाची स्थापना करून मोठ्या कष्टाने त्याची घडी त्यांनी मजबूत बसविली व समाजामार्फत सर्व सुधारणांना संघटीत स्वरूप दिले.

ज्योतिरावांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या पुढे अनेक शाखा स्थापन झाल्या. त्यानी स्थापन केलेल्या समाजाची मूळ शाखा पुण्यात अद्यापी सुरू आहे.

अनुक्रमणिका

# प्रकरण ८ : चिपळूणकर आणि फुले

सत्यशोधक समाजाची स्थापना केल्यानंतर ज्योतिरावांना काही कार्यकर्ते अनुयायी लाभले त्यात कै. कृष्णराव पांडुरंग भालेकर यांची प्रामुख्याने गणना केली पाहिजे. भालेकर हे पुणे येथील डि. जज्ञ कोर्टात कारकून होते. त्यांनी आजन्म समाजाचे कार्य करण्यासाठी सन १८७४ साली आपल्या नोकरीचा राजिनामा दिला आणि समाज प्रसारासाठी ठिकठिकाणी सभा भरविणे,पोवाडे, कविता म्हणणे आणि उपदेश करणे इत्यादि कार्य त्यांनी सुरू केले. अशा प्रकारे कांही दिवस लोटल्यावर मुंबई येथील तेलगू जातीच्या सत्यशोधक पुढाऱ्यांनी पुण्यास सत्यशोधक समाजाचा प्रसार करणारे मराठी भाषेतून एखादे वर्तमानपत्र काढले जावे म्हणून १२०० रुपयांचा छापखाना व त्याचे सर्व सामान पुण्यास ज्योतिरावांकडे पाठवून दिले. त्याप्रमाणे पत्र काढण्याबाबतची शहानिशा एका शनिवारच्या सभेत झाली. तेव्हा समाजातील तरुण मंडळीपैकी रा. भालेकर यांनी पत्र काढण्याचे काम आपल्या अंगावर घेण्याचे कबूल केले. वरील गोष्ट पुण्याच्या समाजाने मुंबईच्या समाजास कळविली. या दोन्ही समाजात छापखान्याचे मालकीबद्दल बराच पत्रव्यवहार झाला व शेवटी त्यावर मालकी कोणाची रहावी याविषयीचा वाद न मिटल्यामुळे पुण्याच्या समाजाने तो छापखाना मुंबईकरांकडे रवाना केला.

अशा प्रकारे छापखाना मुंबईकरांकडे रवाना झाल्यामुळे वर्तमानपत्र काढण्याचा भालेकरांचा विचार मनातल्या मनातच राहिला. तरी तेवढ्याने ते निराश मात्र झाले नाहीत. ते मोठ्या करारी स्वभावाचे होते. त्यांनी लागलीच स्वतः च्या खर्चाने एक छापखाना विकत आणला व मागासलेल्या लोकांत जागृति करणारे “दीनबंधू ” नावाचे एक पत्र काढण्याचे ठरविले व त्याप्रमाणे त्यांनी दीनबंधू साप्ताहिकाचा पहिला अंक १८७७ सालच्या जानेवारी महिन्याच्या पहिल्या तारखेस पुण्यास प्रसिद्ध केला. या पत्रास आरंभी अवघे ४/५ वर्गणीदार झाले आणि वर्षअखेर साऱ्या महाराष्ट्रात अवघे १३ वर्गणीदार मिळाले. पुढे दुसऱ्या वर्षी मात्र वर्गणीदारांत बरीच वाढ झाली. असो.

प्रथमारंभी मुलींच्या अथवा अस्पृश्यांच्या शाळा काढताना ज्योतिरावांना पुण्यातील ज्या कृष्णशास्त्र्यादी भटा-भिक्षुकांनी त्रास दिला, त्यांत –विश्वविद्यालयाचा एकही पदवीधर नव्हता. किंबहुना त्याकाळी हिंदुस्थानात कोठे विश्वविद्यालयाची स्थापनाच मुळी झाली नव्हती. त्यामुळे यापूर्वीच्या विरोधकास कर्मठ सनातनी अथवा पुराणमतवादी ठरवून त्यांची उपेक्षा कदाचित् करता येईल, परंतु जेव्हा ज्योतिरावांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून भिक्षुकी धर्माच्या मूळ रचनेवरच हल्ला चढविला तेव्हा मात्र ब्राह्मणी धर्माचे जनतेवर पूर्वापार चालत आलेले वर्चस्व तसेच अढळ ठेवण्याच्या कामी काही विश्वविद्यालयीन आंग्ल भाषाविभूषित पदवीधरांनी त्यावेळी नव्या दमाने पुढाकार घेतला. अशा त्या पदवीधरांपैकी प्रमुख म्हणजे पुण्याचे विष्णू कृष्ण चिपळूणकर हे होत.

ज्या भिक्षुकी धर्माचे विष्णूशास्त्री हे संरक्षक होते त्याच भिक्षुकी परंपरेचे ज्योतिराव हे विध्वसंक होते हे वाचकास माहीत आहेच. अशा प्रकारे परस्परविरोधी पक्षाचे अध्वर्यू या नात्याने शास्त्रीबुवा व ज्योतिराव यांचे वेळी प्रसंगी दोन हात झाले असल्यास नवल नाही. पुण्यातील तुळशी बागेजवळ अनेक वेळा सभा भरवून त्यात या दोघांच्या झुंजी झाल्यात. ज्योतिबा होते म्हणूनच पुण्यासारख्या भिक्षुकी धर्माच्या राजधानीत त्या वेळी ते टिकले. इतरांचा तेथे काही पाड नव्हता. आर्यसमाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती हे पुण्यास आर्यसमाजाचा प्रसार करण्याच्या इराद्याने सन १८७५ साली आले असता त्यांची विष्णूशास्त्री व त्यांचे भगतगण यांनी कशी शोभा काढली होती हे प्रसिद्धच आहे! तेव्हा दुरून पाहुणे आलेल्या

समाजसुधारक विद्वान स्वामीजींच्या प्रतिमेची गाढवावर बीद मिरवून या चिपळूणकर कंपूने शेवटी त्यांना चिखलमातीच्या अभिषेकात पुण्याहून रवाना केले. दुरून आलेल्या ब्राह्मण पाहुण्यांची जेथे इतकी बडदास्त, तेथे ज्योतिरावांसारख्या पुणेकर ब्राह्मणेतर समाजसुधारकास चिपळूणकर कंपूने कोणत्या दृष्टीने पाहिले असेल हे निराळे लिहिण्याची काही जरूर दिसत नाही! पुण्यात इतक्या प्रमाणात जरी समाजाचे काम सुरू होते व त्यामुळे पुण्यातील भिक्षुकशाहीस जरी समाजाची बरीच आंच जाणवू लागली होती, तरी निबंधमालेत समाजाचा टिकात्मक उल्लेख केल्यास आपल्या प्रसिद्धीनेही पुण्याबाहेरील लोकांत समाजाची प्रसिद्धी होईल या भीतीने यापूर्वी शास्त्रीबुवा समाजाविरुद्ध लिहीत नव्हते. म्हातारीने कोंबडा झाकला म्हणून सूर्य उगवावयाचा थोडाच थांबतो! ता. २० मार्च १८७७ रोजी समाजाने आपला रिपोर्ट प्रसिद्ध करून जेव्हा चोहोकडे त्याच्या हजारो प्रती पाठविल्या, तेव्हा मात्र शास्त्रीबुवांचा समाजप्रसिद्धीविषयक कल्पनांचा भ्रम पार दूर झाला! अभिप्रायाकरिता समाजाचा रिपोर्ट इतर सर्व वर्तमानपत्राप्रमाणे निबंधमालेकडेही पाठविण्यात आला. रिपोर्ट वाचून शास्त्रीबोवांना मोठा संताप आला व म्हातारी मेल्याचे दुः ख नाही, पण या ज्योतिची आज उपेक्षा केल्यास सोकावलेल्या काळाप्रमाणे तिच्यायोगे पेटणाऱ्या वणव्यात आपल्या भिक्षुकशाहीचा गवती मनोरा भस्मसात होण्यास विलंब लागणार नाही, या भीतीने शास्त्रीबोवांनी आपल्या मालेचा ४४ वा ( सन १८७७ साली ) सारा अंक खर्ची पाडून ज्योतिरावांवर यथेच्छ तोंडसुख घेण्याची आपली हौस पुरवून घेतली! या निबंधात शास्त्रीबुवांनी समाजाचे रिपोर्टावर लिहिण्याचे सोडून देऊन आपले घोडे भलतीकडेच दामटले. समाजाचे रिपोर्टाशी ज्योतिरांवांचा अगर त्यांनी लिहिलेल्या 'गुलामगिरी' पुस्तकाचा काही अर्थाअर्थी मोठासा संबंध नव्हता.परंतु संतापाच्या भरात शास्त्रीबोवांनी ज्योतिरावांवर घसरणे कोणास विसंगतपणाचे वाटो! परंतु शास्त्रीबुवास पक्के ठाऊक होते की, ज्योतिराव नसते तर हा रिपोर्ट जन्मासच आला नसता. रिपोर्टाचे मूळ ज्योतिरावच आहेत, हे जाणून त्यांचेवर शास्त्रींनी आपली लेखणी उचलली. एरव्ही शास्त्रीबुवांना जर नुसत्या रिपोर्टावरच आपला अभिप्राय लिहावयाचा असता तर त्यांना 'गुलामगिरी' व 'ब्राह्मणाचे कसब' ही पुस्तके धुंडाळून काढण्याची काही जरूरी नव्हती. शास्त्रीबुवा आपल्या या अंकात लिहितात की, "रिपोर्टाविषयी अभिप्राय देण्याचे मनात आणून (! ) ज्योतिबांचे 'कसब' व 'गुलामगिरी' हे दोन ग्रंथ पैदा करून ते वाचण्यास जेव्हा आरंभ केला, तेव्हा आमची तत्क्षणी खात्री होऊन चुकली की, राव ज्योतिचे महात्म्य आम्हांस पूर्वी जे माहीत होते ते काहीच नव्हते! ऐकण्यात व पाहण्यात किती अंतर आहे याविषयी आम्हास 'गुलामगिरी' वरून जी प्रचिती आली ती आम्ही कधी विसरणार नाही." शास्त्रीबुवांच्या वरील लिहिण्यावरून पहाता रिपोर्टावर 'अभिप्राय' देताना ते जो 'गुलामगिरी' वर घसरले, तो 'गुलामगिरी' वाचून त्यांची छातीच दडपली व त्यांनी पुढे रिपोर्टाऐवजी गुलामगिरीवरच ५/७ पानांचा अभिप्राय दिला!

याशिवाय आणखीही दोन तीन प्रसंगी शास्त्रीबुवा निबंधमालेतून ज्योतिरावांवर व त्यांच्या सत्यशोधक समाजावर तुटून पडले. शास्त्रीबोवांच्या टीकेला उत्तर देताना भालेकरांनी आपल्या दीनबंधूतून विष्णूशास्त्र्यांना शोभेलसे सर्टिफिकेट बहाल केले. दीनबंधुकार लिहितात :-

"मालाकार यांनी आजपर्यंत आपल्या पुस्तकात अनेक विषय प्रसिद्ध केले, पण त्यांचा झोक चरचरीत लिहिण्याकडे असतो की जेणेकरून दुसऱ्याचा पाणउतारा व्हावा अशी त्यांची ऐट असते. जेव्हा त्यांची हुक्की तारीफ करण्याकडे लागते तेव्हा ते त्या कलावर लिहितात ... दुसरे त्यांनी ( ज्योतिरावांनी ) चित्पावनांचे उत्पत्तीविषयी लिहिले आहे. तेव्हा आपले ज्ञातिसमुदायास दोष दिलेले त्यास ( मालाकारास ) सहन झाले नसतील. या विद्वान मालाकारांनी यापेक्षा असे करणें अवश्य होते की, फुले यांनी जे जे लिहिले आहे ते ते स्मृती पुराण यांचे प्रमाणांनी असत्य असे व्यक्त करून दाखविले असते तर त्यांची तारीफ करता

अनुक्रमणिका

आली असती. ईश्वर कृपेने या देशावर इंग्रजी राज्य झाले म्हणूनच आज पुढारी ज्ञातिशिवाय इतरांस कांहीतरी ज्ञान प्राप्त होऊन आपले हक्क कळू लागले आहेत. मालाकार आपले ज्ञातीचे स्वभावाप्रमाणे दीर्घदर्शी व गुप्तद्वेषी मतलबीही आहेत. इतर ज्ञातीची सुधारणा त्यांस अगदी आवडत नाही. .... आता मालाकार यांनी धूर्तांनी नाडलेले, दारिद्र्यानी पिडलेले आणि अज्ञानात गढलेले अशा गाई बापड्या गरीब क्षुद्रावर हत्यार धरणे म्हटले म्हणजे फारच विपरीत समजले पाहिजे."

दीनबंधूकारांनी दिलेल्या या सडेतोड सर्टिफिकेटामुळे शास्त्रीबुवा जसे बर्फाप्रमाणे थिजून थंडगार झाले, तरी पण दीनबंधुकारांच्या म्हणण्याला उत्तर देण्याचा त्यांनी आव आणलाच! याकरिता मालेच्या ४८ साव्या अंकाची ७-८ पाने त्यानी खर्ची घातली. या टिकेत शास्त्रीबुवांचे म्हणणे काय? तर ज्योतिरावांस व दीनबंधूकारांस ऱ्हस्व दीर्घ व व्याकरण कळत नाही! पण इतके लिहिल्याने ज्योतिरावांच्या सत्यशोधक समाजाच्या तत्त्वांचे अगर दीनबंधूकारांच्या म्हणण्याचे खंडन थोडेच होणार? भिक्षुकशाहीचे समर्थन करताना शास्त्रीबुवांनी कितीही आविर्भाव आणला तरी दीनबंधूकारांसारख्या मांत्रिकापुढे भिक्षुकशाहीच्या सैतानी स्वरूपाचे संरक्षण करणारे शास्त्रीबुवा अखेरीस लटपटलेच! मांत्रिकापुढे सैतानाने सत्य बोलावे त्याचप्रमाणे शास्त्रींनी आपल्या लिहिण्याच्या शेवटी शेवटी याच अंकात अशी कबूली दिली की, "( ब्राह्मण ) विद्वान्मंडळात शुद्राविषयी पूर्वीप्रमाणे ग्रह राहिले नाहीत. ..... ( तरी ) आता हे खरे आहे की, ब्राह्मण म्हणजे सर्वच अत्यंत सुजन आहेत व त्यांत दोष म्हणून सांपडावयाचाच नाही किंवा शुद्राचे दुःखाक्रोश सर्व व्यर्थ असून त्यांच्या स्थितीत सुधारणा करण्याची बिलकूल गरज नाही; असे आमचे मुळी म्हणणे नाही. आमच्या ज्ञातीचे जे कांही वास्तविक दोष असतील ते सर्व आम्हास कबूल आहेत."

अशा प्रकारे दीनबंधूकारांनी नाक दाबल्यामुळे जरी शास्त्रीबुवांनी आपले तोंड उघडून ब्राह्मणेतराविषयी सहानुभूति प्रगट केली तरी दीनबंधूकारांनी म्हटल्याप्रमाणे आपल्या जाती स्वभावावर जाऊन हे क्षणैक वैराग्य पुढे थोडक्याच दिवसांत ते विसरल्याशिवाय राहिले नाहीत. यापूर्वी एका ठिकाणी तर या शास्त्रीबुवांनी असे कथन केले की, 'कागदावरची शाई' वाळावयास जितका अवधी लागेल तितकाही वेळ सत्यशोधक समाज जगात टिकाव धरणार नाही, " परंतु खेदाची गोष्ट ही की, सत्यशोधक समाजाचे मरण डोळ्याने पाहू इच्छिणाऱ्या निबंधमालेचा तिच्या जन्मदात्याकडूनच अंत्यविधी केलेला सत्यशोधक समाजाने आपल्या डोळ्याने पाहिला. शास्त्रीबुवांची निबंधमाला पुढे २-३ वर्षे सुरू होती, परंतु त्यांनी ज्योतिरावांच्या अगर समाजाच्या वाटेस जाण्याचे धाडस केले नाही.

शास्त्रीबुवांच्या टीकेस आम्ही इतके महत्त्व दिले नसते, परंतु ज्यांना ब्राह्मण समाज 'मराठी भाषेचे शिवाजी ' व 'धर्माचे रक्षक आद्य शंकराचार्य' असे म्हणतो, त्यांनी ब्राह्मणेतर ज्योति विझविण्याचे कसेकसे अश्लील प्रयत्न केले व ते सर्वच कसे निष्फळ ठरले हे वाचकांपुढे मांडण्यासाठी येथे विस्ताराने सांगणे आवश्यक वाटले.

आपला प्रतिस्पर्धी दैवी आपत्तीत सांपडला असता त्याला सहानुभूतीचा हात देणे-नव्हे अशा प्रसंगी पाहिजे तो त्याग करून त्याचा शिरसलामत बचाव करणे यातच खऱ्या वीराचा दिलदारपणा साठवलेला असतो! ज्योतिराव हे दिलदार दिलाचे एक थोर योद्धे अतएव वीर होते! ज्योतिराव आणि विष्णुशास्त्री या दोघांत जन्मभर कोणते नाते नांदत होते हे वाचकांनी वर वाचलेच आहे. दैववषात विष्णुशास्त्री हे अकालीच काळाच्या दाढेत सापडले. त्यांच्या अंतकाळाची हकीकत अगदी हृदयद्रावक अशी आहे! प्रसिद्ध कोल्हापूर प्रकरणात केवळ भितीने शास्त्रीबुवांनीच खुद्द मुद्दाम आपल्यावर अपघाताने मृत्यु ओढवून घेतला असा आरोप

अनुक्रमणिका

ठेवून जेव्हा सरकारी पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांचे शव ताब्यांत घेऊन त्या शवाची सरकारी सर्जनांकडून चीरफाड करण्याचा प्रयत्न केला,तेव्हा दीनमुखाने डोळे मिटून घेतलेल्या आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या त्या शवाला आमच्या ज्योतिरावांनीच यावेळी थोर दिलाने सहाय्याचा हात दिला! आपले जिवलग शिष्य डॉ. ( पुढे रा. ब. ) विश्राम रामजी घोले या प्रसिद्ध व वजनदार सर्जनची साक्ष देऊन पोलीस अधिकाऱ्यांची ज्योतिरावांनी समज घातली आणि आपल्या जोडीदाराच्या गैरहजेरीत त्याच्या त्या प्रिय कलेवरावर कोणताही वार न होऊ देता मोठ्या सन्मानाने अखेरच्या स्थानी पोहोचविले! ही गोष्ट ध्यानात घेता ज्योतिरावांच्या उदारतेचे आणि दिलदारपणाचे मोल जगातील कोणत्याही किंमतीने करता येणे शक्य तरी आहे काय?

अनुक्रमणिका

# प्रकरण ९ : शेतकरी मजूर चळवळी

सत्यशोधक समाजाची स्थापना करून त्याचे कार्य सुरळीत सुरू झाल्यानंतर ज्योतिरावांचे लक्ष जनतेच्या आर्थिक प्रगतीकडे वळले. पाश्चात्य राष्ट्रांतून शेती व उद्योगधंदे यांची रोज होत असलेली वाढ व त्यांत प्रत्यही होत असलेली सुधारणा यामुळे तिकडील जनतेची आर्थिक उन्नती दिवसेंदिवस सारखी वाढत असल्याचे पाहून आपल्या देशात या धंद्याच्या सुधारणा करण्याचे प्रयत्न करण्याबद्दल त्यांनी या वेळी मनावर घेतले. आपल्या देशातील बहुजन समाजाचा उदरनिर्वाह मुख्यत्त्वे शेतीच्या धंद्यावर होत असल्याने प्रथम त्या धंद्यात सुधारणा व्हावी म्हणून समाजाच्या मंडळीने ठिकठिकाणी सभा घेऊन व दीनबंधूमधून ही चळवळ सुरू केली. शेतकरी लोकांनी चांगले बी, चांगले खत व चांगली मशागत करून नवी सुधारलेली पिके काढावीत आणि सरकारने तलाव विहिरी आणि पाटबंधारे बांधून शेतकऱ्याला नवीन झाडांचा, बी-बियाणा व शेतीच्या मशागतीसाठी लागणारी मदत सढळ हाताने करावी, तसेच ठिकठिकाणी सरकारने कालवे व पाटबांधारे बांधून शेतकऱ्यांना बागाईतास भरपूर पाणी पुरवावे असा त्यांच्या बोलण्याचा व लिहिण्याचा कल असे. सन १८७६ च्या सुमारास मुंबई सरकारने पुण्याजवळ मुठा नदीवर धरण बांधण्याचे काम हाती घेतले तेव्हा समाजाच्या मंडळीने आपल्या सभांतून व पत्रांतून सरकाचे अभिनंदन केले. सन १८७८ साली जेव्हा हे धरण बांधून पुरे झाले, तेव्हा पाटावे पाणी जमीनीला दिल्याने ती निकस व निकाम होते असा भलताच गैरसमज शेतकरी समाजात पसरला होता त्यामुळे या धरणाचे पाणी कोणीच शेतकरी आपल्या शेतीसाठी घेईना! अशा अडचणीच्या प्रसंगी लोकांचा गैरसमज दूर करण्यासाठी ज्योतिरावांनी मांजरी येथील दोनशे एकर जमिनीत त्याच साली पाटाच्या पाण्यावर मोठे बागाईत पेरले. या बागाईतांत पाश्चात्य राष्ट्रांतून पिकणारी कोबी, फुलकोबी, बटाटे, संत्रे, मोसंबी इत्यादी नवी पिके प्रथमतः ज्योतिरावांनी लावली. या पूर्वी पुणे भागात ही पिके मुळीच नव्हती. या जमिनीत ऊसाचे मोठे पिक काढून त्यांनी गूळ तयार केला. पाटाच्या पाण्याने ऊसाचे पीक चांगले येते याचे प्रत्यंतर लौकरच सर्वांना येऊन चुकले आणि नंतर हळू हळू शेतकरी लोक हे पाटाचे पाणी घेऊ लागले! पुण्याजवळील मांजरीच्या जंगलात फुल्यांची नळी अजूनही सुप्रसिद्ध आहे आणि त्याच जमिनीत ज्योतिरावांनी लावलेली आंबराई अजूनही कायम आहे. यावरून ज्योतिराव हे किती उमदे शेतकरी होते याची चांगली कल्पना होते. ही शेती करीत असताना ज्योतिरावांनी “शेतकऱ्यांचा आसूड ” या नावाचे दोन निबंध लिहून ते त्यावेळच्या दीनबंधूतून प्रसिद्ध केले. धार्मिक बाबीत जसे ज्योतिरावांना वर्गवैशिष्ट्य नको होते तसेच ते त्यांना आर्थिक बाबतीतही नको होते! मुठभर सावकारांच्या घरात हजारो लोकांची धनदौलत अथवा जमीन-जुमला जाणे त्यांना पसंत नसे. शेतकऱ्यांच्या जमिनीं, सावकाराकडे जाऊ नयेत म्हणून त्यांनी पुणे प्रांतात सन १९७५ मध्ये शेतकऱ्यांची मोठी चळवळ केली.

जुन्नर प्रांतातील शेतकरी कुळावर तिकडील ब्राह्मण सावकारांनी व जमीनदारांनी मोठा जुलूम चालविला होता व त्यामुळे इ. स. १८८५ साली तिकडील शेतकऱ्यांनी तर सावकारांच्या जमीनीवर बहिष्कार पुकारला होता व त्याप्रमाणे दोन वर्षे त्या जमिनी पडीत पडल्या होत्या! त्यांबाबत तिकडील शेतकऱ्यांनी सरकारकडे सुमारे चारपाच हजार सह्यांचा अर्ज दिला. या कामात ज्योतिरावांनी पुढाकार घेऊन शेतकऱ्यांच्या अडचणी सरकारपुढे मांडल्या. शेवटी हा लढा दोन वर्षे चालल्यावर सरकारी अधिकारी, सावकार, जमीनदार व ज्योतिराव यांच्यात या बहिष्काराचा खल होऊन व्याजाचा व जमीनीच्या लागवडीचा दर कमी करण्याचा ठराव झाला. सरकारने ‘डेक्कन ॲग्रीकलचरल ॲक्ट’ प्रांतभर जारी केला. सरकारने शेतकऱ्यांना संरक्षणाचे वचन दिले. त्यामुळे शेतकऱ्यांनी हा संप स्वखुषीने सोडला!

अनुक्रमणिका

शेतकऱ्यांप्रमाणेच मजुरांच्या सुधारणेकडे व संघटनेकडेही ज्योतिरावांचे लक्ष होतेच! सन १९७६ साली रा० भालेकर व रा० रामचंद्र हरी शिंदे या दोघांना आपले भागीदार करून "पुणे कमर्शियल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनी ", या नांवाची एक कंपनी स्थापन करून तिचेमार्फत त्यांनी खडकवासला बँक, मुठा नदीच्या पाटाचे बांधकाम, येरवडा पुलाचे बांधकामाचा दगड आणि चुना, पुणे सातारा रस्त्यावरील डोंगरांतील बोगदा कोरणे इत्यादी अनेक लहानमोठ्या कामाची कंत्राटे घेऊन त्यांनी ती कामे पुरी केलीत. त्यावेळीं ज्योतिबांच्या या कामावर रोज तीन तीन हजार मजूर असत. त्यामुळे ज्योतिरावांना मजुरांच्या अडीअडचणींची चांगली कल्पना आली. ज्योतिबा आपल्या कामावरील मजुरांना पुष्कळ सवलती देत असत. काम संपताच चांगल्या कारागिरांना बक्षिसे व सर्व मजुरांना जेवण तर ज्योतिराव नेहमीच देत असत! सन १८७९ साली ज्योतिराव व त्यांचे स्नेही [ पुढे रा० ब० ] नारायण मेघाजी लोखंडे यांच्या प्रयत्नाने मुंबईस गिरणी कामगारांचा पहिला संघ स्थापन झाला त्यावेळी त्यांनी मजूर चळवळ केल्यामुळेच सरकारने १८८५ साली मजूर चौकशीचे एक कमिशन नेमून त्यावर ज्योतिबांचे मित्र व त्यावेळच्या 'दीनबंधूचे' संपादक नारायण मेघाजी लोखंडे यांना सभासद घेतले. या कमिशनने हिंदुस्थानभर फिरून सरकारकडे एक रिपोर्ट सादर केला. त्यात लोखंडे यांनी चांगले काम केले आणि म्हणूनच त्यावेळेपासून मजुरांचे पगार निश्चित झाले. स्त्रिया, पुरुष व मुले यांचे तास ठरले. स्त्रियांची रात्रपाळी बंद झाली व मजुरांना सुटीचे दिवस मिळाले. अशा प्रकारे गिरणी मालकांच्या नियंत्रणाचा पहिला कायदा फुले, लोखंडे यांच्या प्रयत्नानेच जारी झाला. यावरून ज्योतिबांचे मजूर चळवळीचे कार्य किती मोलाचे आणि कसे अजरामर राहणारे आहे, याची कोणासही कल्पना येईल.

आज शेतकरी मजूर चळवळीचे मोठ्याने ढोल पिटले जातात. पण त्यात खरे कार्य कितीसे असते? ज्योतिरावांनी आपल्या या चळवळीचा अथवा त्याच्या पुढारीपणाचा कधी ढोल पिटला नाही पण त्यांचे कार्य अजरामर तर राहिलेच पण शेतकरी आणि मजूर दोन्हीही खऱ्या कष्टकरी वर्गाच्या चळवळीचे ते महाराष्ट्रातील पहिले उत्पादक होत, हे सत्य कोणालाही आणि केव्हाही नाकारता येणार नाही ही गोष्ट मात्र खरी! सारांश की, ज्योतिराव हे हिंदुस्थानातील पहिले सोशलिस्ट होऊन गेले आहेत!

अनुक्रमणिका

# प्रकरण १० : कै. टिळकांना दिलेली मदत

अशा प्रकारे एक ना दोन नव्हे तर आपण निर्माण केलेल्या अनेक चळवळींचे कार्य करण्यात ज्योतिराव गढले होते. तरी त्यावेळीं महाराष्ट्रात उद्‌भवलेल्या इतर महत्त्वाच्या चळवळीपासून ते अलिप्त नव्हतेच! १८८२ साली महाराष्ट्रात कोल्हापूरच्या ४ थे शिवाजी महाराजांचे प्रकरण उद्‌भवले आणि या प्रकरणाने या साली सारा महाराष्ट्र दुमदुमून गेला. कोल्हापूरचे ४ थे शिवाजी महाराज अल्पवयी असल्यामुळे तेथील एजंट व दरबारचे दिवाण रावबहादूर महादेव वासुदेव बर्वे ( ब्राह्मण ) या दोघा गृहस्थानी दरबारात आपले मोठेच प्रस्त माजविलें होते, पण चवथे शिवाजी महाराज हे जसजसे वयात येऊ लागले तसतसे ते मोठेच स्वाभिमानाने राहून राज्याचा कारभार स्वतः पाहू लागले. त्यामुळे आपल्या हातातील अधिकार कमी होतात हे पाहून रावबहादूर बर्वे यांनी महाराजांस वेड लागले आहे, अशी हूल उठविली. सरकारच्या राजनीतीनेही ती यावेळी न्याय देवतेचा खून केला आणि शिवाजी महाराजांना वेडा ठरवून अहमदनगरच्या किल्ल्यांत कोंडून ठेविले. पण त्यामुळे महाराष्ट्रात मोठाच असंतोष वाढला. राजघराण्यातील मंडळींचे म्हणणे की, महाराजांना वेड लागले नसून हे केवळ कुभांड आहे. महाराष्ट्रातील झाडून साऱ्या वर्तमानपत्रांनी या गोष्टीचा निषेध केला व कोल्हापूर संस्थान खालसा करण्याची इंग्रजांची ही युक्ती असावी असा दाट संशय त्यावेळी सर्वांना उत्पन्न झाला. महाराजांना जबरदस्तीने वेडा ठरवून कैदेत त्यांचा अमानुषपणे छळ सुरू असल्यामुळे इंग्रज राजनीतीच्या अन्यायीपणाची तीव्रतर चीड ज्योतिराव आणि त्यांचे मित्र यांना आली असल्यास आश्चर्य नाही. दीनबंधूने तर इंग्रज राज्यकर्त्यांना न्यायाला जागण्याचा इषारा दिला आणि बर्व्यांच्या फंद फितुरीत ब्राह्मणी कारस्थानावर चांगलाच प्रकाश पाडला. यावेळी महाराष्ट्रांतील सर्वच वर्तमानपत्रांनी एकजुटीने तोंड दिले. त्यांत पुण्यास दोन वर्षापूर्वी निघू लागलेल्या केसरी पत्राच्या दोघा संपादकांवर रा. ब. बर्वे यानी सरकारी कोर्टात खटला भरला. केसरीचे ते दोन संपादक म्हणजे टिळक व आगरकर हे होत.

टिळक यावेळी नुकतेच शाळेतून बाहेर आले होते. आजच्या त्यांच्य असलेल्या इस्टेटीचा एक शतांशही त्या वेळी त्यांचेजवळ नव्हता! नुकतेच राजकारणाच्या आखाड्यात ते उतरले होते. टिळकांवरील खटला मुंबईच्या हायकोर्टात चालला होता. बॅरिस्टर लोकांस देण्यास व इतर खर्चास पैशाची फारच अडचण पडू लागली. त्यावेळी भांडणास लावण्याकरिता पैशांची मदत मिळावी म्हणून काही पुढारी मंडळी ज्योतिरावांकडे आली. त्यांना ही अडचण निवेदन केली. पुण्यांतील भवानी पेठेत राहात असलेले मोठे श्रीमंत व गुळाचे अडते रामू शेट उरवणे यांचेबरोबर ज्योतिरावांची मोठी मैत्री होती. या दोघांची मैत्री इतकी दाट होती की, दोघांपैकी एकमेकांच्या जेवणाचे ताट एक. ज्योतिरावांनी सांगितल्यावरून रा. रामू शेट उरवणे यांनी टिळकआगरकरांचा त्यावेळी दहा हजार रुपयांचा जामीन घेतला व वकील बॅरिस्टरांनाही पैसे दिले. ही मदत करण्यात ज्योतिरावांचा एक मोठा हेतू होता तो असा की, टिळकावरील खटला खोटा ठरल्यास ब्रिटिश सरकार कोल्हापूरच्या गादीवर अन्याय करीत आहे असे सिद्ध होईल. त्यामुळें इंग्रज सरकारला छत्रपती शिवाजी महाराजांना कैदेतून मोकळे करणे भाग पडेल आणि रा. ब. बर्वेसारख्या स्वामीद्रोही आणि प्रजेवर जुलूम करणाऱ्या प्रजाद्रोही प्रधानास अनायासे खो बसून गादीविषयी भलत्यासलत्या सबबी पुढे करून इंग्रजांना छत्रपतीचे छात्र अफरातफर करता येणार नाही. शेवटी या खटल्याचा निकाल लागून टिळक व आगरकर यांना सरकारने चार महिने साध्या कैदेची शिक्षा सांगितली. महाराजांना वेडे ठरविण्यात सरकारने जरी न्यायनिष्ठुरता दाखविली, तरी पण पुढे सरकार आपल्या न्याय देवतेस जागले म्हणून म्हणा किंवा त्यावेळी महाराष्ट्रांत असंतोष पसरलेला होता म्हणून म्हणा कोल्हापूरच्या छात्रपदाला सरकारने दख्खल दिली नाही. पुढे टिळक-आगरकर सुटून आल्यावर

सरकारने त्यांना कैद केल्याबद्दल निषेध व्यक्त करावा म्हणून मुंबईतील सत्यशोधक समाजाचे तरुण पुढारी रा. ( पुढे रा. ब. व. जे. पी. ) नारायणराव लोखंडे व इतर मराठे मंडळींनी डोंगरी जेलपासून मुंबईभर पहिल्याने टिळक-आगरकरांची मोठ्या थाटाची मिकवणूक काढून त्यांना पानसुपारी, हारतुरे आणि शेलपागोटे अर्पण केले. पुण्यांत ज्योतिरावांनीही सत्यसमाजाची सभा भरवून त्या सभेत त्यांना शेलापागोटे पानसुपारी व हारतुरे अर्पण करून सरकारचा निषेध केला.

या प्रकरणी ज्योतिरावांनी टिळक आगरकरांना जी मदत केली त्या संबंधी टिळकांचे पट्ट शिष्य श्री. नरसिंह चिंतामण केळकर हे टिळक चरित्राच्या पान ७१ वर लिहितात कीं, “टिळक-आगरकर तुरुंगातून सुटून आले त्यावेळी त्यांच्या सत्कारात हे [ ज्योतिराव ] ब्राम्हणेतर पुढारी सामील होते व ज्योतिराव फुले यांनी कोल्हापूर प्रकरणात रामशेठ उरवणे यांजकडून टिळकांच्या जामीनकीबद्दल दहा हजार रुपयांची जबाबदारी घेवविली असे म्हणतात.” तसेंच खुद्द टिळकांच्या खास ‘केसरी’ पत्रातून त्याच वेळी या मदतीबद्दल ता० ३ आक्टोबर, १८८३ च्या केसरीच्या ३ रे पानावर संपादकाने एक स्वतंत्र लांबलचक स्फुट लिहून त्यांत ज्योतिरावांचा मोठा गौरव केला आहे!

ज्योतिराव हे इंग्रज भक्त व ब्राह्मण जातीचे द्वेष्टे आहेत, असे विपर्यस्त प्रलय त्यापूर्वी भिक्षुकी पत्रांतून उठत होते पण त्यांच्या या कृतीने आणि केसरीच्या सदर लेखाने त्या प्रलापास चांगलेच उत्तर मिळाले. वरील सर्व हकीकतीवरून ज्योतिबा हे ब्राह्मणद्वेष्टे नव्हते ही गोष्ट तर उत्तम प्रकारे सिद्ध होतेच पण त्याशिवाय इंग्रज राजकर्त्यांच्या अन्यायमूलक धोरणाचा ते प्रसंगी कसा योग्य मार्गाने तिव्र प्रतिकार करीत असत हे स्पष्ट होते.

शेवटी शिपायांकडून चौथ्या शिवाजी महाराजांचा अहमदनगरास मोठा छळ झाला. तो इतका की, त्याची आठवण होताच काळीज थरारते! या स्वाभिमानी राजपुत्राच्या कर्माची खरी कहाणी अजून पुढे आली नाही. अतिशय मानखंडना करण्यात आल्यामुळे एके दिवशी एका शिपायाशी मारामारी होऊन त्यांतच ता. २५ डिसेबर सन १८८३ रोजी या दुर्दैवी छत्रपतींचा प्राण निघून गेला!

अनुक्रमणिका

# प्रकरण ११ : सक्तीचे प्राथमिक शिक्षण

ज्या महाभागाने आधुनिक काळातील अनेक सुधारणांना महाराष्ट्रात प्रथम जन्म दिला, त्याचे हातून सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या चळवळीचा महाराष्ट्रात प्रथम उगम झाला नसता तर महाराष्ट्रात तरी तें एक मोठे नवलच वर्तले असते! ज्योतिरावांच्या सार्वजनिक कार्याची सुरुवातच मुळी शिक्षण प्रसारापासून झालेली आहे. विद्यादेवीचे ते आजन्म एक मोठे कट्टे उपासक होते. शिक्षणप्रसार हा ज्योतिरावांच्या चळवळीचा ओनामा होता! त्यांच्या कार्याची इमारत त्यांना शिक्षणाच्या पायावरच मुळी उभी करावयाची होती. शिक्षण प्रसारासाठी त्यांचा आत्मा रोज तळमळत होता. शिक्षणाचे जीवनच प्रथम समाजाला पाजण्याचा त्यांनी निश्चय केला होता. आपल्या आयुष्याचे अर्ध्यापेक्षा अधिक दिवस त्यांनी आजपर्यंत शिक्षणासारख्या एकाच कार्यांत घालविले होते. शिक्षणाशिवाय सुधारणा नाही म्हणून शिक्षण प्रसार करणे हा त्यांच्या चळवळीचा पवित्रा होता. आणि तो कसा फेकावा याचा कयास त्यांनी चांगला बांधला होता! निरक्षर आणि निर्धन जनतेत कायद्याच्या बडग्याशिवाय शिक्षण प्रसार होणे नाही अशी आजपर्यंतच्या अनुभवावरून त्यांची खात्री होऊन चुकली होती. इंग्लंडात यावेळी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा जारी करण्याची चळवळ जोरात सुरू होती. आमच्याही देशात अशा कायद्याची जरूरी ज्योतिबानी सरकारला कळविली. सन १८७४ पासून सत्यशोधक समाजाच्या मंडळीनी सभांतून ठराव करून ते मुंबई सरकारकडे पाठविले आणि ठिकठिकाणच्या लोकांच्या नावाचे व सह्यांचे विनंती अर्जही पाठविले. दहा वर्षांनंतर कोठे सरकार जागे झाले! मुंबई प्रांताच्या एज्युकेशन बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी या मंडळीच्या म्हणण्याचा वरिष्ठ सरकारकडे रिपोर्ट केला व त्यावेळच्या प्रांतिक अधिकाऱ्यांच्या शिफारशीवरून या प्रश्नाचा विचार करण्याचे हिंन्दुस्थान सरकारने ठरविले. इंग्लंडसारख्या सुधारणेच्या शिखरावर चढलेल्या राष्ट्रात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या प्रश्नाला मूर्त स्वरूप प्राप्त होण्याच्या चार वर्षांपूर्वीच म्हणजे इ० स० १८८४ साली विलायत सरकारने सक्तीच्या शिक्षणाच्या उपयुक्ततेबद्दल हिंदराष्ट्राचे मत अजमावून पाहाण्याकरिता एक कमिशन नेमले. या चौकशी कमिटीचे अध्यक्ष मे. हंटरसाहेब हे होते. हंटर कमिशनने त्यावेळी बऱ्याच लोकांच्या साक्षी घेतल्या. त्या प्रसंगी ज्योतिरावांची जी साक्ष झाली ती फारच महत्त्वाची होती. सरकारच्या साधकबाधक प्रश्नास ते हार तर गेले नाहीतच, पण उलट त्यांनी सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू न करणे हिंदुस्थान सरकारास कसे लज्जास्पद आहे, हे उत्तम तऱ्हेने प्रतिपादन केले. हंटर कमिटीपुढे साक्ष देताना ते म्हणाले की "सरकार आपणास जनतेचे मायबाप व खरे कनवाळू म्हणविते, त्याप्रमाणे खरोखरच जर सरकारला जनतेचा कळवळा येत असेल, तर सरकारने भल्याबुऱ्या सबब व अडचणी लोकांपुढे न मांडता १२ वर्षांच्या आतील मुलीमुलांवर एकदम मोफत सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू करावे व म्युनिसिपल कमिट्यांनाही सक्ती करावी अशी या कायद्यात तरतूद व्हावी." अशी ज्योतिरावांची साक्ष झाली. या प्रसंगी पुढारलेल्या ब्राह्मण वर्गांपैकी शिकल्यासवरलेल्या लोकांनी सक्तीच्या शिक्षणाविरुद्ध साक्षी दिल्या, इतकेच नव्हे तर फक्त ज्योतिरावांखेरीज सक्तीच्या शिक्षणाची मागणी कोणीच आपल्या साक्षीत न केल्यामुळे लोकमत सक्तीचे शिक्षणाविरुद्ध आहे, अशी सरकारने आपली समजूत करून घेऊन त्या प्रश्नाकडे जे दुर्लक्ष केले ते कायमचेच.

यावेळी ज्योतिरावांनी हंटर कमिटीपुढे सक्तीच्या शिक्षणाची रूपरेषा, इतक्या उत्तम तऱ्हेने मांडली होती की, ( धंदे शिक्षणाखेरीज बाकी ) तिचीच बहुतेक नक्कल इ० स० १९२२ सालच्या मुंबई कायदे कौन्सिलात त्यावेळच्या शिक्षण मंत्र्यांनी सक्तीच्या शिक्षणाची योजना म्हणून एक बील पास करून घेतले. असो; हंटर कमिटीने त्यावेळी सक्तीच्या शिक्षणाविरुद्ध आपले मत देऊन या प्रश्नाची वासलात लाविली,

तरी तेवढ्याने ज्योतिराव व त्यांचे मित्र निराश झाले नाहीत, तर त्यांनी सभांतून, वर्तमानपत्रांतून व आपले पुस्तकातून शिक्षण संपादण्याबद्दल लोकांना अखेरपर्यंत सारखा उपदेश केला.

अनुक्रमणिका

# प्रकरण १२ : सन १८७७ चा भयंकर दुष्काळ

प्रत्येक वीराची अथवा महात्म्याची - त्याच्या कर्तृत्त्वाची परीक्षा जग मोठ्या सचोटीने घेते आणि त्या जगाला काळ हा त्याच सचोटीने नीट निरखून व पारखून पाहातो! याचे प्रतिक सन १८७७ साली हिंदुस्थानात चांगलेच प्रत्ययास आले. या साली काळाने भारताला कसोटीच्या पत्थरावर चांगले घासले! या वर्षी भारत देशात मोठा भयंकर दुष्काळ पडून लोकांवर अतिशय दुर्धर प्रसंग गुदरला! या दुष्काळात भारतावर जो कहर ओढवला त्याचे वर्णन करणे कठीण होय. यापूर्वीच एक वर्ष अगोदर म्हणजे सन १८७५ मध्ये दक्षिण हिंदुस्थानांत दुष्काळ पडला होता. त्यासाली अन्नावाचून देशांत फार लोक मेले नाहीत पण या साली मात्र देशांतील लाखो लोकांनी अन्न अन्न म्हणून आपले प्राण सोडले! झाडपालादेखील संपून गेला. म्हणून काही लोकांनी जनावरांना चारावयाचा जो ज्वारीबाजरीचा अथवा गव्हाचा कोंडा नव्हे तर केवळ भुसा तो देखील खाऊन आपल्या पोटातील आग विझविण्याची पराकाष्ठा केली! पण पशूंच्या खाद्यानेही कोठे मनुष्य जगले? आईबाप आपल्या पोटच्या मुलांना देखील ओळखीनात, मग नात्या-गोत्याची गोष्ट कशाला? कित्येकांनी मुलाबाळांचे अन्नावाचून हाल पाहवत नाहीत म्हणून त्यांना विष देऊन मारले! काही लोक खावयास मिळेना म्हणून स्वतः च विष घेऊन मेले आणि ज्यांना विष खाऊन मरवेना अशा काही निशाचरांनी तर खावयास काहीच मिळाले नाही म्हणून स्वतः च्या पोटचे-गोळे आपली ती लाडकी अर्भक भोपळ्याप्रमाणे करकरा चिरून तेच शिजवून खाल्ले!! असे अघटित व मानवी जीवनाला लज्जास्पद करून सोडणारे पाशवी नित्याचार या समयी किती तरी घडले! या दुष्काळांत हिंदुस्तानांतील वीस कोटी लोकसंख्येपैंकी दोन कोटी लोक अन्नावाचून भुकेने चरफडून मेले! या साली काळाने जगाला चांगलेच कसोटीला लावले. यासारखा दुष्काळ गेल्या शंभर वर्षात तरी पडला नाही असे त्यावेळच्या वर्तमानपत्रांनी म्हटले होते.

काळाशी झुंजताना जग हतबल मुखाने आपले हात खाली टेकते पण अशा निर्वाणीच्या प्रसंगी त्याच जगांतील विरात्म्यांनी अथवा महात्म्यांनी काळापुढे हादरून जाऊन पराभवाने आपली मान कधीतरी खाली झुकविली आहे काय? नाही! केव्हाही नाही! उलट अशा निर्वाणीच्या प्रसंगी त्यांनी काळावर विजयच मिळविला आहे! आणि त्यांनी तो त्यांच्यावर मिळविला म्हणूनच त्यांना वीर अथवा महात्मे म्हटले गेले! या वीरांच्या विजयामुळेच काळाच्या तडाख्यातून जगाला स्वाभिमानाच्या जिण्याने जगता आले!! काळाशी झुंजताना जगात आजवर झालेल्या हुतात्म्यांनी कोणता त्याग केला याची ग्वाही इतिहास देईल आणि अशांपैकी ज्या लुब्ध कथा तो विसरला असेल त्यांचा पुरावा ही पृथ्वी आणि तिच्याभोवती रात्रंदिवस फिरून खडा पहारा देणारे ते चंद्र, सूर्य, गृहमंडळ अथवा तारामंडळदेखील देऊ शकेल! जगातील थोरांपैकी बहुतांच्या बहुकथा येथे सांगा कशाला? त्यातील फक्त ज्योतिबांचीच तेवढी एक येथे सांगतो.

जीवाला जीव पारखा झालेल्या त्या भीषण काळात कर्दनकाळाच्या तडाख्यात सांपडलेल्या जीवांपैकी, स्त्रिया अथवा पुरुष कोठे मोलमजुरी करीत तर कधी भीक मागून आणि प्रसंगी चोरी व दरोडा घालून कशीतरी आपल्या पोटाची भडकलेली आग विझवीत होते. पण पुष्कळशा निराश्रीत झालेल्या पण निष्कलंक आणि निष्पापी बालकांना यांपैकी एकही मार्ग सोयीचा नव्हता! आश्रयाचा कुठलाही थारा उरलेला नसल्यामुळे त्यांना जगात एकच एक मार्ग अखेर मोकळा होता आणि तो म्हणजे अन्न अन्न करता तडफडून मरणे हा होय!

अनुक्रमणिका

मानवी जीवनात सत्यासत्याच्या कैचीत सापडून माणसाची कशी त्रेधा उडते याची सर्वानाच चांगली कल्पना आहे. बरे वाईट कळू लागल्यानंतर त्याला आपला तोल सांभाळून चालणे किती कठीण जाते याचीही कल्पना साऱ्यांना आहेच. उभ्या जन्मात काहींचे पाऊल नेहमी चुकून पडते पण चांगल्या जपून चालणाऱ्याचे एकाद्या वेळी तरी चुकतेच. ज्यांचे कधीच चुकले नाहीं असेही महाभाग या भूमीवर असतील पण त्यांची संख्या फारच थोडी असेल! ज्याचे कधीं काळी चुकते असेच सर्वसाधारण लोक फार! अशा चुकाखोराना थोडेबहुत गुन्ह्याचे धनी ठरवून त्यांना त्या पापाचे प्रायश्चित्त किंवा त्या गुन्ह्याची सजा कळीकाळाला कठोरपणे कदाचित देता येईल आणि म्हणून यावेळी काळाने आरंभिलेले हत्त्याकांड हे त्याचे प्रतिक होते असे क्षणभर जरी मानले, तरी त्यात काळाने वाळल्याबरोबर जेव्हा ओले जाळण्याला सुरुवात केली तेव्हा ज्योतिबांना ते खपले नाही!! ज्यांना जगात बरे वाईट काहीच कळत नाही व ज्यांना जन्मात पापाची नुसती कल्पना एकदाही कधी शिवली नाही अशा लाखो निरपराध, निष्कलंक आणि निष्पापी बालकांची कत्तल जेव्हा काळाने या हत्त्याकांडात सुरु केली तेव्हा मात्र काळाच्या या घोर कृत्याला तोंड देण्याचा ज्योतिरावांनी दृढ निश्चय केला!!

सन १८७४ पासून ज्योतिरावानी आपल्या काही मित्रांना मिळून मोठाली कंत्राटी कामे घेण्याचे सुरू केले होते हे वाचकांना मागे एका ठिकाणी वाचल्याचे आठवत असेलच. तेव्हापासून गेल्या तीन चार वर्षात बरीच कंत्राटी लहान मोठी कामे पुरी करून त्यांनी चांगला नफा मिळविला होता. या सालीही त्यापैकी काही कामे चालू होती आणि मुळामूठा नदीवरील धरणाच्या नळीच्या बांधकामाचे कंत्राट यावेळी त्यांनी घेतले होते. या त्यांच्या कामावर हजारो मजूर यावेळी पोट भरीत होते. आईला मूल भारी झालेल्या या काळात इतक्या मजुरांना पोसणे हे कृत्य लोकाश्रयाच्या दृष्टीने पाहिल्यास काही कमी मोलाचे ठरत नाही, पण ज्योतिरावांच्या अंतः करणांत वसणाऱ्या दयेची अथवा उदारतेची मर्यादा येथवरच थोपलेली नव्हती! तर त्यांच्यात ती सागराप्रमाणे अफाट व अमर्याद पसरलेली होती!! आणि म्हणून कमावलेली अख्खी दौलत आपली जन्मात कामी येणारी अठरा वीस हजारांची पुंजी यावेळी काळाशी झुंज मारण्यात-अर्थात् या हत्याकांडात राष्ट्रातील असंख्य निरपराधी व निष्कलंक बालवीर जे केवळ काळाच्या दंडेलीने बळी पडत होते, चरफडून उपाशी मरत होते त्यांच्या जीवदानार्थ ज्योतिरावांनी थोर मनाने ती लुटविली!

दुष्काळ जाहीर होऊन चार दोन आठवडे लोटत नाहीत तोच ज्योतिरावानी पुणे येथे धनकवाडी कँपवर एक छात्रालय उघडले! या छात्रालयात रोज सकाळी एक हजार व संध्याकाळी एक हजार ज्वारी-बाजरीच्या भाकरी असहाय्य अशा लहान मुलांना वाटण्यात येत असत! अन्न खाऊ लागलेल्या लहान अर्भकापासून तो बारा वर्षे वयापर्यंतच्या मुलांनाच फक्त तेथे डाळीचे पाणी व भाकर अथवा भाजी भाकरी मिळे. प्रत्येक मुलाला त्याच्या वयाच्या मानाने चतकोर भाकरीपासून तो अर्धी पाऊण व एक अशी भाकरी दिली जाई. मुलांनी भाकरी छात्रालयात खावी. त्याला अथवा त्याच्या बरोबर आलेल्या पालकांस ती घरी नेण्याची बंदी असे. या छात्रालयात रोज लहान मोठी दोन ते अडीच हजार मुले जेवणास येत असत. ज्योतिरावांनी स्थापलेल्या या छात्रालयासाठी त्यांचे जिवलग मित्र रामु शेठ उरवणे, हरी रावजी चिपळूणकर व पुणे म्यु. क.चें हेल्थ ऑफिसर शिवाप्पा यांनी अडचणीच्यावेळी पैशाने व अंग मेहनतीने बरीच मदत केली. ज्योतिरावांचे हे छात्रालय नऊ महिने चालू होते! पुढे पाऊस पाडून लोकांचा चरितार्थ भागू लागल्यावर ते त्यांनी बंद केले.

या अवर्षणात लाखो बालके काळाने आपल्या घशात घातली. फार तर दोन अडीच हजार जिवांना ज्योतिरावांनी जगविले असेल! म्हणून तेवढ्याने त्यांनी काळावर असा कोणता मोठा दिग्विजय मिळविला

अनुक्रमणिका

असा प्रश्न कदाचित काही प्रतिपक्षीयांकडून उपस्थित केला जाण्याचा संभव आहे, पण त्याचे उत्तर अगदी साधे आणि सोपे आहे! आईला लेकरू पारखे झालेल्या त्या काळात इतका उदारपणा आमच्या महाराष्ट्र प्रांती कोणी तरी दाखविला काय? ज्योतिरावांनी त्या प्रलय काळी जगासाठी आणखी काय करता येण्यासारखे होते? आपली प्राणप्रिय असलेली सर्व संपदा तशा काळात त्यांनी पाण्याप्रमाणे खर्चिली! आपले होते नव्हते ते सारे संपविले!! आपल्या ताकदीच्या बाहेर त्याग केला!!! त्या त्यागाची किंमत आता कशाने करता येईल? या समयी आम्हास मागील एका संतांच्या त्यागाची आठवण होते. उदाहरणासाठी आम्ही ती येथे देतो. महाराष्ट्र देशात महासाधु तुकाराम याने आपल्या शेतात पिकलेल्या खंडीगणती धान्याची शिंपलीभर अन्न घरात न ठेविता दुष्काळाच्या साली गोरगरीबांना कशी खैरात केली याची कथा मराठी मुलखातील जनतेला चांगली ठाऊक आहे. तुकारामाच्या या खैरातीतील धान्याने किती लोक जगले असतील? याचे जे उत्तर तेच ज्योतिरावांच्या या अन्न छात्रालयाचे देता येईल. थोरांच्या थोरपणाची किंमत त्यांच्या अंतःकरणाच्या थोरवीवरून करावयाची असते. त्यांचे कृत्य कितीही लहान अथवा मोठे असो!

संत तुकारामाने वाटून दिलेल्या धान्याचे माप एखाद्या गणितकाराने काढले असेल किंवा अजून तो ते काढील, पण तेवढ्यावरून जसे त्यांच्या दिलदार व उदारपणाचे गणित त्याला कुठल्या तरी मापाने अथवा आकड्याने काढता आले नाही किंवा अजूनही ते कुणाला शक्य नाही, तसे-अगदी हुबेहुब तसे-ज्योतिरावांनी रोज वाटलेल्या हजारो भाकरींची बेरीज गणितकार जोडू शकेल पण त्यांच्यासारख्या सामान्य स्थितीतील गृहस्थाने तशा-मानवी जीविताच्या आशेचा तंतू तुटलेल्या-त्या महाकाळात जी दया, धैर्य व जी दानत दाखविली, त्याचे माप अथवा मोल त्याकाळी जगात कुणाला तरी करता आले असेल काय? किंवा आज ते कुणाला करता येणे शक्य आहे काय?

अनुक्रमणिका

# प्रकरण १३ : ज्योतिरावांचे राजकीय क्षेत्रातील कार्य

आपल्या राष्ट्रातील आधुनिक उपयुक्त सुधारणांचे उत्पादकत्व जसे ज्योतिरावांकडे जाते, तसे आपल्या देशातील स्वराज्याच्या आणि स्वातंत्र्याच्या चळवळीचे जनकत्वदेखील त्यांच्याकडेच जात आहे. आणि म्हणून त्यांची राजकीय मते अधिक स्पष्ट शब्दात पुढे मांडणे जरूरीचे आहे.

हिंदुस्थानात इंग्रजी सत्ता सुरू झाल्यानंतर इंग्रजी विद्येचे म्हणजे वाघिणीचे दुध प्यालेल्या सुशिक्षितांच्या पहिल्या पिढीतून प्रथम जर कोणी हिंदभूमीच्या स्वराज्याचा व स्वातंत्र्याचा टाहो फोडला असेल तर तो ज्योतिराव फुले यांनी होय! ज्यावेळी ज्योतिरावांनी आपल्या जन्मभूमीला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्यासाठी इंग्रजी राजसत्तेविरुद्ध बंड उभारण्याचा निश्चय केला होता त्यावेळी देशात इंडियन नॅशनल कॉंग्रेसचा जन्मही झाला नव्हता. इतकेच नव्हे तर कॉंग्रेसच्या जन्माच्या चाळीस वर्षे अगोदर ज्योतिरावांनी हे धाडस योजिले होते.

आपल्या ब्राह्मण मित्राच्या लग्नात ज्योतिरावांचा जो अपमान झाला तो त्यांना गिळता आला नाही. त्याने त्यांच्या विचारात मोठी क्रांती घडली! त्यांना कळून आले की, आपल्या मायभूमीत वर्गभेदांचे, धर्मभेदांचे व जातीभेदांचे मोठे थोरले बंड माजले असून त्यायोगे सामाजिक विषमता, मानसिक दौर्बल्य व गुलामीवृत्ती निर्माण झाली आहे व त्यायोगे देशातील क्षात्रतेजास शिथिलता आली आहे, तसेच लोकांत बेकी, आळस व अज्ञान पसरले आहे; आणि त्यामुळेच देश इंग्रजांना सहजासहजी पादाक्रांत करता आला आहे; अशा स्थितीत आपण स्वदेश स्वातंत्र्याकरिता जे बंडाचे निशाण उभारले आहे त्यात आपणाला कदापीही यश येणार नाही. स्वदेशहितासाठी, बंड उभारणे हा यशस्वी व हितकारी उपाय नसून या बदललेल्या मनूत इंग्रजी राज्याबरोबर या देशात आलेल्या अनेक पाश्चात्य सुधारणा येथे रुजवून त्याद्वारे देशाला उन्नत केल्याने आपला देश पुढे अल्पकाळात स्वतंत्र होईल त्याशिवाय दुसरा यशाचा मार्ग नाही, अशी त्यांची यापूर्वीच खात्री पटली होती आणि म्हणून बंडाचा विचार सोडून अनेक आधुनिक सुधारणा आपल्या देशातील जनतेत घडवून आणण्याची पराकाष्ठा ते अहोरात्र करीत होते. या सुधारणा घडवून आणताना त्यांना महाराष्ट्रातील भिक्षुकशाहीकडून व राजकीय लोकांकडून कसा विरोध झाला हे सारांशरूपाने आतापर्यंत वाचकांपुढे आलेच आहे. त्या उलट या सुधारणांचा राष्ट्रात प्रसार करण्याच्या कामी ज्योतिरावांना बऱ्याच युरोपियन मिशनऱ्यांनी व सरकारी अधिकाऱ्यांनी चांगली मदत केली होती आणि म्हणून त्यांच्या त्या मदतीबद्दल वेळोवेळी ज्योतिरावांनी त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानले आहेत. असे होते तरी ज्यावेळी सरकारी धोरण जनतेच्या हिताचे नसे त्या त्या प्रत्येक वेळी त्यांनी तितक्याच खंबीरपणाने सरकारवर सडकून टीका हासडली आहे!

ज्योतिराव हे सन १८७४ ते १८८३ पर्यंत म्हणजे बरोबर दहा वर्षे पुणे म्युनिसिपल कमिटीचे सभासद होते! या दहा वर्षांत त्यांनी कमिटीत जी बहुमोल कामगिरी केली त्याचे वर्णन करण्यास येथे वेळ नाही. तथापि कमिटीत मेंबर असताना त्यांनी सरकारशी जे दोन हात केले त्याची काही उदाहरणे येथे देतो. पुण्यात जुनी मंडई होती ती मोडून एक मोठे नवे मार्केट पुणे म्यु. क. ने बांधावे अशी सन १८८० च्या सुमारास जेव्हा एक सूचना आली  तेव्हा त्या सूचनेला ज्योतिरावांनी मोठा निकराचा विरोध केला. पण त्यांच्या त्या विरोधाला म्युनिसिपल कमिटीमधील युरोपियन आणि ब्राह्मण सभासदांनी थोडीदेखील दाद दिली नाही. खरे पाहता ज्योतिराव आणि झाडून सारी सत्यशोधक मंडळी हे मार्केट बांधण्याच्याच विरुद्ध होती. मार्केट बांधले जात असताना हा पैसा विनाकारण खर्च होत आहे, अशी सत्यशोधक पुढाऱ्यांची नेहमी

अनुक्रमणिका

भाषणे होत होती. त्यातून ज्योतिराव हे तर प्रथमपासून हे मार्केट बांधले जाऊ नये अशा मताचे होते व मीठगंज, वेताळ वगैरे पेठांत सभा भरल्या असताना त्यांतून तसे ते बोललेही होते. मार्केटवाचून पुणे शहराचे मुळीच अडले नाही. जुनी मंडई असता नवे मार्केट बांधून गरीब लोकांपासून करपट्टीच्या नावाखाली वसूल केलेले लाखो रुपये दगडमातीत घालण्यापेक्षा तोच पैसा प्रथम पुणे म्युनिसिपालिटीने आपले हद्दीत ताबडतोब सक्तीचे शिक्षण सुरू करण्याच्या कामी खर्च करावा व अज्ञानाने गांजलेल्या दीन जनतेला सुशिक्षित करून तिचा दुवा घ्यावा असे ज्योतिरावाचे म्हणणे होते! पण ज्योतिरावांच्या सूचनेप्रमाणे अजाण जनतेला सुजाण करण्याचे पातक (!) करणार तरी कोण? ज्योतिरावांची सूचना भट म्युनिसिपालिटीच्या एकाही सभासदाला पचणारी नव्हती हे तर लिहावयास नको! त्यांच्या या सूचनेचा सरकारी गोऱ्या अधिकाऱ्यांनी कदाचित काही विचार केला असता, पण या मार्केटला देण्यात येणारे नाव 'रे' हे त्यावेळच्या मुंबई प्रांताच्या गव्हर्नरांचे नाव होते. हिंदुस्थानच्या जनतेच्या तोंडात विद्यामृत ढोसून तिला सशक्त बनविण्यासाठी एका गोऱ्या साहेबाच्या होणाऱ्या स्मारकाला खो घालण्याचे पातक गोऱ्या लोकांनी तरी का करावे? त्यावेळी पुणे म्यु० क० चे झाडून सारे सभासद सरकारीनियुक्त असत व त्यात कमिटीचा अध्यक्ष कलेक्टर असे. कलेक्टर व इतर मिळून एकंदर सुमारे ४० सभासदांपैकी ८/१० तरी गोरे अधिकारी म्यु० क० वर असत. ज्योतिरावांनी हे 'रे' मार्केट होऊ नये म्हणून जितके प्रयत्न केले व ज्या ज्या गोऱ्या साहेबांना भीड घालावयास आणि विनंती करावयास ते गेले, त्या त्या टोपीवाल्या साहेब लोकांशी ते वाईट झाले. हे पाहून काही टोपीवाल्या साहेबांना समाधान वाटू लागले. परंतु ज्योतिरावांनी त्याची बिलकूल पर्वा केली नाही! अखेर मार्केट बांधण्यात आले. या मार्केटप्रकरणी त्या काळात ज्योतिरावानी गव्हर्नरच्या नावास न जुमानता जो विरोध केला तो पाहिला म्हणजे त्यांच्या अंगी असलेल्या धाडसाची कल्पना होते.

ज्योतिरावांच्या अशाच दुसऱ्या एका धाडसाची आम्हास या प्रसंगी आठवण होते. ते त्यांचे धाडस म्हणजे सन १८८० मध्ये पुणे म्यु० क० पुढे त्यावेळचे व्हाइसराय हे पुण्यास भेट देणार त्यावेळी त्यांच्या स्वागतार्थ एक हजार रुपये खर्च करावेत असा प्रश्न आला असता त्यावर ज्योतिरावांनी ही रक्कम खर्च करण्यास आपला विरोध असल्याचे त्यावेळच्या म्यु० क० च्या अध्यक्षाना लेखी कळविले हे होय! हे लेखी पत्र अजूनही पुणे म्यु० क० च्या दप्तरात दाखल आहे. गव्हर्नरांच्या अथवा व्हाइसरायांच्या स्वागतास आजच्या अनकूल काळात जाहीर करण्यास किती लोक हिंमत करतात? आणि ज्योतिरावांनी ही असली धाडसी कृत्ये आज साठ वर्षांपूर्वीच केलीत! त्यावेळी त्यांनी बांधलेली हिंमत ही किती थोर दर्जाची होती याची कल्पनाच केली पाहिजे! असले अचाट धैर्य त्याकाळी तरी एकट्या ज्योतिरावांखेरीज सर्व हिंदुस्थानात दुसऱ्यानी कोणी दाखविले आहे काय?

ज्योतिरावांच्या कार्याच्या अगदी सुरुवातीला त्यांना जरी पुष्कळशा युरोपियन अधिकाऱ्यांनी मदत केली होती तरी पण पुढे पुढे मात्र जेव्हा ज्योतिराव हे इंग्रजी राजवटीतील दोष काढून तीवर वर्तमानपत्रांतून, सभामधून व पुस्तकांतून कडक टीका करू लागले तेव्हा मात्र काही गोरे लोक त्यांचा मत्सर करू लागले! याबाबत ज्योतिराव आपण लिहिलेल्या गुलामगिरी पुस्तकाच्या पंधराव्या भागात लिहितात की, "भटपांड्याचे बंड उपस्थित झाले तेव्हापासून बरेच युरोपियन सभ्य गृहस्थ माझ्याशी पहिल्यासारखे मन मोकळे करून नीट न बोलता मला पाहिल्याबरोबर कपाळावर आठ्या घालू लागले, तेव्हां मी त्यांचे घरी येणेजाणे सोडून दिले."

महाराष्ट्रात भटपांड्यांचे बंड उपस्थित झाले त्यावेळी प्रथमच ज्योतिरावांना सरकारच्या धोरणाची कल्पना आली. भटपांडे खेडे गांवातील अज्ञानी लोकांत तंटे उपस्थित करतात, म्हणून त्यांना कामावरून

काढण्यात आले पाहिजे असे ज्योतिरावांचे म्हणणे होते; परंतु भटपांड्यांच्या मदतीने जनतेवर कर लादणे सरकारास सोपे जात असल्यामुळे सरकारने पांड्यांचा कैवार घेतला. ज्योतिरावांची ही चळवळ जेव्हा वाढू लागली; तेव्हा काही गोरे साहेब तर ज्योतिरावांकडे वक्र दृष्टीने पाहू लागले. तरी ज्योतिरावांनी त्याची मोठीशी फिकीर वाहिली नाही, पण या प्रकरणामुळे एवढे मात्र झाले की, त्यांचे लक्ष सरकारच्या प्रत्येक खात्याकडे गेले व त्याचे निरीक्षण करून प्रत्येक खात्यात ब्राह्मणेतर लोक असल्याशिवाय जनतेला खरे सुख होणार नाही, अशी त्यांची खात्रीची समज झाली व म्हणूनच त्यांनी आपल्या प्रत्येक लेखांतून व पुस्तकांतून प्रत्येक खात्यात सर्व जातींच्या लोकांचा भरणा झाला पाहिजे असे प्रतिपादन केले आहे. विशेषतः शाळा खात्यांत सर्व जातींच्या पंतोजींची नेमणूक केली पाहिजे, याविषयी ते नेहमी युरोपियन शाळाधिकाऱ्यांबरोबर बोलणे करीत असत.

सरकार शेतकऱ्यापासून सक्तीने जो लोकलफंड वसूल करते त्याचा शेतकऱ्यांकडे ते उपयोग करीत नाही. म्हणून ज्योतिराव नेहमी सरकारची खरडपट्टी काढीत असत.

शुद्राजींचा आहे लोकल तो फंड । त्यांचे कांहो भंड ज्योती म्हणे ॥
राजे धर्मशील म्हणविती । आतां कांरे मागे घेती ॥
विद्या द्यावी पट्टी पुरती । धिः कारूनी सांगे ज्योती ॥

याप्रमाणे बऱ्याच अभंगांतून व लेखांतून ज्योतिरावांनी सरकारवर कडक टीका केली आहे. ती सर्व येथे देता येणे शक्य नसल्यामुळे वर फक्त दोनतीन ओळीच दिल्या आहेत. सक्तीचे शिक्षणाच्या मागणीच्यावेळी हंटर कमिशन पुढे साक्ष देण्याच्या प्रसंगी, कोल्हापुरचे गादीवर उपस्थित झालेल्या संकटाचे वेळी आणि रे मार्केट प्रकरणाचे वेळी ज्योतिरावांनी सरकारला उघडपणे जो विरोध केला तो त्याकाळी खास सामान्य नव्हता.

ब्राह्मण अधिकाऱ्यांवरच नव्हे तर गोऱ्या अधिकाऱ्यांवरही ते कडक टीका करीत असता इंजिनिअर खात्यावर रचलेल्या एका पोवाड्यात त्यांनी असे म्हटले आहे की,

चाल ॥ ठेपले गोरे येऊन । कचेरी तंबू घेऊन । थकले शिकार खेळून ॥
कागदी सह्या करून । भटावर बाकी सोंपवून । विसावा ग्लास घेऊन ॥
चाल ॥ शोभती खिसे कोचास । वाचिती न्यूजपेपरास । मान पहा
मधी डुकलीस ॥

याच पोवाड्यांत ते पुन्हां म्हणतात :-

न्यायशील म्हणवितां आतां तुम्ही आमचे भूपति । दया नाहीं शुद्रांची चित्ती ॥
॥ चाल ॥ अनुभव स्वतः लक्षून सांगतो खरें निक्षून । सर्व जाती निवडून ।
घ्यावी संख्या प्रमाण । द्यावी कामें नेमून । होईल सुख समाधान ॥
॥ चाल ॥ घालितो पदरी चुकीस । नेमिता एका जातीस । प्रवेश नाही शुद्रास ॥
॥ चाल प० ॥ एक जातीचे सर्व मिळून देश नाडिती । बाकीचे तोंडाकडे पाहाती ।
ज्योतिराव बोधी करूं नये एक जात भरती । भरिती होळकर पोती ॥ ५ ॥

अनुक्रमणिका

तसेच गुलामगिरीत दिलेल्या एका अभंगात ते सरकारला म्हणतात की, तुमच्या न्यायी म्हणवून घेणाऱ्या राज्यात -

वकिलांची महागाई । न्यायाधिशा दया नाहीं ॥ १ ॥
पाप पुण्य जेथें नाही । पैशा पुरते दादा भाई ॥ २॥
नित्य जमती एके ठाईं । शुद्रांची ती दाद नाहीं ॥ ३ ॥

१८८५ सालच्या डिसेंबर महिन्यात कै. दादाभाई नवरोजी नावाच्या पारशी जातीच्या गृहस्थांनी राष्ट्रीय सभेची स्थापना केली; व तिचा जलसा वर्षातून एकदा करण्यात येऊ लागला. पण या सभेस देशातील वीस कोटी शेतकरी लोकांपैकी एकही गृहस्थ हजर रहात नसे. मोठमोठ्या सरकारी नोकऱ्या मिळवून राज्यकारभार आपल्या जातभाईंच्या हाती यावा म्हणून पाच दहा ब्राह्मण व व्यापारात आपणास चांगली सवलत मिळावी म्हणून पाच दहा व्यापारी जातीचे बडे बडे लोक जमून, वर्षातून एकदा राष्ट्रीय सभेच्या नावाखाली आपल्या फायद्याचे चार दोन ठराव पास करून लोकांची व विशेषतः सरकारची दिशाभूल करू लागले. त्यावेळच्या राष्ट्रीय सभेत (१) सरकारने हिंदी लोकांना मोठाल्या पगाराच्या व मोठमोठ्या हुद्यांच्या जागा द्याव्यात. (२) हिंदुस्थानच्या आयात अगर निर्यात मालास हिंदी व्यापाऱ्यांना अमुक अमुक सवलती देण्यात याव्यात. (३) सरकारने वरिष्ठ शिक्षणावरील आपली करडी नजर दूर करावी. (४) हत्यारे वापरण्यास परवानगी द्यावी. असे ठराव पास होत असत. परंतु प्राथमिक शिक्षणाचा असा प्रसार करावा अगर सक्तीचे प्राथमिक शिक्षण सरकारने मोफत सुरू करावे, किंवा सरकारने शेतकऱ्यांची सुधारणा करून त्याना अमुक सवलत द्यावी; असा एकही ठराव या राष्ट्राच्या नावावर गोंधळ घालणाऱ्या राष्ट्रीय सभेत कोणी आणीत नसे. मग ते पास होणे तर दूरच! 'स्वराज्य' हा शब्द त्यावेळी उदयही पावला नव्हता, राष्ट्रीय सभादेखील स्वराज्य मिळावे या हेतूने भरत नव्हती तर 'सुराज्या' साठी ती भरत होती. पैशाच्या व शिक्षणाच्या जोरावर राष्ट्राच्या नावाखाली या राष्ट्रीयवाल्या लोकांनी असा सावळागोंधळ घालावा, हे ज्योतिरावांना आवडले नाही. त्यांनी या राष्ट्रीयवाल्यांचे कान उघडण्याचा विचार केला.

सन १८८९ सालच्या डिसेंबर महिन्यात राष्ट्रीय सभेचे पाचवे अधिवेशन मुंबई येथे सर वुइलम वेडरबर्न यांच्या अध्यक्षतेखाली भरले. त्यावेळी ज्योतिरावांनी मुंबईस येऊन राष्ट्रीय सभेसाठी जो मंडप तयार केला होता या मंडपाच्या दरवाजासमोर शेतकऱ्याचा एक मोठा जंगी पुतळा उभारला होता! या शेतकऱ्याच्या डोक्यावर फाटके पागोटे, अंगात अंगरखे नसून खांद्यावर घोंगडी, एक फाटकी व आखुड लंगोटी लावून त्याच्या एका हातात कोयता दिला होता व दुसऱ्या हातात एक मोठा ढलपा दिला असून त्या ढलप्यावर "राष्ट्रीय सभा ही देशातील बहुजन समाजाची नसून मुठभर पांढरपेशे व भांडलदार व्यापाऱ्यांची ती आहे. देशांतील वीस कोटी शेतकऱ्यांपैकी एकही प्रतिनिधी तिच्यात नाही. आणि जोपर्यंत शेतकऱ्यांचे प्रतिनीधी तीत घेतले जात नाहीत, तोपर्यंत देशातील खऱ्या वीस कोटी प्रजेचा तिला पाठिंबा मिळणार नसून हीला राष्ट्रीय सभा म्हणता येणार नाही." शेतकऱ्याचा उभारलेला हा पुतळा गवताचा बनविला होता व तो चांगला तीस फुट उंच होता!

सन १८८७ च्या सुमारास असाच एक धाडसी प्रयत्न ज्योतिरावांनी केला तो म्हणजे महाराणी व्हिक्टोरियाचे द्वितीय चिरंजीव ड्युक हे पुण्यावरून जेव्हा विलायतेस गेले तेव्हा त्यांच्या एका सत्कार

अनुक्रमणिका

समारंभास हजर राहून हिंदुस्थानातील शेतकऱ्यांच्यावतीने त्यांनी ड्युकबरोबर एक निरोप राणीस पाठविला. त्याचे वर्णन स्थलसंकोच्यास्तव येथे देता येत नाही पण पुढील ग्रंथी आम्ही तो जरूर देऊ. असो.

आमच्या देशावर आमच्या लोकांचे - राजांचें नव्हे - राज्य असावे अशी कल्पना त्यावेळच्या कोणत्याही देशभक्ताच्या डोक्यात उत्पन्न झाली नव्हती; त्यावेळी ते विचार महात्माजींनी आपल्या

'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकात बोलून दाखविले आहेत. त्या पुस्तकाच्या 'सत्य' या प्रकरणातील ७ वे कलमांत ते लिहितात, 'आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याने एकंदर सर्व मानव स्त्रीपुरुषास धर्म, राजकीय स्वातंत्र्यता दिली आहे."

पुढे याच पुस्तकातील "आर्यभट ब्राम्हणांचे वेद आणि सार्वजनिक ईश्वरप्रणित सत्याची तुलना" या भागात ते लिहितात की, "आपणा सर्वांच्या निर्मीकाने एकंदर सर्व प्राणीमात्रास उत्पन्न करतेवेळी मनुष्यास जन्मतः स्वतंत्र प्राणी निर्माण केला आहे. आणि त्यास आपापसांत सारखे हक्कांचा उपयोग घेण्यास समर्थ केले आहे आणि याच कारणास्तव प्रत्येक मनुष्य गावातील व मुलखातील अधिकारांच्या जागा चालविण्याचा अधिकारी आहे."

वरील लिखाणावरून पाहाता ज्योतिरावांचे राजकीय क्षेत्रातील कार्य किती थोर व अमर्याद आहे याची वाचकांना चांगली कल्पना होईल. ज्योतिबा हे देशात एक पहिले पट्टीचे देशभक्त होऊन गेले आहेत यात शंका नाही. ते जसे धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्यासाठी जन्मभर खपले, त्याचप्रमाणे देशातील त्यावेळच्या राजकीय वातावरणात भाग घेऊन गरीब दुबळ्यासाठी ते सरकारशीही वेळोवेळी झगडले व भिक्षुकशाहीप्रमाणेच शेवटी नोकरशाहीच्या रोषासही ते पात्र झाले. ज्योतिराव हे राजकीय स्वातंत्र्याचे किती चाहाते होते हे वरील वाचनाने कोणासही कळून येण्यासारखे असल्यामुळे या विषयावर यापेक्षा अधिक न लिहिले तरी चालेल.

# प्रकरण १४ : बडोदा नरेश आणि फुले

सत्यशोधक समाजाची स्थापना केल्यापासून तो अंतःसमयपर्यंची सुमारे सतरा वर्षे ज्योतिरावानी आपण प्रस्थापित केलेल्या बहुविध चळवळींचा प्रसार करण्याच्या दृष्टीने अत्यंत धामधुमीची अशी गेली. या प्रचंड कार्यासाठी आपल्या उतार वयात त्यांना पुष्कळसे दौरे काढावे लागले व अतिशय दगदग सोसावी लागली. जुन्नर प्रांतात तर त्यांनी प्रत्येक खेड्याखेड्यांतून फिरून प्रचारकार्य केले होते. तसेच कोकण प्रांत, सातारा, सोलापूर, नाशिक, ठाणे, व मुंबई इत्यादी इंग्रजी अंमलाखालील मुलुखांत फिरून त्यांनी बरीच व्याख्याने दिलीत. त्यांच्या या प्रचारकार्याची कथा येथे देण्यासाठी आमच्याजवळ पुरेशी जागा तरी आहे कुठे! फक्त त्यांतील महत्त्वाच्या गोष्टी संक्षिप्तपणे येथे सांगतो.

मुंबईस ज्योतिरावांची मधूनमधून व्याख्याने होत असत. परंतु सन १८८९ मध्ये ज्योतिरावांनी मुंबईस चांगला दोन महिन्याचा मुक्काम ठोकला व त्यांची शहराच्या सर्व भागांतून अनेक व्याख्याने झाली. या समयी मुंबईस देवदासी सोडण्याची चाल फार बोकाळली होती व त्यामुळे अनीतीला चांगलेच प्रोत्साहन मिळू लागले होते. धर्माच्या नावावर चाललेल्या या देवदासी सोडण्याच्या दुष्ट रूढीवर ज्योतिरावांनी यावेळी चांगलाच जोराचा हल्ला चढविला. तसेच यावेळी त्यांनी मुंबईच्या नाभिक वर्गात जागृती निर्माण करून त्यांच्याकरवी ब्राह्मण विधवा केशवपनावर सामुदायिक बहिष्कार पुकारला! न्हावी लोकांचा हा संप मोठा यशस्वी झाला! ब्राह्मण विधवांच्या डोकीवरचे केस वाढू लागले त्यामुळे घरोघर ब्राम्हणांना घबराट सुटली. न्हाव्यांच्या मोठमोठ्या सभा झाल्या व पुरुषांनी स्रियांवर हत्यार चालविणे बालीशपणाचे आहे असा सूर त्या सभांतून निघू लागला. इंग्रजी व मराठी वृतपत्रे रोज रंगू लागली. तिकडे पुण्याच्या नाभिकांनीही मुंबईच्या आपल्या जातभाईंचाच मार्ग स्विकारला! लंडनच्या स्रियांनी तिकडे सभा भरवून मुंबईच्या न्हाव्यांचे अभिनंदन केले! तेव्हा भिक्षुकशाहीचे धाबे चांगलेच दणाणले! मुंबई-पुण्याच्या भटाभिक्षुकांनीही आपल्या विधवा आया-बहिणींच्या डोक्यावर आपण स्वतः च शस्त्र फिरवून धर्मावर आलेले हे गंडांतर टाळण्याची तोड काढली! उभयपक्षी झालेल्या या सभांतील हकीकती त्यावेळच्या वर्तमानपत्रांतून अजूनही काही वाचावयास मिळतात. त्या वाचून मोठा विनोद वाटतो. असो; ब्राह्मणी धर्माचे अभिमानी जो ब्राह्मण वर्ग आपल्याच घरात आणि त्यातल्या त्यात आपणांस जन्म देणाऱ्या आईला अथवा आपल्या बाळपणी आपणास कडे काखेत घेऊन सांभाळ करणाऱ्या बहिणीला त्यांची काही कसूर नसता केवळ त्या विधवा झाल्याबद्दल त्यांच्या नशिबाला दोष देऊन न्हाव्यापुढे परपुरुषांपुढे नेऊन बसवावे यात ब्राह्मणी धर्माने कोणते ध्येय गाठले असेल? ब्राह्मण लोक धर्माच्या कैफात धुंद होऊन आपल्या आईबहिणीवर कसायालाही न शोभणारी जुलूम जबरदस्ती रोज बेधडकपणे करीत होते. ज्यांच्या मनात आपल्या जन्मदात्या आईबहिणीबद्दल ही बुद्धी त्यांच्या मनात इतरेजनाबद्दल कोणते क्षुद्र विचार वास करीत असतील याचा निर्णय देणे वाचकांकडे सोपविलेले बरे. ज्योतिरावांना माणुसकीची चांगली कल्पना होती! इतकेच नव्हे तर ती ब्राह्मणांत आणि ब्राह्मणी धर्माने गुलाम बनविलेल्या लोकांत पैदा करून देण्याचे एकच एक काम त्यांनी उभ्या जन्मात केले आहे! अशा या महाभागाच्या मनात अखिल स्त्रीवर्गाबद्दल उच्च कोटीचा आदर असल्यास आश्चर्य कुठले? स्त्री वर्ग हा राष्ट्राचा मातृवर्ग आहे या भावनेने त्यांनी आपल्या आयुष्याचा पहिला भाग या वर्गाची सेवा करण्यात घालविला होता. स्रि-शिक्षण, विधवा विवाह, बालहत्याप्रतिबंधक गृह इत्यादी चळवळी उभारून स्त्री-वर्गाची अमोल सेवा त्यांनी केल्याचे वाचकांना ठाऊक आहेच! ब्राह्मण विधवांच्या केशवपनाच्या रानटी चालीकडे त्यांचे लक्ष गेले नसते तरच ते आश्चर्य घडले असते. ही चाल बंद करण्याबद्दल त्यांनी नाभिकांची ही चळवळ उभी करून आपल्या ब्राह्मण विधवा भगिनींचा हा उत्तम कैवार घेतला होता!

अनुक्रमणिका

आतापर्यंत आपल्या आयुष्यातील जवळजवळ चाळीस वर्षे ज्योतिरावांनी खालसा मुलखात आपली बहुविध चळवळ चालविली होती. पण देशी संस्थानांतून तर तिचे कोठे नाव देखील ऐकू येत नव्हते ही गोष्ट लक्षात आल्यावर सन १८८० साली ते फलटण संस्थानात व नंतर पुढे सावंतवाडीस गेले. फलटण येथे तर त्यांची काही व्याख्यानेही झालीत! आणि सन १८८२ साली ते निजाम राज्यातील तेलंगण भागात मुंबईकर तेलगु पुढाऱ्यांच्या आग्रहाने गेले होते. तेथे गेल्यावर त्यांची मराठी भाषेतून त्यांनी व्याख्याने करविली व त्या व्याख्यानांचा तेलगु भाषेतून अनुवाद मुंबईकरांनी त्या त्या सभांतून सांगितला; तसेच सन १९८४ पासून ते बडोद्यास मधूनमधून जाऊ लागले होते आणि तेथे देखील त्यांची काही व्याख्याने झालीत.

संस्थानी प्रजेप्रमाणेच बृहन्महाराष्ट्रातील राजे महाराजे, सरदार व जहागीरदार इत्यादी बड्या लोकांतही जागृती उत्पन्न करावी यासाठी ज्योतिरावांनी 'गुलामगिरी' व 'ब्राह्मणाचे कसब' हे आपले दोन ग्रंथ छापून तयार होताच सर्व राजे, महाराजे व सरदार दरकदार इत्यादी बड्या लोकांकडे पाठविले होते आणि त्यासोबत सत्यशोधक समाजाचे उद्देश व नियम पाठविले होते. पण त्यावेळी पुष्कळशा राजे लोकांना जगातच काय पण खुद्द आपल्या राज्यात काय चालले आहे याची माहिती नसे आणि ती मिळविण्याची जरूरी पण त्यांना वाटत नसे! जबाबदारीच्या कागदांवर रोज नुसत्या चार दोन सह्या ठोकण्याची जेथे तकलीफ होत असे तेथे त्यापैकी कितीकांनी ज्योतिरावांची ती पुस्तके वाचली असतील? इंग्रजी साम्राज्याने अगोदरच त्यांना लुळेपांगळे करून सोडले होते! लढायांवर जाण्याचे त्यांच्या नशीबाने आता टळले होते! स्वतःचीच ज्यांना शुद्ध राहिली नव्हती ते बिचारे प्रजेचे तरी काय हित पाहणार? राजामहाराजांना समक्ष भेटून त्यांना उपदेशाने वळवावे असे संस्थानांशी संबंध आल्यानंतर त्यांना वाटू लागले होते. फलटणचे राजे नेहमी पुण्यास असत. ते फार जुन्या मताचे होते पण त्यांना नेहमी बोलून बोलून ज्योतिबांनी वळविले होते. सन १८८१ च्या डिसेंबरात श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांना बडोदा संस्थानचे राज्याधिकार मिळाले व ते सन १८८२ मध्ये पुण्यास आले त्यावेळी ज्योतिरावांनी या तरुण नरेशाची भेट घेतली व त्यांना काही बोध केला. या नवजवान राजास ज्योतिबांच्या पुष्कळ गोष्टी पटल्या. महाराज स्वभावतःच मोठे तडफदार व तैल बुद्धीचे होते. मागासलेल्या बहुजन समाजाच्या उद्धारासाठी ज्योतिरावांनी चालविलेल्या चळवळीचा त्यांच्या मनावर फारच उत्कृष्ट परिणाम झाला! आणि लगेच समाजोद्धाराच्या कार्याला आपला हातभार लावण्यास ते उद्युक्त झालेत. महाराज दरसाल पुण्यास येऊन मोठाले मुक्काम ठोकू लागले व ते पुण्यास आले म्हणजे ज्योतिराव व त्यांचे शिल्लेदार महाराजांना वारंवार भेटून त्यांना आपल्या चळवळीत भाग घेण्याचे योग घडवून आणू लागले. सन १८८४ च्या अगदी आरंभी ज्योतिरावांनी पुणे येथे 'अनाथ विद्यार्थी वसती गृह' स्थापन केले. त्यांत पुढे पुढे शंभरपर्यंत विद्यार्थी वाढले होते. तसेच 'दीनबंधु', 'सार्वजनिक सभा', 'डेक्कन मराठा शिक्षण समाज' इत्यादी उपयुक्त संस्था स्थापण्यास त्यांनी समाजाच्या मंडळीस प्रोत्साहन व मदत दिली. ज्योतिरावांनी गायकवाड महाराजांचे मन वळवून त्यांचेकडून वरील संस्थांस दरसाल काही ठराविक आर्थिक मदत देवविली. महाराजांच्या निमंत्रणावरून ज्योतिराव सन १८८४ च्या डिसेंबरमध्ये प्रथम बडोद्यास गेले होते. तेथे महाराजांनी आपल्या वाड्यावर त्यांची काही व्याख्याने ऐकली. शहरांतही त्यांची दोन तीन व्याख्याने झाली. पुढेदेखील ते बडोद्यास अनेक वेळा गेले. सयाजीराव महाराज हे ज्योतिरावांच्या प्रभावळीत सामील झाल्याचे पाहून भिक्षुकशाहीच्या संतापाचा पारा साहजिकच वर चढला! महाराज ब्राह्मण वर्गाच्या रोषास पात्र झाले! झाडून साऱ्या मराठी पत्रांनी महाराजांवर टिकेचे जे भयंकर काहूर उठविले ते येथे वर्णून आम्ही विस्तार वाढवू इच्छित नाही. याबद्दल थोडक्यात सांगावयाचे म्हणजे इंग्रजांकडून महाराजांना राज्यावरून पदच्युत करण्यापर्यंत काही ब्रह्मपुत्रांनी प्रयत्न करून पाहिले. बडोद्याचे खिचडी प्रकरण प्रसिद्धच आहे! श्रीमंत महाराजांच्या मनात ज्योतिरावांविषयी अत्यंत उच्च आदरभाव उत्पन्न झाला असल्यास नवल नव्हते. याचे थोडे प्रत्यंतर आम्हास

अनुक्रमणिका

दिसले ते असे की, आम्ही ( या पुस्तकाचा कर्ता ) सन १९३० मध्ये बडोद्यास जाऊन श्रीमंत महाराजांची मुलाखत घेतली असता त्यांनी महात्मा फुले यांच्यासंबंधी जे प्रशंसोद्गार काढले ते खास पृथ्वीमोलाच्या किंमतीचे होते! आम्ही १९२७ साली जे महात्मा फुले यांचे चरित्र लिहिले ते महाराजांनी मुद्दाम वाचवून खुद्द ऐकले आणि त्यावर त्यांचा उत्तम अभिप्राय लिहून आमचेकडे आला असून त्या पत्रात महात्मा फुले यांच्याबद्दल महाराजांनी जी उत्कृष्ट माहिती नमूद केली आहे त्यातील एक वाक्य या चिमुकल्या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर आम्ही दिले आहे. पुढील चरित्रग्रंथात आम्ही ते सर्व देऊ.

श्रीमंत सयाजीराव महाराजांच्या तोडीचा एकही विद्वान आणि बहुश्रुत पुरुष हिंदुस्थानात तरी दुसरा कोणी नाही याबद्दल कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. हिंदुस्थानची गोष्ट कशाला अखिल जगाची सर्व धर्म परिषद जी नुकतीच युरोपात भरली होती, त्या परिषदेचे अध्यक्षस्थान जगातील विद्वानांनी श्रीमंत सयाजीरावांना दिले होते! यावरून महाराज हे जगातील एक नामांकित विद्वान आहेत हे सिद्ध आहे! या जगप्रख्यात विद्वानाने महात्माफुले यांना 'हिंदुस्थानचा वाशिंग्टन' म्हटले आहे! यावरून ज्योतिराव हे किती अतुल दर्जाचे थोर पुरुष होते याची वाचकांना चांगली कल्पना होईल.

अनुक्रमणिका

# प्रकरण १५ : महात्मा पदवी अर्पण

आता ज्योतिरावांच्या चळवळीची नौबत पुण्याबाहेर दूर दूर झडू लागली होती. ते आपल्या बहुविध कार्यात पार गढून गेले होते! त्यांना एका पळाचीदेखील फुरसत नव्हती. जसे त्यांचे शिलेदार वाढू लागले होते तसेच त्यांचे विरोधकही वाढू लागले होते. विशेषतः त्यांनी जेव्हा गव्हर्नराच्या नावाने बांधल्या जाणाऱ्या रे मार्केटला विरोध केला तेव्हापासून इंग्रज अधिकाऱ्यांचीं त्यांच्यावर खपा मर्जी झाली होती आणि हे भिक्षुकशाहीच्या पथ्यावर पडले होते! इतक्यात या मंडई प्रकरणाला पुन्हा दुसरेच तोंड लागले व त्यात ज्योतिराव चांगलेच भाजून निघाले!

श्रीमंती थाटाचे टुमदार 'रे मार्केट' बांधून पुरे झाल्यावर ते दुकानदार लोकांकरिता उघडे करण्यात आले. मार्केटात दुकानदारांनी आपली दुकाने घालावीत; पण त्या सरदारी थाटाच्या मार्केटाचे भाडेही तसेच सरदारी किंमतीचे ठेवण्यात आले होते. त्यामुळे पुण्यातील जुन्या मंडईतील दुकानदार व्यापारी या नव्या मार्केटात येईनात! त्यामुळे रे साहेबांच्या नावाने व पापाने पांढरे झालेले हे बाजारगृह पांढरे फटफटीत आणि कोरे करकरीत दिसू लागले. ही इमारत बांधण्याच्या इरेस पडलेले म्यु. क. चे सभासद आणि त्यांतील गोरे अंमलदार गव्हर्नराच्या नावामुळे चांगले पेचात आले. मार्केटात जबर भाडे देण्यास नसल्यामुळे मोठे दुकानदार तर राहोच पण छोटा कुंभारही आपली मडकी तेथे मांडण्यास तयार नव्हता. त्यामुळे कुंभाराच्या घरचे प्राणी मात्र ते बीन भाड्यांचे घर समजून मार्केटात आरोहण करू लागले होते! जोरजबरीच्या मार्गाशिवाय दुकानदारांना मार्केटात कोंबणे आता म्यु० क० च्या अधिकाऱ्यांना अथवा सरकारी अम्मलदारांना शक्य राहिले नव्हते. आणि शेवटी त्याच मार्गाने ते गेले! या नव्या मार्केटात दुकाने घालण्याबद्दल जेव्हा दुकानदारांवर जुलूम जबरदस्ती सुरू झाली तेव्हा ज्योतिरावांना दुकानदारांचा साहजिकच कैवार घ्यावा लागला व मार्केट प्रकरणाच्या जुन्या तंट्यास हे दुसरेच नव्याने तोंड फुटले!

मार्केटात येण्यासाठी मोठ्या व्यापाऱ्यांस फार तर दुकाने घालण्यास म्यु० अधिकाऱ्यांनी सक्तीने सांगावे, पण रोज पोटापुरते न मिळणाऱ्या लहान दुकानदारांवरचा हा जुलूम बंद व्हावा म्हणून ज्योतिरावांनी फार मेहनत घेतली. ते या बाबतीत शहरातील काही प्रमुख लोकांना व म्युनिसिपालिटीच्या काही सभासदांना भेटले पण काही उपयोग होईना. शेवटी ते मोठमोठ्या युरोपियन ऑफिसरांना देखील भेटले पण त्यामुळे काही उपयोग तर झाला नाहीच उलट त्यामुळे काही अधिकारी लोक व भट मेंबर ज्योतिरावांवर चिडले; आणि त्यांनी गरीब दुकानदार लोकांवरचा सूड ज्योतिरावांवर उगविण्याचा विचार करून त्यांचा अत्यंत हलकट व उद्वेगजनक रीतीने छळ आरंभिला. या छळाविषयीची हकीकत त्यांनी एका तांबोळ्यास मुलाखत दिली असता थोडी वर्णन केली होती. ज्योतिराव हे फार सहनशील स्वभावाचे होते. गोरगरिबांच्या हक्काकरिता झटण्यात झालेल्या छळाबद्दल ते दुःख न मानता होईल तितके सुखच मानीत असत. त्यामुळे त्यांच्या नेहमी होणाऱ्या छळांच्या हकीकती ते चव्हाट्यावर कधीही मांडीत नसत. आपल्या पक्षाच्या 'दीनबंधु' अगर इतर कोणत्याही वर्तमानपत्रातून त्याबद्दल त्यांनी कोठे एक अक्षरही लिहिले नाही, अगर त्याबद्दल आपल्या शेकडो शिष्यांना त्या छळाचा प्रतिकार करण्याबद्दलही सांगितले नाही. यावेळी ज्योतिरावांना फारच अमानुष रीतीने त्रास देण्यात आला व त्यांतून तो तांबोळीही आपली तशाच स्वरूपाची लहानशी तक्रार सांगत आला, म्हणून ज्योतिराव सहज आपणास होत असलेल्या त्रासासंबंधी बोलले. तांबोळी घरी गेला. ज्योतिरावांवर त्यावेळच्या गरीब लोकांची मोठी श्रद्धा असे. ज्योतिरावांनी सांगितलेली हकीकत ऐकून तांबोळ्यास फार वाईट वाटले व त्यांचा होत असलेला छळ चव्हाट्यावर यावा

म्हणून त्याने एक पत्र लिहून ‘दीनबंधुकडे’ पाठविले. ‘दीनबंधु’कारांनी ते आपल्या ता. ५ डिसेंबर १८८६ च्या अंकातून प्रसिद्ध केले. ते पत्र खाली लिहिल्याप्रमाणे होते :-

“मेहरबान दीनबंधु अकबारके मालक, जनावे मनआदाब.

एक वक्ते सुभोकु उठके मे० ज्योतिराव फुले इनके घरकू जाके उनकू कहा, मैय वेताल पेठमें रहिता हूं और मेरे पडोसमें तांबे पितलके बरतन बनानेवाले तांबटकर लोक रहिते हैं। वो लोक रात और दिन अपने बरतनका काम करते है। उस वक्त घनके और हातोडेके ठोकेके आवाज में हमारे घरके सब अदमियोंका सिर फिरके तबियत बेचैन हो जाती है। इसलिये तुम हमारे पुणेके म्युनिसिपालिटीकू कहके ये सब तांबटगरोंके कारखाने खुदावंत रे साहेबके मारकीट में ले जावेंगे तो हम सब लोक तुमारे हकमे दुवा देयेंगे”

ज्योतिराव ( म्हणाले ) : “पुण्यातील म्युनिसिपालिटी अशी सारासार विचार करणारी असती, तर तिजकडून गरीब लोकांच्या निढळाच्या घामाचे पैसे असे व्यर्थ खर्ची पडलें नसते. कारण जुन्या मंडईतील काही दुकानदार इतके दारिद्र्याने गांजले आहेत की, त्यांच्याजवळ भांडवलापुरते पैसे मुळीच नसल्यामुळे ते दररोज प्रातःकाळी सावकारापासून रुपया आठ आणे एके दिवसाचा पैसा अथवा अधेला व्याजाच्या बोलीने कर्ज काढून सर्व दिवसभर उन्हातान्हात श्रम करतात. तरी त्यांची पोटे भरण्यास मोठी मारामार पडते. कारण शहर पुण्यात येऊन जाऊन काय तो सरकारी श्रीमंत भट-ब्राह्मण कामगारांचा भरणा आहे आणि त्यांतून बहुतकरून सर्व पिकली सुकली का होईना स्वस्त वांगी वगैरे भाजी विकत घेऊन, मोठ्या काटकसरीने आपले पैसे वाचवितात, त्यांच्या हातून पैसा सुटण्यास महाकठीण; आणि अशा भिक्षुक गिऱ्हाईकांपासून मंडईतील दुकानदारांस भांडवल उभे करण्याची मोठी मारामार येऊन पडते. यावरून मंडईतील व्यापाऱ्याला मेहेरबान रे बहादूर साहेबांच्या टोलेजंग नव्या मार्केटातील जबर भाडे देण्याचे अवसान होणार नाही असे मनात समजून ते बिचारे जुन्या मंडईतच तळ घेऊन बसले आहेत. या सर्वांचा सूड मजवर उगविण्याच्या इराद्याने पुणे म्युनिसिपालिटीतील हेल्थ आफिसरने म्हणा अथवा हलालखोरावरील मुख्य अधिकाऱ्याने म्हणा, या दहा बारा दिवसांत वेताळ पेठ, मीठ गंज वगैरे ठिकाणांतील मैल्याच्या गाड्यांचे डेपो मोडून ते माझे घराचे पलीकडील डेपोंत सामील केले आहेत. यामुळे सकाळपासून तो दुपारचे बारा वाजेपावेतो माझे दारावरून भंग्यांच्या डोक्यावर उघड्या मैल्याच्या पाट्या वाहण्याची जेव्हा मालिका लागते तेव्हा चोहोकडे म्युनिसिपालिटी कसबाची घाण सुटल्याबरोबर मला माझ्या घराचे दरवाजे बंद करून आत बसावे लागते. या म्युनिसिपालिटीत भट पडो! आता तिजपासून गरीबगुरीब लोकांस फार त्रास होऊ लागला आहे. तिचे नाव माझे समोर काढू नका.”

मुसलमान “अच्छा साहेब कहके मै अपने घरकू निकल आया”

असो, अशाप्रकारे मुसलमान तांबोळ्यांचे पत्र जेव्हा दीनबंधूत प्रसिद्ध झाले त्यावेळी दीनबंधुने पुणे म्युनिसिपालिटीच्या भटकारभाऱ्यांवर खूप टीका करून वरील कृत्याचा निषेध केला. पुणे मुंबईतील समाजाचे मंडळीसही फारच वाईट वाटले. रा. ब. घोले वगैरे पुढाऱ्यांनी गोऱ्या अधिकाऱ्यांकडून पुणे म्युनिसिपालिटीचे कान टोंचले, तेव्हा कोठे हा त्रास थोडा कमी झाला. परंतु जुनागंज पेठेतील रस्ते व गटारे दुरुस्त न करणे, त्या पेठेत नळांची, हौदांची, दिव्यांची अगर पायखान्यांची व्यवस्था न करणे, या पेठेतील रस्ते न झाडण्यासाठी मेहेतर लोकांना सांगणे, पेठेत घाण पैदा होईल असा प्रयत्न करणे व या पेठेतील लोकांकडून विशेषतः सत्यशोधकांकडून जबर कर सक्तीने वसूल करणे इत्यादि प्रकारचे जुलूम यापुढे या पेठेवर राजरोस करण्यात येऊ लागले. या पेठेतील या लोकांवरच भटी म्युनिसिपालिटीचा

अनुक्रमणिका

कडवा जुलूम का? तर या पेठेत सत्यशोधक समाजाचा प्रसार फारच मोठ्या प्रमाणात झाला होता व खुद्द ज्योतिराव त्या पेठेत राहात होते म्हणून!! अशा तऱ्हेने ज्योतिरावांचा शेवटपर्यंत अनेक प्रकारे छळ करण्यात आला व उतार वयामुळे त्यांना यापासून त्रासही झाला, असो.

त्यांनी केलेल्या आतापर्यंतच्या अफाट जनसेवेचे मोल त्याकाळी अज्ञानपणाने कोणास करता आले नाही. ज्योतिरावांच्या त्यावेळच्या कार्याविषयी त्यांचे मित्र स्वामी रामय्या व्यंकय्या अय्यावारू यांनी सन १९११ साली पुणे येथे भरलेल्या सत्यशोधक समान परिषदेचे अध्यक्ष या नात्याने केलेल्या छापील भाषणात असे म्हटले आहे की, "समाजाची योग्य व्यवस्था करण्यास म. ज्योतिरावांस फुरसत मिळाली नाही व त्यांस लोकांचे साह्यही जसे मिळावयास पाहिजे तसे मिळाले नाही. कारण बोद्धारो मत्सरग्रस्तः प्रथवाः स्मयदूषितः अविद्योपहताश्चान्ये ॥ विद्वान लोकांस ज्योतिबांचा साधारण हेवाच वाटे. राजे महाराजे वगैरे आम्ही थोर, आम्ही क्षत्रिय, याच डौलात असत. बहुजनसमाज तर अज्ञानाने व्यापलेला, अशा स्थितीत या समाजाची भरभराट झाली नाही यात आश्चर्य नाही.

रा. रामय्या अय्यावारूंनी इ. स. १९११ साली म. फुले यांचे अल्प चरित्र छापून प्रसिद्ध केले. त्यात ते लिहितात की, 'ज्योतिरावांच्या हयातीत त्यांच्या अलौकिक कामिगिरीविषयी कोणी फारसा त्यांचा गौरव केला नाही. त्यांना मानपत्रे दिली नाहीत, किंवा त्यांच्या स्तुतीने वर्तमानपत्रांचे रकाने भरून निघाले नाहीत. त्यांच्या मृत्युसमयीही वृत्तपत्रांनी त्यांच्या चरित्रातील गोष्टी छापून फारसा विलाप केला नाही. याचे कारण त्यांची कामगिरी विशेषतः ज्यांना इंग्रजीत Dumb Millions म्हणतात त्या मूकजनसमुहासाठी होती. या सर्वांत आपल्या खऱ्या उपकारकर्त्याची योग्यता कळण्याची पात्रता नव्हती व ज्यांना त्या योग्यतेची जाणीव असे, त्यांना आपला शोक चव्हाट्यावर आणून त्याचे प्रदर्शन कसे करावे हे कळत नसे.'

बहुजन समाजाच्या उद्धारासाठी ज्या अनेक चळवळी ज्योतिरावांनी अखंडपणे चालविल्या होत्या त्याचे वर्णन आतापर्यंत बरेच येऊन चुकले आहे. त्यासाठी त्यांना आयुष्यातील इतकी वर्षे प्रतिकूल परिस्थितीशी तोंड देतांना जो त्रास सहन करावा लागला, जे कष्ट उठवावे लागले, जो अपमान सहन करावा लागला व ज्या दिव्यातून जावे लागले त्याची कल्पना वाचकांना थोडीफार झाली असेल. उभ्या जन्मात एकाच प्रसंगी महाराष्ट्रात मुंबईच्या मंडळींनी त्यांचा मान केला. हा झालेला मान त्यांच्या जन्मात पहिला व अखेरचा होय! आणि म्हणून त्याची हकीकत आम्ही येथे थोडक्यात देतो.

घणाचे घाव सोसल्यावर जशी हिऱ्याची किंमत झाल्याशिवाय राहात नाही, त्याचप्रमाणे सामाजिक क्षेत्राच्या ऐरणीवर संकटाचे घण सोसून अखेरी ज्योतिरावाचे तेज हिऱ्याप्रमाणे चमकल्याशिवाय राहिले नाही. ब्राह्मणेतर सुज्ञांना ज्योतिरावांची किंमत आता कळू लागली होती. सन १८८८ च्या एप्रिल महिन्याचे अखेरीस ज्योतिराव एका महत्त्वाच्या कामासाठी गेले होते, तेव्हा यावेळी ज्योतिरावांची अल्प सेवा आपण करावी असे मुंबईकरांना साहजिकच वाटले व सन १८८८ च्या मे महिन्यातील ११ तारखेस कोळीवाडा हॉलमध्ये त्यांनी मुंबई शहरातील नागरिकांची म्हणून एक जंगी जाहिर सभा बोलाविली. मांडवी कोळीवाडा हॉलमध्ये लोक मावेनात. सभेस मुंबईतील बरेच प्रतिष्ठीत नागरीक, दुकानदार, कारखानदार व मजूर वगैरे मिळून दोन अडीच हजार लोक जमले होते. ज्योतिरावांची व्याख्याने मुंबईच्या लोकांनी ऐकली होती, म्हणून ज्योतिरावांचे उत्कृष्ट व रसभरीत व्याख्यान ऐकण्यासाठी अलोट समुदाय उसळला असल्यास नवल नाही. त्याशिवाय रा. ब. वडेकर, जे. पी. व रा. ब. लोखंडे, जे. पी. यांच्यासारख्या मुंबईतील त्यावेळच्या प्रमुख व वजनदार पुढाऱ्यांनी आपल्या सह्यांनी आमंत्रण दिल्यामुळे आज मुंबईचे बरेच ठळक लोक जमले

होते. याशिवाय ठाण्याचे डॉक्टर लाड वगैरे मुंबईच्या बाहेरचीही थोडी मंडळी मुद्दाम आली होती. या सभेत ज्योतिरावांना 'महात्मा' ही पदवी अर्पण करण्यात येऊन त्याप्रसंगी रा.ब. लोखंडे, रा. ब. वडेकर वगैरे पुढाऱ्यांनी गुणवर्णन करून ज्योतिरावांचा मोठा गौरव केला व फुले हे महात्मा पुरुष असून आपण त्यांना महात्मा म्हणून संबोधणे किती जरूर आहे हे श्रोतृवर्गास समजावून सांगितले आणि या महात्म्याचा गौरव करण्याचे पुण्य संपादन केले.

अनुक्रमणिका

# प्रकरण १६ : सार्वजनिक सत्यधर्म

महात्मा ज्योतिबा फुले हे लहानपणापासून उत्तमपैकी व्यायामपटू होते. जणू निसर्गाने त्यांना शारिरीक देणगी मोठ्या उदारपणे बहाल केली होती! त्यांचा बांधा मोठा बळकट होता. जन्मभर इतकी अहोरात्र दगदग सोसून देखील ते कधी आजारी म्हणून आंथरुणावर पडले नव्हते! पण आता मात्र त्यांना फार दगदग सहन होत नसे. ठिकठिकाणच्या दौऱ्यामुळे त्यांची प्रकृती हळू हळू बिघडू लागली होती.

जन्मभर लोकहिताची कामे केल्याने आणि त्याकरिता छळ व हाल सोसल्याने महात्माजींची प्रकृती बऱ्याच दिवसांपासून सारखी खालावत चालली होती. सन १८८८ च्या पावसाळ्याला सुरुवात होणार तोच अंगात एकदम अशक्तता वाढून त्यांना पक्षघाताच्या आजाराने पछाडले. यावेळी रा. ब. विश्राम रामजी घोले, असिस्टंट सर्जन यांनी फारच मेहनत घेऊन महात्माजींसाठी फुकट औषधे पुरविली. महात्माजी आजारी असल्याची हकीकत श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड सरकार बडोदे यांना समजली, त्याबरोबर त्यांनी महात्माजींसाठी बराच पैसा पाठविला. याशिवाय त्या वेळचे प्रसिद्ध संन्यासी नागेश्वरगीर कल्याणगीर बुवा यांनीही बराच पैसा महात्माजींकडे पाठविला. परंतु बडोदे सरकारकडचीच रक्कम पुष्कळ मोठी होती त्यामुळे नागेश्वरगीरबुवांचा पैसा महात्माजीनी समाजासाठी दिला. असो; रोग फारच दुर्धर होता. आयुष्यात हे पहिलेच दुखणे व तेही म्हातारपणचे असल्यामुळे या आजारातून महात्माजी उठतीलच अशी खात्री वाटेना. परंतु आधुनिक काळात पहिल्याने महात्मा फुल्यांच्या हातून सत्य धर्माचे ध्वजारोपण व्हावयाचे, असे काळाच्या पोटात लिहिलेले भविष्य अजून पुढे खरे व्हावयाचे होते आणि म्हणून ते अवघ्या दीड दोन महिन्यात दुरुस्त झाले.

या आजाराच्या वेळची हकीकत महात्माजींनी 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकात शेवटी एका अभंगात वर्णन केली आहे.

गायकवाडी आश्रय घोल्याची नजर ॥ होती अनिवार । की न घेतां ॥ १ ॥
दुष्ट रोगांतून फुल्या वांचविला ॥ आनंदी पत्नीला । केले ज्याच्या ॥ २ ॥
बुवाजींचे द्रव्य समाजी नमूद ॥ फुल्या झाला मर्द । रोग्यांमध्ये ॥ ३ ॥

असो; महात्माजी आजारातून दुरुस्त झाले खरे, परंतु लिहिण्याचे मुख्य साधन जो उजवा हात तो पक्षघाताने आजारात निर्जीव झाल्यामुळे त्यांना बरेच दुःख झाले. तरी धीर न सोडता त्यांनी डावे हाताने लिहिण्याचा अभ्यास केला व जगावरील सर्व धर्मावर प्रकाश पाडणारा 'सार्वजनिक सत्यधर्म' या नावाचा दिव्य ग्रंथ लिहिण्याचा त्यांचा जो पुष्कळ दिवसापासून मानस होता, तो यावेळी पुरा करून घेण्याचा त्यांनी निश्चय केला व त्याप्रमाणे ऑगस्ट महिन्याचे सुमारास तो ग्रंथ डाव्या हाताने लिहिण्याचे काम त्यांनी हाती घेतले.

"सार्वजनिक सत्यधर्म" हे म. फुले यांनी लिहिलेले अखेरचे पुस्तक होय. यापूर्वी त्यांनी 'गुलामगिरी' 'ब्राह्मणाचे कसब', 'जातीभेद विवेकसार', 'शिवाजी राजांचा पोवाडा', 'सत्सार', 'मंगलाष्टके व धर्मविधी', 'इशारा', 'शेतकऱ्याचा आसुड, भाग ४' तसेच 'सत्यपाठ अभंग' इत्यादी ग्रंथ लिहिले व प्रसिद्ध केले होते. त्याशिवाय 'ब्राह्मणी धर्मा'वरील पाच अंकी नाटक, 'तृतीय रत्न' नाटक, 'अस्पृश्याची कैफीयत' कविता व अभंग इत्यादी त्यांनी लिहिलेले पुष्कळ वाङ्मय अप्रसिद्ध होते. त्यांनी लिहिलेल्या या सर्व ग्रंथ

अनुक्रमणिका

संग्रहात ‘सार्वजनिक सत्यधर्म’ हा ग्रंथ सर्वश्रेष्ठ होय! त्यांनी जगातील धर्मांधांना दिलेला हा सूर्यप्रकाश आहे! रचलेल्या सुधारणारूपी इमारतीवर हा मंगल कळस होय! यांत सत्याचे सार आहे आणि हा ग्रंथ म्हणजे माणसाला माणुसकी देणारी कामधेनु होय! हा ग्रंथ सध्या फार दुर्मीळ झाला आहे पण अजून काही सज्ञनांकडे या पुस्तकाच्या प्रती आढळतात. आम्ही तर प्रत्येक जिज्ञासुला हे पुस्तक एकदा तरी वाचून पाहावे अशी अगत्याची  सूचना करतो.

अनुक्रमणिका

# प्रकरण १७ : अखेरचा अध्याय

आपल्या जीवन चरित्र्याचा अखेरचा अध्याय आता लौकरच पुरा करावा लागेल असे महात्माजींना त्यांच्या आतील आवाजाने सूचविले होते! दिवसेंदिवस त्यांना आता वाढता थकवा वाटू लागला होता.

उभ्या आयुष्यात या महात्म्याला जगाने अनेकवेळा छळले व दूर लोटले, पण जगातील एका जीवाने मात्र त्यांना प्रथमपासून तो त्यांच्या अखेरच्या घडीपर्यंत साथ दिली! त्यांना सोसाव्या लागलेल्या अपमानाचा व हाल अपेष्टांचा काही भार आपल्या शिरावर घेऊन त्यांना वेळोवेळी सुखाचा, आनंदाचा, प्रीतीचा व औदार्याचा हात दिला! जगातील त्यांचा हा एकुलता एक मित्र व त्यांना अखेरपर्यंत साथ देणारा जगांतील एकुलता एक तो जीव कोण असावा बरे? तो जीव, ती व्यक्ती व ती विभूती त्यांची श्रीमती होय! त्यांच्या जन्माची सोबतीण त्यांच्यासोबत होती. ती साध्वी होती, ती वीरपत्नी होती व ती सत्यवती होती! ज्योतिरावांचे सारे तेज, त्यांचे सारे धैर्य, त्यांचे सारे कर्तृत्व आणि त्यांचे सारे महात्म्य या साध्वीच्या तपामुळेच खरेखुरे चमकले! म. ज्योतिरावांना या माऊलीने एका शब्दाने कधीही न दुखविता त्यांना प्रत्येक कामात परोपरीने मदत केली. ज्योतिरावांच्या संसाराचा सारा भार सावित्रीबाईंवर होता. अतिथीसत्कार, म. ज्योतिबांनी पाळलेल्या पोरक्या मुलांचा प्रतिपाळ, म. ज्योतिरावांनी दुष्काळात काढलेल्या अन्न छात्रालयातील कार्याचा भार, त्यांच्या शेतातील मालाची देखरेख, त्यांनी काढलेल्या पुणे अनाथ विद्यार्थी वसतीगृहाची व्यवस्था इत्यादी त्यांच्या प्रत्येक कार्याची धुरा आपल्या पतीबरोबर त्या अखंडपणे वाहात होत्या.

श्री सावित्रीदेवीला पोटी संतान नव्हते, पण त्याबद्दल त्यांना कधी दुःखाचा आठव झाला नाही. निराश्रित व पोरकी अर्भके हेच त्यांचे खरेखुरे संतान होते. म. ज्योतिरावांनी पूर्वी काढलेल्या बालहत्त्या प्रतिबंधक गृहात जी काही पोरकी मुले आली होती त्यांत काशीबाई नामक ब्राह्मण विधवेच्या पोटी जन्मलेला यशवंत तेवढा वाचला होता. म. ज्योतिराव आणि साध्वी सावित्रीबाई यांच्यासारख्या प्रेमळ व दयाळू हुतात्म्यांनी यशवंताला आपला पुत्र मानून त्याचे पालनपोषण केले होते. आता यशवंत कॉलेजमध्ये जाऊन डॉक्टरकीचा अभ्यास करीत होता.

आपल्या जन्माच्या सोबत्यावर पक्षघाताच्या आजाराने अकल्पिक घाला घातल्यापासून सती सावित्रीबाईला पुढे दुःखाचे काळे ढग दिसू लागले होते. तिने यशवंताच्या दोन हाताचे चार हात करण्याची गोष्ट म. ज्योतिरावांजवळ काढली व आपल्या धर्मपत्नीची इच्छा लक्षात घेऊन त्यांनी यशवंताचा विचार घेतला आणि नंतर लगेच हडपसर येथील रा. ग्यानबा कृष्णाजी ससाणे यांची सुविद्य व सुशील कन्या लक्ष्मीबाई या कुलवधुबरोबर यशवंताचे लग्न उरकविले. हा विवाह समारंभ ता. ४ फेब्रुवारी सन १८८९ रोजी सोमवारी सकाळी ९॥ वाजता मोठ्या आनंदाने पार पडला. या लग्नसमारंभाची हकीकत ता. १० फेब्रुवारी १८८९ च्या दीनबंधूने सविस्तर दिली आहे. त्यात विशेष हे की, निष्फळ धर्मविधींना या समारंभात फाटा दिला होता व वधुवरांनी आपल्या जन्मातील कर्तव्यावर निबंध वाचून पंचांच्या सहानुभूतींचा त्यांनी आशिर्वाद मागितला व तसा तो पंचांनी त्यांना दिला, अशाप्रकारे म. ज्योतिरावांच्या आयुष्यातील पहिले आणि शेवटचे असे एकच एक राहिलेले गृहकृत्य त्यांच्या डोळ्यादेखत एकदाचे संपले.

जन्मास येऊन म. ज्योतिबांना जे कार्य करावयाचे होते ते त्यांनी केले होते. त्यांचे कार्य पुढे चालविण्यास श्री. कृष्णराव पांडुरंग भालेकर, रावबहादूर डॉ. विश्राम रामजी घोले, रावबहादूर नारायण

अनुक्रमणिका

मेघाजी लोखंडे, डॉ. संतु रामजी लाड, रामय्या व्यंकय्या अय्यावारू, पंडीत धोंडीराम नामदेव, भाऊराव कोंडाजी पाटील ही सुशिक्षित मंडळी त्यांना यापूर्वीच येऊन मिळाली होती. आणि महात्मा फुले यांचे कार्य सतत अखंडपणे चालू ठेवण्याची या सर्व मंडळींची फार मनिषा होती व त्या दिशेने त्या सर्वांचे प्रयत्न जारी होते. आपले कार्य पुढे चालवावयास आपल्या पाठीमागे बरीच मंडळी आहे हे पाहून म. फुले यांना समाधान वाटत असे. असो; सन १८९० च्या नोव्हेंबर महिन्याचा तिसरा आठवडा पुरा लोटला. इतक्यात एके दिवशी त्यांना फार थकवा वाटला आणि आपला अंतःसमय आता अगदी नजीक आला असे त्यांना समजले, तेव्हा लगेच त्यांनी पुण्या-मुंबईच्या आपल्या सर्‌व मंडळीस भेटीस बोलाविले व त्याप्रमाणे सर्व प्रमुख मंडळी त्यांना भेटावयास आली. तेव्हा महात्माजींनी आपण लिहून ठेवलेले मृत्युपत्र मंडळीच्या हवाली केले. त्यांच्या या अंतःसमयी मुंबईचे रामस्वामी अय्यावारू, रा. ब. नारायण मेघाजी लोखंडे, पुण्याचे रा. ब. डॉक्टर विश्राम रामजी घोले, पंडित धोंडीराम नामदेव ही मंडळी उपस्थित होती. त्यांनी आपली प्रिय भार्या श्री सावित्रीबाई व चिरंजीव यशवंतराव फुले यांना मंडळींच्या हवाली करून त्यांचा योग्य सांभाळ करण्याचे सांगितले आणि त्यानंतर त्यांनी मंडळीस आपला अखेरचा जो उपदेश केला त्याची महती येथे काय वर्णावी? ते या महात्म्याचे अखेरचे बोल होते? ते त्यांनी मानवी कर्तव्यावर उपदेशीलेले अखेरचे दोन शब्द होते!! इतकेच नव्हे तर ते या मानवश्रेष्ठाने मानवी जिवांवर अखेर सिंचलेले अमृत होते!!! हे अखेरचे कार्य या महात्म्याने जगासाठी केले आणि ता. २७ नोव्हेंबर १८९० रोजी गुरुवारी रात्रीचे बरोबर २ वाजून २० मिनिटांनी ईश्वरी प्रार्थना करून ते ईश्वर स्वरूपी लीन झाले!

या महात्म्याने इहलोकाचा त्याग केला त्यावेळी महाराष्ट्रातील सारी सूज्ञ ब्राह्मण-ब्राह्मणेतर जनता हळहळली. महात्माजींचा अंत्यविधी साजरा केला त्याप्रसंगी रा. यशवंतराव फुले यांनी जी ईश्वरप्रार्थना केली होती ती त्यावेळच्या दीनबंधु पत्रामधून प्रसिद्ध झाली होती. महात्माजी ईश्वरस्वरूपी लीन होण्यापूर्वीच तारा केल्यामुळे मुंबई वगैरे ठिकाणची मंडळी आली होती. महात्माजींच्या स्वर्गवासाची, बातमी कळली तेव्हा अनेक गोरगरीबांच्या व महारमांगाच्या डोळ्यांतून दुःखाश्रुंची टिपे पडली. अबलांचा वाली, दीनदुबळ्यांचा कैवारी व पुणे नगरीचा हीरा आज गमावला गेल्यामुळे साऱ्यानगरीत उदासीनता पसरली होती. महात्माजींचे कट्टे दुष्मन भिक्षुकशाहीचे पुरस्कर्ते ते देखील मनात या महात्म्याचे गुण आठवत होते. या महात्म्याच्या अंतरात्म्याबरोबर लगेच मागोमाग ता. २८ शुक्रवारी सकाळी ८ वाजता या महात्म्याच्या कायेनेही पुणे शहरास दर्शन देऊन शेवटचा निरोप दिला. या पुण्यपुरुषाचे जीवन सर्व जातीकरिता सारखे खर्च झाले होते म्हणून त्यांच्या पवित्र कायेला सर्व जातीच्या लोकांनी आपला खांदा दिला. स्मशानयात्रेला महारमांगापासून ब्राह्मणांपर्यंत सर्व जातीचे नव्हे तर मुसलमान धर्माचे देखील दीड दोन हजारापर्यंत लोक होते. नियोजित स्थळी पोहोचल्यावर तेथे रा. कृष्णराव भालेकर, रा. बा. डॉ. घोले, श्री. वाळवेकर (सुबोध पत्रिकेचे संपादक). रा. ब. नारायणराव लोखंडे, जे. पी., रामय्या व्यंकय्या अय्यावारू, ग्यानोबा कृष्णाजी ससाणे, पंडित धोंडीराम व यशवंतराव फुले यांची या महात्म्याविषयी गुणवर्णनपर भाषणे होऊन या पुण्यपुरुषाच्या पवित्र कायेचे सर्वांनी अखेरचे दर्शन घेतले व तेथेच दुपारचे बारा वाजता या महत्म्याचे चरित्र संपले.

**समाप्त**

अनुक्रमणिका

## साहित्य-संस्कृती मंडळाची आगामी प्रकाशने

१. गांधी पर्व
२. कल्लपा यशवंत ढाले यांची दैनंदिनी
३. सर्वदर्शन संग्रह
४. डॉ. आंबेडकर चरित्र खंड ६ व ७
५. आगरकर समग्र वाङ्मय खंड-२

## साहित्य-संस्कृती मंडळाची प्रकाशने खालील केंद्रावर मिळतील.

१. प्रकाशन व्यवस्थापक,
शासन मुद्रण व लेखन सामग्री विभाग,
चर्नी रोड, **मुंबई-४**.

२. व्यवस्थापक,
शासन लेखन सामग्री आणि ग्रंथागार, शहागंज
गांधी चौक, **औरंगाबाद.**

३. व्यवस्थापक, शासकीय ग्रंथागार,
बडवे बिल्डिंग, पी. वाय्. सी. जिमखाना,
**पुणे - ४.**

४. व्यवस्थापक,
शासन मुद्रण व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स.
**नागपूर.**

अनुक्रमणिका